॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ ॐ तत्सत् ॥ ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

॥ ॐ श्रीसद्गुरु वासुदेवानन्त सरस्वत्यै नमः ॥

**श्रीमत् सच्चिदानन्द सद्गुरु वासुदेवानन्तसरस्वती तथा रावसाहेब बाबा महाराज सहस्रबुद्धे ह्यांचें संक्षिप्त सद्गुरु-चरित्र**

# अध्याय पहिला

ॐकारस्वरूपा अनादी अनंता । तीनही जगतां तूंचि मूळ ॥१॥
चारी वेदां मूळ तूंचि विश्वाधार । तुज नमस्कार सर्वभावें ॥२॥
वेद प्रतिपादी तुज एकल्यासी । तुज तूं जाणसी स्वयमेव ॥३॥
तूंचि बा गणेशु बुद्धिदाता एक । मतिप्रकाशक स्वयमेव ॥४॥
सगुण निर्गुण नटलोसि तूं रे । विश्वाच्या व्यवहारें सकळही ॥५॥
विघ्नविनाशका वंदितो चरणीं । साह्य व्हावें झणीं मज आतां ॥६॥
सद्गुरुकथांचे करणें गुणगान । हेतु हा धरोन प्रार्थितसें ॥७॥
गुरुचरित्राचें करावें लेखन । म्हणोनियां जाण सिद्ध झालों ॥८॥
प्रगल्भ ती बुद्धी द्यावी गजानना । चरित्रलेखना बालकासी ॥९॥
तुझा आशीर्वाद असतांच शिरीं । मुका असे तरी, बोले वाणी ॥१०॥
वाणीचा विलास करीं अभिनव । चातुर्य वैभव अर्थ दावी ॥११॥
ऐसी जे शारदा मोहिनी विश्वाची । नमितों मी साची मनोभावें ॥१२॥
वाणीचें वैभव तीच विस्तारील । कथोनि दावील गुरुलीला ॥१३॥
गणेश तो पिता जानकी ते माता । वंदीतसें माथा नमवोनी ॥१४॥
लक्ष्मीकेशव कुलदेव थोर । तया नमस्कार असो माझा ॥१५॥
अंबेजोगाईची माता जोगेश्वरी । कुलदेवी सत्वरीं नमियेली ॥१६॥

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | श्रीगणेशवन्दनस्तोत्रम् | १ |
| २. | श्रीसद्गुरु वासुदेवानन्तसरस्वती तथा रावसाहेब बाबामहाराज सहस्रबुद्धे ह्यांचे संक्षिप्त सद्गुरु-चरित्र | ५ |
| | अध्याय पहिला .............. ५ | |
| | अध्याय दुसरा .............. १० | |
| | अध्याय तिसरा .............. १५ | |
| | अध्याय चौथा .............. २० | |
| | अध्याय पाचवा .............. २५ | |
| | अध्याय सहावा .............. ३० | |
| | अध्याय सातवा .............. ३५ | |
| | अध्याय आठवा .............. ४३ | |
| | अध्याय नववा .............. ४८ | |
| | अध्याय दहावा .............. ५८ | |
| | अध्याय अकरावा .............. ७० | |
| | अध्याय बारावा .............. ८४ | |
| ३. | श्रीसद्गुरु-वन्दनाष्टकम् | १०४ |
| ४. | श्रीसद्गुरु-वासुदेवानन्तसरस्वती-वन्दनाष्टकम् | १०५ |
| ५. | श्रीसुखशान्तिदं श्रीसद्गुरु स्तोत्रम् | १०६ |
| ६. | श्रीसद्गुरुरामचंद्र वंदनाष्टक (१) | १०८ |
| ७. | श्रीसद्गुरुरामचंद्र वंदनाष्टक (२) | ११० |
| ८. | श्रीसद्गुरु वासुदेवानंतसरस्वती स्वामी समर्थ स्तवन | ११२ |
| ९. | आरती श्रीसद्गुरु बाबांची (१) | ११३ |
| १०. | आरती श्रीसद्गुरु बाबांची (२) | ११४ |
| ११. | श्रीसद्गुरु बाबांचा धावा | ११५ |

सीता आदिशक्ती श्रीराम दैवत । आणि हनुमंत नमस्कारीं ॥१७॥
माझीये गृहींची उपास्य दैवतें । तयां एकचित्तें वंदन हें ॥१८॥
महालक्ष्मी, महाकाली, महासरस्वती । आणिक सर्वे ती व्याघ्रांबरी ॥१९॥
भराडीण आणि देव रामेश्वर । वंदितों मी थोर ग्रामदेवां ॥२०॥
दत्त अवधूत पंथींचें दैवत । करितों दंडवत त्याचे चरणीं ॥२१॥
लोळोनियां पायीं मागतसें दान । आशीर्वाद पूर्ण द्यावा मज ॥२२॥
प्रथमपासोनि तुज उपासितों । सर्वत्र नमितों तुज एका ॥२३॥
सद्गुरुचरित्र मुखीं वदवावें । आशीर्वचन द्यावें हेंचि मज ॥२४॥
श्रीपाद श्रीवल्लभ दत्तअवतार । प्रार्थोनि सत्वर वंदियेले ॥२५॥
नृसिंहसरस्वती गाणगापुरासी । वसती दिनिनिशीं सर्वकाळ ॥२६॥
तेचि अक्कलकोटीं स्वामी कीं समर्थ । भक्तमनोरथ पुरविती ॥२७॥
नृसिंहसरस्वती तेंचि असे नाम । अक्कलकोट धाम तयांचेंची ॥२८॥
एकचि अवतार वर्ते दोन स्थानीं । निःशंक बनोनी जाणावें हें ॥२९॥
तयांचे चरणीं करोनि प्रणिपात । मागतसें नित्य आशीर्वाद ॥३०॥
सद्गुरुचरित्र वाणीसी वर्णाया । शक्ती द्या सदया मजलागीं ॥३१॥
सर्वभावें तुमचे चरणीं मी लीन । करोनि घ्या पूर्ण चरित्र हें ॥३२॥
मम सद्गुरूंचे रामानंद गुरु । करितों नमस्कारु त्यांचे चरणीं ॥३३॥
त्यांनीं बोध केला सद्गुरु बाबांसी । संप्रदाय त्यांसी देवोनियां ॥३४॥
स्वरूपसंप्रदायीं केलें तत्त्वदर्शी । हस्त मस्तकासी ठेवोनियां ॥३५॥
रामानंद गुरो कृपा ते करावी । कथा वदवावी सद्गुरूंची ॥३६॥
संक्षिप्त चरित्र सद्गुरु बाबांचें । वर्णावया वाचे शक्ती द्यावी ॥३७॥
वारंवार माथा ठेवोनि चरणीं । प्रार्थी क्षणोक्षणीं तयांलागीं ॥३८॥
आतां अभिनव थोर नवलाव । दावी जो कीं देव वंदूं त्यासी ॥३९॥
हृदयमंदिरीं वसे निरंतर । जो कीं परात्पर सद्गुरुराय ॥४०॥

जगताचा आदि अंत जया ठावा । तया सद्गुरुरावा काय वानूं ॥४१॥
माझिये हृदयीं वसे जो कीं नित्य । ज्याचेनि अनित्य जळुनी जाय ॥४२॥
जयाचे कृपेनें संसार-सागरू । तरुनी पैलपारू जाती जीव ॥४३॥
मनोमंदिरांत हृदयसिंहासनीं । सद्भावें पूजोनी प्रार्थितसें ॥४४॥
सद्गुरु माउली तुझी कृपादृष्टी । कारुण्यें अधिष्ठी जयालागीं ॥४५॥
सकळही विद्या वसती त्यापाशीं । ऋद्धिसिद्धि दासी होती त्याच्या ॥४६॥
नवनिधी त्याचे जवळी वसत । सकळ कळा येत आश्रयासी ॥४७॥
ऐशी श्रीसद्गुरु माउली तूं थोर । देईं मज वर त्वरें आतां ॥४८॥
अपार अनंत चरित्र हें तुझें । वर्णावया माझें बळ थोडें ॥४९॥
परी उद्भवली इच्छा हे मानसीं । संक्षिप्त चरित्रासी वर्णावया ॥५०॥
बैसोनी हृदयीं तूंचि वदवावें । चरित्र आघवें गुरुराया ॥५१॥
मम वैखरींत नवरस भरीं । शब्दसृष्टि करीं सुशोभित ॥५२॥
अलंकार आणि रूपकें अपार । भरोनियां थोर वदवावीं ॥५३॥
शब्दरत्नांचें हें वाणीचें भांडार । त्यांचि अपरंपार उफळावें ॥५४॥
माझिये मराठी भाषेमार्जी आतां । प्रमेय खाणी ताता ! वाढवाव्या ॥५५॥
भावाचा फुलोरा भरोनियां येथ । रिझवावें चित्त सज्जनांचें ॥५६॥
सकळ सिद्धांत दावीं ठायीं ठायीं । संतजन जींहीं तोषतील ॥५७॥
विवेकवल्लीची करावी पेरणी । जेणें उकलणी गूढार्थांची ॥५८॥
सिद्ध अर्थ हाचि वदवोनि दावीं । मनें तोषवावीं सद्भक्तांची ॥५९॥
जयाचेनि जाई पाखंड निरसोन । कुतर्क फिटोन जाई जेणें ॥६०॥
तुझें वाचितांचि संक्षिप्त चरित्र । मानस पवित्र होवो तेणें ॥६१॥
ब्रह्मविद्या-बोधू सकळ जीवांसी । गातां चरित्रासी होवो माये ॥६२॥
नास्तिकांचें बंड अपैसें निवेल । ऐशी हे अमोल वदवीं कथा ॥६३॥
कृपाकर माथां जरी तूं ठेविसी । तरी चरित्रासी वदेन गा ॥६४॥

सकळ जीवांसी होईल आनंदू । ऐसा रसास्वादू पाववीन ॥६५॥
काना वचनाचे भेटीसवें जीवां । वाचितांचि व्हावा स्वानंदू तो ॥६६॥
ह्याचसाठीं फार बोलिलों लडिवाळ । पुरवावी आळ आतां माये ॥६७॥
ऐसें प्रार्थोनियां लोळतों चरणीं । सर्वस्वें करोनी एकचित्त ॥६८॥
तंव थोर झाला काय नवलाव । प्रगटला देव अंतरांत ॥६९॥
धरोनियां रूप सगुण साकार । आलिंगिलें थोर हृदयासी ॥७०॥
वदती किती हा करिसी प्रस्ताव । अंतरींचा भाव जाणोनियां ॥७१॥
ठेवोनियां माथां कर वदताती । कथा हे निश्चितीं वदवीन ॥७२॥
संक्षिप्त हें सार सांगावें चरित्र । मानसें पवित्र होती जेणें ॥७३॥
हृदयीं बैसोन मीच वदवीन । निःशंक हे पूर्ण भाख घेईं ॥७४॥
करोनी निमित्त तुजलागीं येथ । मीच लिहवीत चरित्र हें ॥७५॥
संक्षिप्त हें आतां वदवितों बाळा । पुढें कवणे काळा करीन मोठें ॥७६॥
प्रेमभरें ऐसें वदोनि वचन । आशीर्वाद पूर्ण दिधलासे ॥७७॥
अंतर्धान मग पावले हृदयीं । स्वरूपाचे ठायीं मिसळोन ॥७८॥
सकलही देव आणिक दैवतें । झाले वरदाते ग्रंथासी या ॥७९॥
शेखीं संतां आणि महंतां प्रार्थिलें । अवधान भलें द्यावें तुम्हीं ॥८०॥
ज्ञानदेव आणि नामदेव संत । तेवीं एकनाथ तुकाराम ॥८१॥
स्वामी रामदास यथांसि प्रार्थिलें । आणिक वंदिले सर्वभावें ॥८२॥
मम सद्गुरूंचें संक्षिप्त चरित्र । वदवा शब्दीं चित्र उमटवोनी ॥८३॥
तोषोनियां सारे देती आशीर्वचन । ग्रंथ परिपूर्ण होईल गा ॥८४॥
नको करूं कांहीं चिंता मानसांत । तव शिरीं हात सद्गुरूंचा ॥८५॥
निवांत राहोनि करावें लेखन । तेणें सकळ जन संतोषती ॥८६॥
ऐसे आशीर्वाद करोनियां प्राप्त । केली सुरवात लेखनासी ॥८७॥
जें जें असे ठावें तें तेंचि लिहावें । ऐसें मनोभावें निर्धारिलें ॥८८॥

अंतरी सद्गुरु जैसें वदविती । तैसेचि निघती बोल येथ ॥८९॥
तेचि शब्द लेखीं लिहितसे हात । सत्य मनोगत जाणावें हें ॥९०॥
सद्गुरुचरित्र वर्णाया यथार्थ । कोण तो समर्थ असे जनीं ॥९१॥
त्याचिये सत्तेनें त्याचे गुण गाणें । कृतार्थ करणें जीवन हें ॥९२॥
धरेचा कागद करोनियां येथ । मेरू लेखणीप्रत योजियेला ॥९३॥
सागराची शाई करोनियां सारी । लेखन अवनीवरी मांडियेलें ॥९४॥
तरी तें सद्गुरुचरित्र अपार । न लगे ज्याचा पार कवणासीही ॥९५॥
ब्रह्मा विष्णु शिव थकोनियां गेले । देवादिकां न कळे सद्गुरुमहिमा ॥९६॥
केवीं तें शब्दांनीं करावें लेखन । शब्द अपुरे जाण वर्णनासी ॥९७॥
मन बुद्धि चित्त मावळतें जेथ । अहंता गळत आपेंआप ॥९८॥
ऐसें तें अचिंत्य काय हो बोलावें । मौन स्वीकारावें हेंचि भलें ॥९९॥
परी बोलविता गुरुनाथ माझा । संक्षिप्त कथेचा भाग हा कीं ॥१००॥
प्रथम अध्याय मंगलाचरण । आणिक नमन सकळांसी ॥१०१॥
लिहविला त्यांनीं बालकाचे हातीं । झाली जाणा पूर्ती अध्यायाची ॥१०२॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । गोड पूर्ती झाली प्रथमाध्यायीं ॥१०३॥

॥ प्रथमाध्याय समाप्त ॥

# अध्याय दुसरा

करोनि वंदन गजवदनासी । करूं आरंभासी ग्रंथाचिये ॥१॥
सद्गुरु बाबांचें सहस्रबुद्धे कुळ । अतीव सोज्वळ असे जाणा ॥२॥
कोंकणस्थ चित्तपावन ब्राह्मण । धर्म सनातन वैदिक तो ॥३॥
थोर थोर झाले वैदिक या कुळीं । शास्त्रीही त्या काळीं ज्ञानवंत ॥४॥
बाबांचे वंशज रत्नागिरी प्रांतीं । झाले करिते वस्ती फार पूर्वी ॥५॥
पेशवाईचेही अगोदर यांचा । वास कोतवड्याचा असे मूळ ॥६॥
रत्नागिरीपासाव द्वादश मैल दूर । कोतवडें सुंदर असे ग्राम ॥७॥
सहस्रबुद्ध्यांनीं ग्राम वसविला । समाज तो केला संघटित ॥८॥
अठरापगड जाती आणोनियां तेथ । ग्राम वसवीत पूर्वज ते ॥९॥
बाराहि वाड्यांचा असे हा कीं गांव । बहूत वैभव वाढविलें ॥१०॥
अगणित संपत्ती यांचे पूर्वजांनीं । ग्रामांत आणोनी ठेवियेली ॥११॥
अरण्यें तोडोनी मही संपादिली । शेती सिद्ध केली नाना ठायीं ॥१२॥
प्रथम या कुळासी नाम 'गणपुले' । होतें तये वेळे प्रसिद्धची ॥१३॥
उपरी कालांतरें बुद्धि चमकली । साक्ष ते पटली सरकारांत ॥१४॥
तेथोनियां नाम मिळे सहस्रबुद्धे । नांदती अविरोधें समाजांत ॥१५॥
बारा विभागांचें स्थापियेलें ग्राम । केलें बहु काम रयतेसाठीं ॥१६॥
बाराहि वाड्यांत असे यांची वस्ती । सुसंपन्न स्थिती सकळांची ॥१७॥
मोठमोठे वाडे उभारोनी तट । निर्मियेले नीट स्वग्रामांत ॥१८॥
नोकर-चाकर असती बहुत । शागीर्दही तेथ सेवेलागीं ॥१९॥
कुसुमेश्वरशंकर शिवाचें मंदिर । निर्मियेलें थोर ग्रामामाजी ॥२०॥
अनेक त्या देवी स्थापोनियां तेथ । उपासना लावित सकळ जनां ॥२१॥
जोगेश्वरी यांची कुळींची देवता । स्थापिली निज हिता मंदिरांत ॥२२॥

सूर्यनारायण आणि गणपती । स्थापोनियां कीर्ति वाढविली ॥२३॥
स्वयंभू तें स्थान वसे नदीतीरीं । महालक्ष्मी खरी जगदंबा ॥२४॥
भूमींतूनि आली वारुळामधोन । आदिशक्ती पूर्ण कारणिक ॥२५॥
देवोनी दृष्टांत कथियेली मात । आणि आज्ञापीत सहस्रबुद्ध्यांसी ॥२६॥
निर्मोनियां मूर्ति सुंदर पाषाणाची । करा मंदिराची उभारणी ॥२७॥
परी न मोडावें मूळ तें वारूळ । वसतें माझें स्थळ मूळ जें कीं ॥२८॥
आज असे तेथ मंदीर प्रत्यक्ष । देई जें कीं साक्ष सकळिकां ॥२९॥
आणीक ग्रामींच्या टेकडीवरौतें । अरण्यीं निगुतें एक स्थान ॥३०॥
धारणा देवीचें वसण्याचें स्थळ । जाणावें सकळ भाविकांनीं ॥३१॥
ऐशा देवतांनीं संपन्न हा गांव । रक्षिला सदैव जात असे ॥३२॥
सहस्रबुद्ध्यांच्या कुळीं एक शाखा । धामेळ्यांत देखा स्थिरावली ॥३३॥
वाडा निर्मोनियां धामेळें भागांत । वसती शांतचित्त पूर्वज कीं ॥३४॥
शांडिल्य गोत्रींचे ब्राह्मण हे जाणा । ऋग्वेदी ब्राह्मणांमाजी गणती ॥३५॥
आश्वलायन सूत्र शाकलशाखाध्यायी । संपादिलें ज्यांही वेदज्ञान ॥३६॥
शांडिल्य असित देवल हे तीन । प्रवर जाणोन घ्यावे यांचे ॥३७॥
सांब सदाशिव शंकराचें स्थान । केलेंसे निर्माण धामेळ्यांत ॥३८॥
नाम धाम्णेश्वर मंदिर तें थोर । घुमटांसहित फार असे भव्य ॥३९॥
जागृत दैवत आजही वर्तत । साक्ष जनांप्रत येई नित्य ॥४०॥
भोळा तो शंकर रक्षी सकळांसी । पाहोनि भक्तीसी इष्ट देई ॥४१॥
शिवभक्ति असे थोर या कुळांत । झाले भक्तिमंत लोक कांहीं ॥४२॥
नित्य गणेशाची उपासना चाले । उत्सव बहुवेळे करिती त्याचा ॥४३॥
प्रेमें आळवोनि गजवदनासी । प्रार्थिती तयासी नम्रभावें ॥४४॥
बहू गाणपत्य झाले या कुळांत । वक्रतुंडाप्रत मानिती जे ॥४५॥
जगदंबेचीहि चाले उपासना । जोगेश्वरी ध्याना आणोनियां ॥४६॥

महालक्ष्मीचें करोनी नवरात्र । भजती अहोरात्र पूर्वज ते ॥४७॥
बहूत पूर्वज उपासिती दत्ता । प्रेमें अवधूता आळवोनी ॥४८॥
औदुंबरातळीं असती पादुका । साक्ष देती देखा आजही त्या ॥४९॥
बाबांचे घराचा ओस तो चौथरा । देई साक्ष बरा पूर्वजांची ॥५०॥
दत्ताचे भक्तींत रंगले कितिएक । वैराग्य विवेक घेवोनियां ॥५१॥
ऐशा या धामेळें वाड्यामाजी असे । सद्गुरु बाबांचें मूळ घर ॥५२॥
यांच्या पूर्वजांनीं आणिले पुरोहित । ब्रह्मकर्म नित्य चालावया ॥५३॥
'पटवर्धन' नाम असे त्या ब्राह्मणां । करिती पुरोहितपणा कुळाचा या ॥५४॥
तेचि पटवर्धन पुढें झाले थोर । उपासोनि निरंतर गणेशासी ॥५५॥
गणपतीपुळ्यांत स्वयंभू गणपती । तया ते भजती पटवर्धन ॥५६॥
एका पटवर्धनें केली उपासना । विसरोनि जाणा देह गेह ॥५७॥
तयातें जाहला प्रसन्न गणराज । भक्ताचें तें काज पूर्ण करी ॥५८॥
तेचि पटवर्धन पुढतीं झाले राजे । सांगली, जमखिंडी गाजे शौर्यें ज्यांच्या ॥५९॥
परी पटवर्धन मूळांत उपाध्ये । यजमान सहस्रबुद्धे असती यांचे ॥६०॥
कांहीं काळ जातां यांचे पूर्वज आले । त्यजोनि आपुलें मूळ ग्राम ॥६१॥
इचलकरंजी संस्थानीं ते येत । राहाया शोधित उचित ग्राम ॥६२॥
बोरगांवाजवळी 'मजरे-मने-राजुरी' । या ग्रामाभीतरीं वस्ती केली॥६३॥
बाबांचे आजोबा विठ्ठलपंत थोर । शेती करिती फार याच ग्रामीं ॥६४॥
एकशत अधिक आठ ते एकर । जमीन ती शीघ्र मेळविली ॥६५॥
बसायासि घोडा, त्याचे पायीं तोडा । सरंजामीं जोडा जोडीयेला ॥६६॥
करोनियां शेती धान्य पिकविती । धन मेळविती बहुतची ॥६७॥
येतां शेतावरुनी दुधाच्या कासांड्या । भरोनिया हंड्या आणिती घरा ॥६८॥
विठ्ठलपंतांसी पतंगाचा शोक । असे बहुतेक सर्व काळ ॥६९॥
करोनियां थोर थोर त्या वावड्या । उडविती उघड्या आकाशांत ॥७०॥

पतंगाच्या छंदें वेधियेलें मन । साक्ष अजुनी पूर्ण असे तेथ ॥७१॥
पतंगाचे साठीं सुतळीचें गाठोडें । त्यांनीं संपादिलें असे आज ॥७२॥
ऐसे प्रतिष्ठित पुरुष विठ्ठलपंत । धनधान्यें समृद्ध वसती नित्य ॥७३॥
कुरुंदवाडांत निर्मियेलें घर । राहावया थोर पूर्वजांनीं ॥७४॥
विठ्ठलपंतांचा पुत्र जो कीं साचा । ऐकावा तयाचा वृत्तांतही ॥७५॥
नारायण नाम तयासी ठेविलें । अप्पाजी जाहले परी ते ख्यात ॥७६॥
हेही दत्तभक्त होते सत्य जाणा । म्हणुनी दत्तराणा जवळी ठेवी ॥७७॥
शिकोनियां झाले आंग्लविद्यायुक्त । सेवा ते करीत सरकारांत ॥७८॥
इंजिनिअरिंग खात्यांत नोकरी । करितात बरी अप्पाजी ते ॥७९॥
सब् ओव्हरसिअर होते त्या खात्यांत । धर्मकार्जी रत तेवीं जाणा ॥८०॥
संस्थान तासगांव खालसा तें होतां । कुरुंदवाडीं दत्तापाशीं आले ॥८१॥
घेवोनी पेन्शन सोडोनी नोकरी । कुरुंदवाडीं घरीं राहती नित्य ॥८२॥
सेविती ते नित्य दिगंबर दत्त । तेणें शांत चित्त होवोनियां ॥८३॥
गृहस्थधर्मासी चालविती थोर । तेवीं धर्माचार रक्षोनियां ॥८४॥
भार्या पतिव्रता नामें लक्ष्मीबाई । नित्य यांचे राही सान्निध्यांत ॥८५॥
कुलधर्म कुलाचार चालविती सारे । गृहिणीपद खरें भूषवोनी ॥८६॥
असे धर्मनिष्ठ भक्तिपरायण । पत्नी नारायणरावांची ती ॥८७॥
लक्ष्मीनारायण जोडा हा सुरेख । भूमीवरी एक वर्ततसे ॥८८॥
माहेर बोरगावीं मोडकांचे घरीं । जाणावें चतुरीं बाईंचें या ॥८९॥
मोडक घराणें धनधान्ययुक्त । संपत्ती वसत ज्यांचेपाशीं ॥९०॥
आणीक ईश्वरीं श्रद्धा ज्यांची भारी । उत्तम संस्कारीं संपन्न जे ॥९१॥
भक्तिपरायण आणिक सज्जन । यांचे कुळीं जन धर्मरत ॥९२॥
ऐसिये कुळींची कन्या यमुनाबाई । भार्या वरिली ती ही नारायणें ॥९३॥
बहु कन्या आणि सुत यांसी झाले । गृह तें शोभलें संततीनें ॥९४॥

नारायणरावांचे ज्येष्ठ पुत्र जाणा । कृष्णाजी जयांना नाम साजे ॥९५॥
मुंबापुरीमाजीं सेक्रेटरिएट । ऑफिसांत नीट करिती सेवा ॥९६॥
सुपरवायझराची होती त्यां नोकरी । सेवा करिती बरी मनोभावें ॥९७॥
यांसही दत्ताची असे भक्ति फार । परी बडिवार न दाविती ॥९८॥
कृष्णाजी परशराम भिडे हे गृहस्थ । श्वशुर कीं होत यांचे जाणा ॥९९॥
नाना महाराज साखरे यांचे शिष्य भिडे । भजक हे गाढे ज्ञानेश्वरीचे ॥१००॥
यांसी मृत्यु आला हृदयविकारानें । केलें स्वर्गीं पेणें कृष्णाजींनीं ॥१०१॥
सद्गुरु बाबांचे बंधु ते कीं सान । हरी नाम शोभोन दिसे ज्यांसी ॥१०२॥
वकिलीपरीक्षा देवोनियां त्यांनीं । जुन्नरीं राहोनी वकिली केली ॥१०३॥
शिवाजीमहाराज जे कीं राष्ट्रपुरुष । तयांचा यां ध्यास असे फार ॥१०४॥
शिवनेरीवरी शिवजयंतीचा । उत्सव थाटाचा करिती हे ॥१०५॥
मृत्यु पावोनियां हेही निवर्तले । सेवा करूनी गेले शिवरायांची ॥१०६॥
एक भगिनी यांची कानीटकरांसी । दिली होती साची पुण्यामाजी ॥१०७॥
दुजी भगिनी नामें जी कीं वेणूताई । दिली असे पाहीं जुन्नरांत ॥१०८॥
नारायण धोंडो जोशी फौजदार । त्यांचे गृहीं थोर दिधली भगिनी ॥१०९॥
सासरीचें नांव लक्ष्मीबाई जोशी । बंधू-भगिनीसी प्रेम थोर ॥११०॥
हिचे पुत्र धोंडदेव नामें असती । वकील जुन्नराप्रती सांप्रत जाणा ॥१११॥
बाबांचे हे भाचे आणि होती साडू । प्रेमें दोघां दृढु बांधियेलें ॥११२॥
बालपणीं दोघे एकत्र वसती । अन्योन्यीं ती प्रीती होती फार ॥११३॥
तेवींच बाबांचे शिष्य अनुगृहीत । असती हे सत्य बन्याबापू ॥११४॥
सहस्रबुद्धयांच्या कुळाचा इतिहास । कथिला समजायास सुज्ञ जनां ॥११५॥
तेवींच कथन माता-पिता यांचें । बंधू-भगिनींचें केलें असे ॥११६॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । पूर्ती झाली बरी द्वितीयाध्याया ॥११७॥

**॥ द्वितीयाध्याय समाप्त ॥**

# अध्याय तिसरा

नारायणराव करितां नोकरी । गेले हुबळीक्षेत्रीं बदलोनी ॥१॥
तेथ लक्ष्मीबाई लाधल्या गर्भास । जन्म सद्गुरूंस द्यावयासी ॥२॥
मासोमासीं होती सुखद डोहळे । लक्षणें सोज्ज्वळें दिसों येती ॥३॥
वाटे त्या मातेसी जावें राऊळासी । घ्यावें दर्शनासी ईश्वराच्या ॥४॥
करणें वाटे मनीं बहु दान-धर्म । वाटे तें सत्कर्म व्हावें गृहीं ॥५॥
ईश्वराची कथा श्रवणीं परिसावी । वाचेसी ती गावी हरिकथा ॥६॥
उत्तम लक्षणें सात्त्विक गुणांचीं । होती तिज साचीं डोहळ्यांत ॥७॥
तये वेळीं थोर अवतारी ते संत । योगी ज्ञानी वसत हुबळी क्षेत्रीं ॥८॥
नामें सिद्धारूढ ओळखिती जन । चाले नामस्मरण अविरत ॥९॥
शिवनामाचा तो होतसे गजर । जेणें पापें थोर जळुनी जाती ॥१०॥
जन्मासि येईल स्वामी अवतार । म्हणुनी पुण्य थोर वाढविती ॥११॥
पापाचे अंचळ फिटोनियां जावे । आणिक वाढावें पुण्य थोर ॥१२॥
शिवनामें हुबळी क्षेत्र तें भरोन । नाद सामावोन भरला नभीं ॥१३॥
दशदिशांलागीं गजर नामाचा । उच्चार शिवाचा घरोघरीं ॥१४॥
स्वामी सिद्धारूढ जाणोनी महत्त्व । शिवनाम तत्त्व विखुरताती ॥१५॥
ठायीं ठायीं शिवदर्शन घडावें । श्रवणीं पडावें शिवनाम ॥१६॥
ऐसें पावन झालें क्षेत्र हुबळीनगर । होणार अवतार म्हणोनियां ॥१७॥
कार्तिक तो मास अतीव सुखद । ऋतु तो शरद सुखकर ॥१८॥
धान्याची समृद्धी होत याच काळीं । आनंद-दिवाळी सकळिकां ॥१९॥
देव-प्रबोधाची झाली एकादशी । जागृती देवासी होय तेव्हां ॥२०॥
वैकुंठचतुर्दशी पवित्र तो दिन । पाळिताती जन व्रत थोर ॥२१॥
करोनी उपवास हरिहर-भेटी । घेवोनियां होती आनंदित ॥२२॥

ऐसी चतुर्दशी गेली मावळोन । पौर्णिमा ते पूर्ण उदया आली ॥२३॥
त्रिपुरी पौर्णिमा हे मुख्य मानिती । त्रिपुर पाजळिती सायंकाळीं ॥२४॥
यथासांग पूजा करुनि त्रिपुराची । पाजळती त्याची ज्योति मग ॥२५॥
त्रिपुरासुराचा वध तो करोन । सुखी केले पूर्ण अमर हरें ॥२६॥
त्रिपुरांतक नाम भक्तीं दिलें त्यांस । पावोनि संतोष सकळांनीं ॥२७॥
ऐशा पौर्णिमेसी आली जन्मवेळ । साधाया सुवेळ सिद्ध काळ ॥२८॥
लक्ष्मीबाईसी प्रसूतीवेदना । होती त्या कीं जाणा तेच दिनीं ॥२९॥
सौम्यशा बुधवारीं मध्याह्नाचे प्रहरीं । जन्मवेळ खरी साधियेली ॥३०॥
सोळा घटी आणि अधिक अर्ध घटी । वरीयान योगावरी असे जन्म ॥३१॥
भरणी नक्षत्राचा चतुर्थ चरण । असे कुंभ लग्न राशी मेष ॥३२॥
वृश्चिकेचा शुक्र दशम स्थानांत । गुरु भौम असत चतुर्थासी ॥३३॥
तुळेचा तो रवि संगे बुध राहू । नवमस्थानीं वैभवू ऐसें असे ॥३४॥
मेषेचा तो केतू असे तृतीयांत । पराक्रमीं वसत चंद्र तो कीं ॥३५॥
ऐशा शुभ काळीं आणि शुभ वेळीं । प्रगटला वनमाळी भूलोकांत ॥३६॥
सकलही अमर सूक्ष्मरूपें धरून । पातले येवोन तया स्थाना ॥३७॥
दत्त अवधूत स्वामी समर्थांचा । अवतार साचा झाला जनीं ॥३८॥
धरोनी नरदेह अवतरोनि आले । प्रगट जाहले अवनीवरी ॥३९॥
रामानंद सद्गुरु बीडकरांसाठीं । आले जगजेठी मृत्युलोकीं ॥४०॥
शिष्यासाठीं गुरु गुरूसाठीं शिष्य । ऐसा खेळ खास चालतसे ॥४१॥
लक्ष्मीनारायणाचे पवित्र उदरांत । स्वामी ते समर्थ जन्म घेती ॥४२॥
पाहोनी बाळाची अतीव दिव्य कांती । उभयतां होती आनंदित ॥४३॥
सकळ सोपस्कार करोनि बाळासी । नाम बालकासाठी ठेविताती ॥४४॥
अनाथा तो पूर्ण त्यासि देती नाम । अजन्म्यासि जन्म कल्पोनियां ॥४५॥
द्वादश त्या दिनीं बांधोनि पालख । जमविले प्रमुख नरनारी ॥४६॥

सुशोभित केला पालख तो फार । समारंभ थोर आरंभिला ॥४७॥
मातेनें पालखीं ठेवोनि बालका । नाम सांगे देखा सव्य कर्णी ॥४८॥
रामचंद्र ऐसें ठेवियेलें नाम । सुख तें परम पावोनियां ॥४९॥
दिस मास वाढे बाळ सुलक्षण । बाळलीला पूर्ण पाही माता ॥५०॥
उक्त काळीं केलें मौंजीबंधनास । ब्रह्मउपदेश सांगे पिता ॥५१॥
गायत्री मंत्राचा करूनी उपदेश । केलें संस्कारास व्रतबंधाचे ॥५२॥
संध्या शिकवोन समग्र बाळासी । वामदेव लोमदेव नामासी ठेवियेलें ॥५३॥
पांच वर्षेंवेरी वाढले हुबळींत । कानडी शिकवीत त्यांसी तेव्हां ॥५४॥
उपरी कुरुंदवाडीं आणि पुण्यामाजी । कोल्हापुरीं सहजीं शिकती गुरु ॥५५॥
मराठी आणिक इंग्रजी भाषेचें । शिक्षण तें साचें घेती बाबा ॥५६॥
पुढें अठराशें अठ्ठ्याण्णव सालीं । मुंबापुरींत झाली परीक्षा ती ॥५७॥
झाले ते मॅट्रिक वसुनी बंधुगेहीं । विश्वविद्यालयीं जाती मग ॥५८॥
विल्सन कॉलेजांत पुढें बाबा जात । तेथें उच्च घेत शिक्षणास ॥५९॥
एकोणीसशें दोन सनांत पिताजी । निवर्तोनि सहजीं गेले स्वर्गीं ॥६०॥
वडील ते बंधू कृष्णराव यांनीं । पुण्यास आणोनि ठेवियेलें ॥६१॥
इंजिनिअरिंग कॉलेजीं घालोन । दिधलेंसे ज्ञान उच्चतम ॥६२॥
वसतां मुंबापुरींत बंधूंचे गृहात । स्नेह यांचा होत भागवताशीं ॥६३॥
वामन भागवतांपाशीं स्नेह झाला । त्यांनीं दावियेला मार्ग यांसी ॥६४॥
भागवत होते शिष्य बीडकरांचे । त्यांनी पत्र साचें दिधलें यांसी ॥६५॥
एकोणीसशें सनीं पत्र देवोनियां । पाठविलें ठायां महाराजांचे ॥६६॥
रामानंद बीडकर महाराज । वंदोनियां काज कथियेलें ॥६७॥
दावियलें पत्र करोनि प्रणिपात । म्हणती माझें चित्त करा शांत ॥६८॥
वदती रामानंद बाबांसी पाहोन । आलासि घेवोन पत्र तूं गा ॥६९॥
स्नेही वामनाचा म्हणुनी केला उभा । परमार्थाचा गाभा इच्छिसी तूं ॥७०॥

कासया घेतलें इंग्रजी शिक्षण । तेणें सर्व घाण झाली असे ॥७१॥
असो. एल्.सी.ई. तूं होई प्रथम आतां । पाहूं परमार्था पुढतीं मग ॥७२॥
सदाशिव पेठेंत राहती पुण्यांत । भडभडे वाड्यांत रामचंद्र ॥७३॥
चिमण्यागणपतीपाशीं गृह संपादोन । जाती ते सुजाण कॉलेजांत ॥७४॥
सन एकोणीसशें चार या सालांत । एल्.सी.ई. होत सद्गुरु बाबा ॥७५॥
पुण्यांत असतां बीडकर-मठीं । बैसोनियां गोठी ऐकती हे ॥७६॥
शेवटींचे वर्षीं महाराजांचे पाशीं । बैसोनि सेवेसी करिते झाले ॥७७॥
वाचिती न कांहीं लिहिती न कांहीं । गुरुचरणाठायीं स्थिर झाले ॥७८॥
येवोनि मठांत माता सांगे मात । अभ्यास न करित रामचंद्र ॥७९॥
शेवटील वर्षीं कैसा होईल पास । काळजी जिवास हेचि माझ्या ॥८०॥
रामानंदगुरु वदती माउलीसी । न करीं मानसीं चिंता तूं गे ॥८१॥
तुझा रामचंद्र माझा असे जाण । करिन रक्षण तयाचें मी ॥८२॥
होईल तो पास धरीं हा विश्वास । माझे वचनास सत्य मानीं ॥८३॥
परीक्षा जाहली पुढें यथाकालीं । रामानंदें केली माव तेव्हां ॥८४॥
जाहले उत्तीर्ण रामचंद्र पूर्ण । केलें संपादन पदवीस ॥८५॥
एल्.सी.ई. परीक्षा होवोनियां पास । गुरुवाक्य साच केलें त्यांहीं ॥८६॥
प्रथम वंदोन मातेचे चरण । गुरुगृहीं जाण पातले ते ॥८७॥
धरोनि चरण वंदिले मस्तकीं । रामानंदीं निकी निष्ठा त्यांची ॥८८॥
मानसा लागलें सद्गुरूंचें ध्यान । न सुचे तें आन चित्ता कांहीं ॥८९॥
माता निवर्तली स्वर्गीं निघुनी गेली । नुरला कोणी वाली गुरुवीण ॥९०॥
पुढें जुन्नरास राहिले जावोन । भगिनीगृहीं जाण सद्गुरुराज ॥९१॥
धाकुले ते बंधू असती हरीभाऊ । तयांचाही ठावू बघती तेची ॥९२॥
वारंवार येती पुण्यपत्तनास । गुरुगृहीं खास दर्शनासी ॥९३॥
हुबळीसी असतां स्वामी सिद्धरूढ । देती यांसी गूढ शिवनाम ॥९४॥

आणिक दिधली माळा तीही एक । वदले कौतुक करोनियां ॥९५॥
तुझा नियत गुरु भेटतां तुजसी । वळखील माळेसी माझ्या कीं या ॥९६॥
जो कीं आपेंआप ओळखील माळ । सद्गुरु केवळ तुझा तोची ॥९७॥
तोंवरी करावें शिवनामस्मरण । जेणें जन्म-मरण दूरावत ॥९८॥
सन एकोणीसशें सहा या सालांत । रामानंद बोधित रामचंद्रा ॥९९॥
मस्तकीं ठेवोन अपुला सिद्ध कर । शक्तिपात थोर केला त्यांनीं ॥१००॥
समग्र स्वरूप दावोनी आपुलें । तत्त्वदर्शी केलें बाबांलागीं ॥१०१॥
कर्णीं करोनियां पेरणी बीजाची । नयनीं स्वरूपाची झळक देती ॥१०२॥
देवोनियां दिव्य दृष्टी रामचंद्रा । स्वानंदसागरा मेळविलें ॥१०३॥
रामानंदांचा तो अनुग्रह होतां । लावियेलें चित्ता तेंचि ध्यान ॥१०४॥
करोनि उड्डाण भेदिलें गगन । सहस्रारीं खूण न्याहाळिली ॥१०५॥
तैंपासोनियां देहांतापर्यंत । बाबा न च येत कदा खालीं ॥१०६॥
रामानंद बीडकर महाराजांनीं । सच्छिष्य हा ज्ञानी पूर्ण केला ॥१०७॥
करुनी पर्मनंट स्वरूपीं बैसविलें । अपुल्यासम केलें बाबांलागीं ॥१०८॥
निराकारामार्जी नेवोनि घातिलें । चित्त ना परतलें तेथोनियां ॥१०९॥
अखंड रंगलें स्वरूपाचे रंगीं । सद्गुरु बाबा जगीं धन्य धन्य ॥११०॥
सद्गुरु बाबांची कथिली जन्मकथा । शिक्षणाची अवस्था निरूपिली ॥१११॥
माता-पितरें तेवीं बंधू आणि भगिनी । यांचें निरूपणीं कथन केलें ॥११२॥
सद्गुरुभेटीचा कथिला वृत्तांत । अनुग्रहकथा यांत निरूपिली ॥११३॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । पूर्ण झाली खरी तृतीयाध्याया ॥११४॥

॥ तृतीयाध्याय समाप्त ॥

# अध्याय चौथा

सद्गुरुचरणां करोनि वंदना । आरंभितो जाणा निरूपण ॥१॥
तोचि वदविता तोचि लिहविता । कर्ता करविता अवघा तोचि ॥२॥
तयाचे सत्तेनें खेळे विश्व सारें । अवघीं स्थिरचरें नटोनियां ॥३॥
प्रकृती पुरुष अनादी हे दोन्ही । सांख्य तत्त्वज्ञानीं निर्णयो हा ॥४॥
प्रकृती पुरुष नाहींच तीं दोन । अद्वैत हें पूर्ण सत्य असे ॥५॥
द्वैत अद्वैताचे पैल श्रीसद्गुरु । स्वानंद सागरु अनिर्वाच्य ॥६॥
तो कीं करुणाकरू शांतीचा उदधी । जया ठायीं आधी व्याधी नाहीं ॥७॥
केवल आनंदू भरला परमानंदू । शब्देंवीण संवादू होय जेथ ॥८॥
ज्याची भेटी होतां मावळतो शब्द । केवळ आनंद निजबोधू ॥९॥
त्याचे पदीं जीव जातांचि शरण । त्रिताप ते पूर्ण निवारीती ॥१०॥
तोचि श्रीसद्गुरु भक्तजनासाठीं । प्रगटला जगतीं रामचंद्र ॥११॥
कथा त्याची आतां पुढें अवधारा । चित्ता स्थिर करा परिपूर्ण ॥१२॥
सन एकोणीसशें आठ या सालांत । सद्गुरु बाबा वसत जुन्नरासी ॥१३॥
वॉटर-सप्लाय आणि सॅनिटरी खाते । यांत नोकरी ते करिते झाले ॥१४॥
एकोणीसशें नऊ सालीं सुरवातीस । सोडिले नोकरीस बाबांनीं कीं ॥१५॥
पुनरपि एकोणीसशें नऊ या सालात । नोकरी स्वीकारीत सद्गुरु बाबा ॥१६॥
पी.डब्ल्यू.डी. मार्जी झाले ओव्हरसिअर । रावसाहेब थोर वदती लोक ॥१७॥
त्या काळीं वदती ओव्हरसिअरासी । रावसाहेब नामेंसी सकळ जन ॥१८॥
रत्नागिरी नगरीं गेलीं वर्षें दोन । ओव्हरसिअर म्हणुन होते तेव्हां ॥१९॥
उपरी नागोठण्यास झाली बदली ती गा । सुपरवायझर जागा मिळोनियां॥२०॥
त्याचे आधीं झाला असे अनुग्रह पूर्ण । हरपलें भान व्यवहाराचें ॥२१॥
सद्गुरु रामानंदां पडला सगळा भार । रक्षाया सर्वत्र निजशिष्या ॥२२॥

रावसाहेब बाबांचा विवाह तो झाला । एकोणीसशें दहा साला ऐसें जाणा ॥२३॥
यांचे गुरुराज बीडकर महाराज । विवाहाचें काज करिती तेची ॥२४॥
विष्णुपंत बोडस जुन्नर ग्रामींचे । स्नेही बीडकरांचे होते जाणा ॥२५॥
कुलशीलवान असती ते पूर्ण । त्यांची कन्या सुजाण दुर्गाताई ॥२६॥
योजियेली वधू रामचंद्रपंतां । रामानंदें शिष्य-हिता जाणोनियां ॥२७॥
ऑनररी मॅजिस्ट्रेट होते विष्णुपंत । होते ते प्रख्यात जुन्नर प्रांतीं ॥२८॥
रामचंद्र उत्तम जाणोनियां वर । योजिला सत्वर स्वकन्येसी ॥२९॥
विवाह-सोहळा जाहलासे थोर । निजकन्याकर दिधला हातीं ॥३०॥
रामानंद बीडकर लक्ष पालोनियां । देती शिष्यवर्या उत्तम भार्या ॥३१॥
सद्गुरु बाबांचे लक्ष नाहीं त्यांत । सदा स्वरूपस्थित राहताती ॥३२॥
रावसाहेबांची बदली जाहली । रत्नागिरीस केली नेमणूक ॥३३॥
कोठें पाठवावें निजशिष्या आतां । हेचि एक चिंता रामानंदां ॥३४॥
करिती तपास सकळिकांपाशीं । कोण रत्नागिरीसी अपुला असे ॥३५॥
तंव विष्णुपंत बोडस सांगती । रत्नागिरीप्रती स्नेही माझे ॥३६॥
हरिपंत जोशी वकिल सज्जन । प्रख्यात ते पूर्ण त्या प्रांतांत ॥३७॥
स्वपुत्रासमान रक्षितील यासी । माझे जामातासी, चिंता नको ॥३८॥
रामानंद गुरूंनीं मानोनी वचन । आज्ञापिलें जाण बाबांलागीं ॥३९॥
जाउनी रत्नागिरीस करावी नोकरी । हरिपंतांचे घरीं राहोनियां ॥४०॥
असती ते थोर सच्छील सज्जन । तुज संरक्षोन ठेवितील ॥४१॥
सद्गुरु रामचंद्र रत्नागिरीस आले । आणि स्वीकारिलें नोकरीसी ॥४२॥
ओव्हरसिअर म्हणुनी होती ती नोकरी । राहुनी जोश्यांघरीं स्थिर झाले ॥४३॥
दोन वर्षें तेथ करोनि नोकरी । तेथोनि सत्वरीं बदली झाली ॥४४॥
पेण शहरांत जागा स्वीकारीत । लिमयांचे वाड्यांत सद्गुरु बाबा ॥४५॥
लिमये वकील होते बाबांचे गुरुबंधू । ऐसा हा संबंधू जुळुनी आला ॥४६॥

मिठाचे व्यापारी लिमये जे पेणेंत । वर्गबंधू शाळेंत बाबांचे ते ॥४७॥
तीन वर्षे झाला पेण शहरीं वास । सद्गुरु बाबांस नोकरीसाठीं ॥४८॥
सुपरवायझराची असे यांची जागा । गृहिंची सर्व निगा राखी पत्नी ॥४९॥
पत्नीचें तें नांव ठेवियेलें सीता । गृहसाम्राज्यप्रांता संभाळी ती ॥५०॥
पुनरपि नागोठण्यास आले बदलोन । सदा ज्यांसी ध्यान स्वरूपाचें ॥५१॥
नागोठणें पेण येथोनियां येती । बीडकर मठाप्रती दर्शनासी ॥५२॥
आठवड्याची एक खेप न चुकविती । सद्गुरुचरणीं प्रीती ऐसी यांची ॥५३॥
पेणेहूनि येती सायकलीवरोन । छत्तीस मैल पूर्ण 'पळसदरिसी' ॥५४॥
तिथुनी आगगाडीनें येती ते पुण्यास । परतुनि पेणेस जाती तैसे ॥५५॥
नागोठण्याहून महाडासी आले । एस्.डी.ओ. जाहले सद्गुरु बाबा ॥५६॥
शेखीं महाडांतून झालें प्रमोशन । बाबांसी तें जाण पनवेलीस ॥५७॥
पी.डब्ल्यू.डी. माजी असिस्टंट इंजिनिअर । रावसाहेब थोर होते तेव्हां ॥५८॥
पनवेल नगरींत वसती वर्षे दोन । बिऱ्हाड करून सद्गुरुराज ॥५९॥
सन एकोणीसशें एकोणीस सालीं । अखेरीस झाली बदली यांची ॥६०॥
बाबा मुंबापुरिस आले बदलोन । वांद्र्यासि घेवोन बिऱ्हाड तें ॥६१॥
असिस्टंट इंजिनिअर याच जाग्यावरी । नोकरी मुंबापुरीमाजी करिती ॥६२॥
सुपरिंटेंडिंग इंजिनिअर नॉर्दर्न सर्कलचे । पी.ए. होते त्यांचे सद्गुरु बाबा॥६३॥
सन एकोणीसशें तेवीस सालांत । आर्किटेक्ट ऑफिसांत बदली झाली ॥६४॥
गव्हर्नमेंटचा असिस्टंट आर्किटेक्ट । पी.ए. झाले तेथ सद्गुरु बाबा॥६५॥
नोकरी करीतां, लक्ष स्वरूपांत । अर्ज त्यावरि करित सेवक-गण ॥६६॥
परी तपासणी होतांचि बाबांची । कामें प्रथम प्रतिचीं आढळती ॥६७॥
अश्वावरुनी येती ऑफिसांत बाबा । गर्दीचा तो तोबा टाळावया ॥६८॥
सद्गुरु रामानंद त्यांचे पाठिराखे । तयांवरी कोपे कोण जगीं ॥६९॥
ज्ञानेश्वर वदती स्वयें अभंगांत । सद्गुरु-महिमा येथ सांगतों तो ॥७०॥

"सद्गुरुसारिखा असतां पाठिराखा । इतरांचा लेखा कोण करी" ॥७१॥
सद्गुरु बाबांचे बाबतींत खरें । वचन पटलें कीं रे ज्ञानेशांचें ॥७२॥
खडीचे ते ब्रास उडोनियां गेले । म्हणुनी अर्ज केले कारकुनांनीं ॥७३॥
अर्जावर सही फसवोनि घेतली । वरिष्ठांसि केली सादर ती ॥७४॥
वरिष्ठ जाणती बाबांचा महिमा । अर्जाचिये कामा शोजियेलें ॥७५॥
वरिष्ठ ते गेले खडी-तपासास । घेवोनि कारकुनास सांगातीं त्या ॥७६॥
तंव जैसे तैसे ब्रास जाग्यावरी । उणें अधिक तिळभरी नसे कांहीं ॥७७॥
तेव्हां खोटेपणा कळला कारकुनांचा । रोष वरिष्ठांचा झाला त्यांसी ॥७८॥
तंव सद्गुरु बाबा बोलती वचन । करुनी निवारण त्या रोषाचें ॥७९॥
नका करूं आतां शिक्षा कांहीं यासी । क्षमा सेवकासी करा आतां ॥८०॥
अपकारी यांसी करुनी उपकार । तारिला सत्वर कारकून ॥८१॥
सद्गुरु रावसाहेब बाबा पूर्ण संत । अवतार निश्चित स्वामींचा ते ॥८२॥
रामानंद गुरूंनीं त्यांचा सर्व भार । स्वशिरावर उचलिला ॥८३॥
असा हा वृत्तांत घडला पनवेलीस । रक्षिलें बाबांस बीडकरांनीं ॥८४॥
फोर्ट विभागांत करिती नोकरीस । पी.डब्ल्यू.डी. सेक्रेटरीएट
कचेरीस म्हणताती ॥८५॥
रांगणेकर यांचे वाडींत राहती । रांगणेकरवाड्याप्रती वस्ती करुनी ॥८६॥
बहुत पाहुणे येती सदनासी । आदरातिथ्यासी करिती त्यांच्या ॥८७॥
धान्यें गृह सारें असे भरलेलें । न्यून न दिसलें कवणा कांहीं ॥८८॥
नित्य शनिवारीं भजन यांचे घरीं । जमुनी भक्त भारी होत असे ॥८९॥
स्वयें भजनांत रंगोनियां जाती । देहभानाप्रती विसरोनी ॥९०॥
स्वरूपानुसंधान चाले अविरत । वैखरी वदत रामनाम ॥९१॥
आपुलाले विषय सांडोनि इंद्रियें । एके ठायीं स्वयें आलीं सारीं ॥९२॥
मन बुद्धि चित्त अहंतेसहित । आले ऐक्याप्रत स्वरूपध्यानीं ॥९३॥

बाबांपाशीं नुरली दिवस आणि राती । अखंड ती ज्योती प्रगटली॥९४॥
'मत माउली'चे जावोनियां स्थानीं । ध्यानांत रंगोनी बसती बाबा ॥९५॥
हातीं धरोनियां चिरूट तो एक । पेटवोनि देख ठेविती तो ॥९६॥
एकदां ओढोन रंगताति ध्यानीं । चिरूट जळोनि जात असे ॥९७॥
शेखीं जळोनियां येतांच बोटांत । बोटें जळती तेथ बाबांचीं तीं ॥९८॥
तैं सांडोनियां देती तो चिरूट । परतोनि येत निज गेहा ॥९९॥
काम संपवोनि घरीं परततां । भिकारी भेटतां प्रतिदिनीं ॥१००॥
नित्य त्या भिकाऱ्या देती एक नाणें । आपुले करानें सद्गुरु बाबा ॥१०१॥
तोच तो भिकारी नित्य भेटे त्यांसी । चालविलें क्रमासी बहु काळ ॥१०२॥
एकदां कचेरींत पहिले तारखेस । पगार झाला खास बाबांचा तो ॥१०३॥
गृहासि जातांना नित्याचा भिकारी । सर्व पगार करीं दिधला त्याचे ॥१०४॥
घरीं येतां पाहती पगार खिशांत । दुर्गामाईप्रत नुमगे तो ॥१०५॥
पुसतां सांगती दान भिकाऱ्यास । झालें आज खास पगाराचें ॥१०६॥
तैं दुर्गाताई जाती ओकांपासी । यांचे कचेरीसी, तेही जात ॥१०७॥
सकळ प्रकार ओकांसी कथून । सांगितला पूर्ण माउलीनें ॥१०८॥
तेव्हां ओक यांनीं येतां आफिसांत । कथिला वृत्तांत सकळांसी ॥१०९॥
कळतां वृत्तांत ऑफिसरापाशीं । आज्ञापी सकळांसी स्वयें तो कीं ॥११०॥
पगाराची सही घेवोनि बाबांची । रक्कम पगाराची गृहीं धाडा ॥१११॥
तैंपासोनियां पगार घेवोन । शिपाई आणोन घरीं देत ॥११२॥
बाबा विसरले देह गेह वित्त । जडलें त्यांचें चित्त स्वरूपांत ॥११३॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । झाली पूर्ती बरी चतुर्थाध्याया ॥११४॥

॥ चतुर्थाध्याय समाप्त ॥

# अध्याय पांचवा

नमो सद्गुरुराया भक्तकैवारिया । तव कृपें माया विलया जाई ॥१॥
सत्य आत्मज्ञान देसी निज बाळां । लावोनियां लळा स्वरूपठायीं ॥२॥
विषयांचा छंद तुटोनिया जात । तव कृपा होत जेव्हां जीवा ॥३॥
अपार ते भक्ती उपजें अंतरीं । वैराग्याची थोरी कळोनियां ॥४॥
विवेक-अंकुर लागतो वाढीस । नित्यानित्य खास उमजों लागे ॥५॥
संसाराचा पाश तुटोनियां जात । आवडी उपजत हरिचे भजनीं ॥६॥
हरि-नाम घ्यावें हरि-गुण गावे । ऐसें जीवेंभावें वाटों लागे ॥७॥
लागतसे जीवा एकांताची गोडी । साधनीं आवडी उपजे भारी ॥८॥
तव कृपेचा हा अगाध महिमा । कळावया आम्हां नसे ज्ञान ॥९॥
आम्हां अज्ञ जीवां ताराया कारण । नरदेह घेवोन प्रगट होसी ॥१०॥
ऐसे जे सद्गुरु रामचंद्र बाबा । ज्यांचा चाले ताबा मायेवरी ॥११॥
त्यांची कथा आतां करूं या श्रवण । एकाग्र हें मन करोनियां ॥१२॥
वांद्र्यासी राहतां ऑफिसांत जाती । वेळ न चुकविती कदापी ते ॥१३॥
वक्तशीरपणें जाती कचेरीत । परी दिनरात असती ध्यानीं ॥१४॥
देह हिंडतसे आपुलिये परी । भासे वरीवरी ऐसें जनां ॥१५॥
परी मानस तें होवोनी उन्मन । सदा चाले ध्यान आत्मयाचें ॥१६॥
कचेरींत जातां घेवोनी कागद । रामराम शब्द लिहिताती ॥१७॥
ऐसा कितिक वेळ जाय तो निघोन । बघुनि बहुत जन पिसा म्हणती ॥१८॥
आणीक मत्सर करोनि बाबांचा । करिती नालस्तीचा प्रयत्न ते ॥१९॥
कोणी एकें केला अर्ज वरिष्ठांस । द्यावयासी त्रास बाबांसी तो ॥२०॥
आर्.ए.सहस्रबुद्धे येती ऑफिसांत । उशिरां हें सत्य प्रतिदिनीं ॥२१॥
काम न करिती रामराम लिहिती । वेड्यासम वर्तती कचेरींत ॥२२॥

साहेबांनीं याचा करावा तपास । तेणें अमुचा त्रास चुकेल कीं ॥२३॥
ऐसे चार दोन अर्ज ते कीं झाले । पावसाचे आले दिवस तेव्हां ॥२४॥
वर्षाकाळीं बहुत वृष्टी असे होत । त्या कीं मुंबापुरींत बहु वेळां ॥२५॥
पाणी तें साचोनी रस्ते जलमय होती । गाड्या न धावती रेल्वेच्या त्या ॥२६॥
येती ऐसे दिन पांच सात खास । त्या मुंबापुरीस पावसाळीं ॥२७॥
एक वेळ झाली अपार ती वृष्टी । झालें जीवन कष्टी मुंबापुरिचें ॥२८॥
गल्ल्या-बोळांतूनी रस्तोरस्तीं पाणी । वाहतें भरुनी अपरंपार ॥२९॥
तया दिनीं कोणी जात न कचेरींत । घरोघरीं स्वस्थ बसले तेव्हां ॥३०॥
परी सद्गुरु बाबा करीती नवल । साधोनियां वेळ कचेरीची ॥३१॥
उपस्थित झाले वेळीं कचेरींत । भिजुनी पर्जन्यांत गेले तरी ॥३२॥
सर्व वस्त्रें झालीं ओलीं शरिरावरचीं । परी रावसाहेबांची खचली न वृत्ती ॥३३॥
आले कचेरींत आपुले खोलींत । वस्त्रें तीं वाळत घातलीं कीं ॥३४॥
ओलेंचि धोतर नेसोनियां तेव्हां । काम जिवाभावापासुनि करिती ॥३५॥
कचेरींत फक्त हजर शिपाई । आणि नाईकही हजर असे ॥३६॥
त्यांनीं हा पाहिला बाबांचा प्रकार । आश्चर्य तें थोर वाटे त्यांना ॥३७॥
कैसे वांद्र्याहून आले हे साहेब । पर्जन्याची बाब आडवी न यां ॥३८॥
इतुक्यांत आले अकरा ते वाजत । प्रमुख साहेब येत कचेरीसी ॥३९॥
पर्जन्याचें मान ठावें असे त्यांसी । कोणी न कचेरीसी आले आज ॥४०॥
पुसे युरोपिअन वरिष्ठ साहेब । नाईकासी बाब तये वेळां ॥४१॥
म्हणे आज कोणी आले का रे येथ । काम कचेरींत करावया ॥४२॥
नाईक बोलतो वचन तयांसी । अवघ्या कचेरीसी शुकशुकाट ॥४३॥
फक्त सहस्रबुद्धे साहेब एक आले । आहेत बैसले कचेरींत ॥४४॥
तेव्हां तो साहेब आला पाहायास । भेटला बाबांस त्यांचे स्थानीं ॥४५॥
नेसोनियां ओलें धोतर बैसती । काम करिताती निवांतची ॥४६॥

पुसे तो साहेब रावसाहेबांसी । तुम्हीं कचेरीसी कैसे आलां ॥४७॥
थोर हा पर्जन्य वर्षतो बाहेरी । वांद्र्याहूनि स्वारी कैसी आली ॥४८॥
बाबा बोलताती येतों घोड्यावरून । कधीं न चुकवीन कचेरी मी ॥४९॥
सरकारी वेतन घेतों महिन्यास । काम करायास हवें मज ॥५०॥
फुकट पगार कैसा तो मी घ्यावा । आवडेल देवा कैसें हें कीं ॥५१॥
वेळेवरी यावें वेळेवरी जावें । कर्तव्य करावें आपुलें तें ॥५२॥
हेचि देवपूजा देवा प्रिय फार । निज कर्म पार पाडण्याची ॥५३॥
चार दोन वेळां साहेबानें ऐशा । करोनी तपासा पडताळिलें ॥५४॥
तव कळों आलें तयासी तें सत्य । वक्तशीर नित्य असती बाबा ॥५५॥
मग लिहिता झाला शेरा पुस्तकांत । वक्तशीर येत सहस्रबुद्धे ॥५६॥
कोणीही न द्यावें लक्ष तक्रारीस । कसल्याही अर्जास यांचेवरील ॥५७॥
कोणी न पाहिला ऐसा वक्तशीर । साहेब समग्र कचेरींत ॥५८॥
आणि तो उत्तम लिहोनियां शेरा । अभिनंदन खरा करिता झाला ॥५९॥
मग सेक्रेटरी तोचि युरोपिअन । म्हणे पडताळोन पाहों आतां ॥६०॥
काम न करिती कांहीं ऑफिसात । तक्रार लिखित यांचेवरी ॥६१॥
तीन इमारतींचे काम पूर्ण झालें । तपासूं यां भलें अवचित ॥६२॥
अवचित जावोन करितां तपासणी । कळेल करणी खरी यांची ॥६३॥
ठीक साडेदहा वाजतांच आला । साहेब तो भला वरिष्ठ गा ॥६४॥
वदे करण्या आलों काम-तपासणी । चला तुम्ही झणीं सवें माझ्या ॥६५॥
तीन इमारती पुन्या ज्या कीं झाल्या । तपासूं सगळ्या प्रथम त्याची ॥६६॥
पायापासोनियां शेवटापर्यंत । मापें घ्या समस्त बरोबरी ॥६७॥
सद्गुरु बाबांनी काय तेव्हां केलें । ऐकावें सगळें वृत्त तें कीं ॥६८॥
पायापासोनियां शेवटापर्यंत । सर्वही मापें देत लिहोनियां ॥६९॥
घेवोनी कागद पहिल्या इमारतीचीं । मापें लिहिलीं साचीं स्वहस्तानें ॥७०॥

दारें खिडक्या आणि कोनाकोपऱ्यांचीं । इत्थंभूत साचीं लिहियेलीं ॥७१॥
साहेबाचे हातीं कागद देवोन । ध्यावीं तपासोन म्हणती मापें ॥७२॥
माणसें घेवोन तपाशिलीं मापें । ठायीं ठायीं मापें जैशीं तैशीं ॥७३॥
कोठें नाहीं रेसभरी तेही चूक । पाहोनी कौतुक वाटे मनीं ॥७४॥
मग दुसऱ्या, तिसऱ्या मापें इमारतींची । सांगे लिहिलीं साचीं दाखवावीं ॥७५॥
घेवोनियां कोरा कागद हातांत । मापें लिहितात सद्गुरु बाबा ॥७६॥
दुसऱ्या आणि तिसऱ्या दोन्ही इमारती । मापें कागदाप्रती मांडियेलीं ॥७७॥
देवोनी कागद वरिष्ठांचे हातीं । मोजावें सांप्रती आतां तुम्ही ॥७८॥
वरिष्ठ साहेब बसुनी खुर्चीवरी । कौतुक तें करी अंतरांत ॥७९॥
पुनरपि घेवोन कामगार लोक । मानोनी हरिख जाती तेव्हां ॥८०॥
जावोनियां दोन्ही पाही इमारती । शास्त्रोक्त त्या रीतीं तपासोनी ॥८१॥
रेसमात्र नाहीं चूक ती मापांत । जैसें लिहिलें तेथ तैसें असे ॥८२॥
पाहोनियां सारें जाहला चकित । चमत्कार येथ ऐसा कायी ॥८३॥
कैसी स्मरणशक्ती अतुल ही यांची । पद्धत कामाची अतर्क्यचि ॥८४॥
काम केल्यावीण कैसें पडेल ठावें । माप यां आघवें इमारतींचें ॥८५॥
कामामाजीं बहु असती हे हुषार । काय वर्णूं फार बुद्धि यांची ॥८६॥
स्मरणशक्ति थोर असे यांच्यापाशीं । न चुकविती कामासी कचेरीचे ॥८७॥
प्रत्यक्ष देखिलें वरिष्ठानें तेव्हां । शेरा तो लिहावा म्हणे आतां ॥८८॥
आर्.ए.सहस्रबुद्धे हुषार ऑफिसर । गैर कारभार नाहीं त्यांचा ॥८९॥
दक्ष निज कार्यीं सतत राहोन । करिती काम पूर्ण कचेरीचें ॥९०॥
यांचेविरुद्ध जरी कोणीं अर्ज केला । न मानावें त्याला कवणेंही ॥९१॥
अर्ज तो टाकावा फाईल करोन । ऐसें हें लिहोन ठेवियेलें ॥९२॥
मग पाचारोन कनिष्ठ कारकुनां । समज दिली त्यांना बहुतचि ॥९३॥
आतां याचे पुढती सहस्रबुद्ध्यांसी । त्रास देती त्यांसी दंडीन मी ॥९४॥

धरा बोल ध्यानीं सावध व्हा मनीं । कुत्सित वृत्ति झणीं सोडा आतां ॥९५॥
अंदाजें एकोणीसशें पंचवीस सव्वीस सालीं । बाबांसी ती आली उन्मनिस्थिती ॥९६॥
नाहीं निद्रा त्यांसी कांहीं न बोलती । बैसोनी राहती एके स्थळीं ॥९७॥
संसारींचें लक्ष उडालें संपूर्ण । अखंडीत ध्यान आत्मरूपीं ॥९८॥
नसे देहभान नसे तें बोलणें । आज्ञाचक्र-पेणें उल्लंघिलें ॥९९॥
प्रणवाच्या मात्रा एकत्र त्या होती । आणि मिसळती एके ठायीं ॥१००॥
अर्धमात्रेमाजी सारें झालें लीन । तळें उलंडोन अमृत स्रवे ॥१०१॥
बिंदूमाजी सारें गेलें सामावोन । बिंदुलें फोडोन पैल गेले ॥१०२॥
शेखीं सहस्रदळीं जाहलें मीलन । गेलें मी-तूंपण हारपोनी ॥१०३॥
मी तूं ऐक्या आलें दुजेंपण गेलें । विश्व धवळलें ब्रह्मानंदें ॥१०४॥
प्रकृती-पुरुष निमाला पसारा । देहभाव खरा मावळला ॥१०५॥
देहींच असोन जाहले विदेही । वृत्ती ब्रह्माठायीं लीन झाली ॥१०६॥
शब्दातीत स्थिती अनुभवासी पर । गेला नारीनर भेदभाव ॥१०७॥
अवघ्या ठायीं देव दिसे नयनास । जाहले उदास देहधर्मी ॥१०८॥
ऐसें सामरस्य होवोनियां ठेलें । संपूर्ण विरालें बाह्य भान ॥१०९॥
उन्मनी अवस्था तेवीं बालभाव । जाहलें वैभव प्राप्त त्यांसी ॥११०॥
परी हें नुमजे संसारी जनांस । ज्यांचे आशापाश गळले नाहीं ॥१११॥
जना सत्य वाटे काम आणि अर्थ । म्हणोनी अनर्थ मांडिताती ॥११२॥
ऑफिसांत तेव्हां घडे विपरीत । काम नच होत यांचे हातीं ॥११३॥
स्वस्थ बैसोनियां राहती हे उगे । वाटे तें वाऊगें सकळिकां ॥११४॥
तैं काय झालें तो सारा वृत्तांत । पुढिले अध्यायांत वर्णू आतां ॥११५॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरु चरित्रीं । पूर्ती झाली बरी पंचमाध्याया ॥११६॥

॥ पंचमाध्याय समाप्त ॥

# अध्याय सहावा

जयजयकार तुमचा असो सद्गुरुराया । जीवां बोधोनियां करा स्थिर ॥१॥
तुम्ही चतुर बहु बोध करण्यांत । पहातसां हित बालकांचें ॥२॥
त्वरें करोनियां सद्विद्येचा बोध । अज्ञान अशुद्ध नाशीतसां ॥३॥
परे पैल जीवां तुम्हीं रमवितां । आणीक दावितां मोक्ष-पंथ ॥४॥
संसार-तमाचा करोनियां नाश । चैतन्य-सूर्यास भेटवितां ॥५॥
तुम्ही अनुपम सामर्थ्यानें युक्त । जिवासी जें उक्त तेंची देतां ॥६॥
चतुर्थ अवस्थेमधील जें ज्ञान । देवोनी पालन करितां त्यांचें ॥७॥
भक्तीच्या काननीं चंदन हो तुम्ही । पूजा करण्यां आम्हीं, तुम्ही देवो ॥८॥
कल्याण-रत्नांची तुम्ही रत्नखाण । कैवल्यनिधान पाववितां ॥९॥
ब्रह्मानुभवाचे तुम्ही चक्रवर्ती । तुम्ही स्वयंज्योति परब्रह्म ॥१०॥
ऐशा सद्गुरुनाथा तुमचे चरणीं माथा । ठेवितसे आतां निवांतची ॥११॥
कृपा करोनियां वदवावें चरित्र । जेणें जीवमात्र पावन होती ॥१२॥
ते श्रीसद्गुरुबाबा होवोनी उन्मन । धरोनियां मौन स्थिरावले ॥१३॥
बाबांच्या गृहिणी नामें दुर्गाताई । विस्मय त्यांसी होई प्राप्त तेव्हां ॥१४॥
कळेना तयांसी काय तें करावें । कैसें सांभाळावें तयांलागीं ॥१५॥
गोंधळोन गेल्या सुचे न त्यां कांहीं । पाहोनी स्थिती ही भांबावल्या ॥१६॥
म्हणती जादूटोणा केला कोणी यांसी । लाविलें वेडासी यांसी कोणी ॥१७॥
काय हे विपरित जाहली करणी । देवाजीचे मनीं काय आलें ॥१८॥
बाबा काय करिती ऐकावी ती स्थिती । जेवती न खाती लहरीवीण ॥१९॥
कोणी जवळी येतां त्याचे पायां पडती । मानोनि त्याप्रती देव ऐसें ॥२०॥
कोणी म्हणती वेडे भ्रमिष्ट म्हणती कोणी । नच ते जाणोनि स्थिती यांची ॥२१॥
लक्ष न घालिती संसारी म्हणोन । देती वेडेपण जन यांसी ॥२२॥
असुनी पगार मोठा रावसाहेब म्हणती । परी हे पायां पडती सकळांचे ॥२३॥

अणुरेणूमाजी पाहोनी भगवंत । क्षणोक्षणीं होत नम्र तेथें ॥२४॥
अहंकारनाश करावा म्हणोन । वंदनभक्ति पूर्ण स्वीकारली ॥२५॥
मध्यंतरी काय झाली असे गोठी । संतती नसे पोटीं यांसी कांहीं ॥२६॥
लोक-आग्रहास्तव जाउनी त्र्यंबक क्षेत्रीं । नाग-नारायण बळी
केला यांनीं ॥२७॥
यथासांग केला सकल विधी पूर्ण । आले परतोन स्वगृहासी ॥२८॥
नाहीं झाला सुत परी कन्या झाली । संतती मिळाली यांजलागीं ॥२९॥
नाम शकुंतला ठेविलें तिजसी । 'चिमणी' या नामेंसी पाचारिती ॥३०॥
सुलक्षणी कन्या देवानें दिधली । दुर्गाताई झाली माता तेव्हां ॥३१॥
अंदाजें एकोणीसशें चोवीस पंचविसांत । कन्या जन्मा येत सद्गुरुगृहीं ॥३२॥
दिसेंदीस झाली वाढोनियां थोर । लग्नाचा विचार होईल पुढती ॥३३॥
दुर्गाताईकडचे सारे संबंधित । वेडेच म्हणत बाबांसी ते ॥३४॥
जाहले भ्रमिष्ट लागोनियां वेड । आतां कैंची तड संसाराची ॥३५॥
आमुच्या मुलीचें जाहलें वाटोळें । बीडकरांनीं केलें वेडे यांसी ॥३६॥
बीडकर महाराजांना देती शिव्याशाप । संबंधी अमूप दोघांचेही ॥३७॥
नारायणराव बोडस विचार करिती । दवाखान्याप्रती न्यावयाचा ॥३८॥
डॉक्टर-वैद्यांचे करितां उपचार । न शमे विकार तिळभरी ॥३९॥
डॉक्टर-वैद्य म्हणती रोग नाहीं कांहीं । उपयोग न होई औषधांचा ॥४०॥
नारायणराव होते मेव्हणे बाबांचे । बंधू दुर्गाताईंचे हितकर्ते ॥४१॥
विचार तो पक्का ठरवोनि त्यांनीं । येरवड्याचे स्थानीं न्यावयाचा ॥४२॥
मेंटल हॉस्पिटलांत बाबांसी ते नेती । घेवोनी संमती भगिनीची ॥४३॥
तेथील डॉक्टरां केलें निवेदन । वेडाचें तें पूर्ण बोडसांनीं ॥४४॥
मेंटल हॉस्पिटलांत ठेवोनि बाबांसी । परतले गृहासी बोडस ते ॥४५॥
तेथील वरिष्ठ डॉक्टर तपासिती । सकळही रीती योजोनीयां ॥४६॥
शेवटीं ठरविले वरिष्ठांनीं तेव्हां । रोग तो नसावा कांहीं यांसी ॥४७॥

देहींच्या त्या क्रिया सर्व व्यवस्थित । यांच्या चालतात रात्रंदिन ॥४८॥
कुणा शिवीगाळ हे न करिती कांहीं । मारामारी तेही करिती ना ॥४९॥
विचारिलें कांहीं तर उत्तर देती । उत्तरें असती चतुरत्वाचीं ॥५०॥
अती बुद्धिमान बोलती भाषण । यांसी असे ज्ञान अलौकिक ॥५१॥
एके ठायीं बसुनी राहती म्हणोन । वेडे यांसी कोण म्हणेल कीं ॥५२॥
नाहीं अपस्मार नाहीं बुद्धिभ्रंश । नाहीं लवलेश वेडाचा तो ॥५३॥
नोकरींत लक्ष न देती म्हणोन । वेडे यांसी जन म्हणताती ॥५४॥
संसारीं विरक्त जाहले हे फार । न करिती विचार ऐहिकाचा ॥५५॥
म्हणुनी संबंधित म्हणती वेडे यांसी । लक्षोनी स्वार्थासी आपुलीये ॥५६॥
त्यांचा स्वार्थ न साधे म्हणुनी म्हणती वेडा । तत्त्वज्ञानी गाढा
असे हा कीं ॥५७॥
यांचा नसे त्रास इतर कवणा । असे बसुनी स्थाना आपुलिये ॥५८॥
इतर वेड्यांचेपासोनि अलिप्त । ठेविलें बाबांप्रत डॉक्टरांनीं ॥५९॥
सूज्ञ ते डॉक्टर समजले मनीं । योग्यता जाणोनी बाबांची ती ॥६०॥
दिव्य तेज कांती दिसे मुखावरी । मुद्रा ते खेचरी स्वीकारली ॥६१॥
दृष्टी अर्धोन्मिलित नित्य अंतर्मुख । भोगिताती सुख स्वरूपाचें ॥६२॥
ऐशा स्थितिंत गेलें एक वर्ष तेथ । मेंटल हॉस्पिटलांत बाबांचें तें॥६३॥
मग वासुअण्णा बाबांचे गुरुबंधू । बीडकर-मठीं संबंधू असे ज्यांचा ॥६४॥
बीडकर मठाचे हेडट्रस्टी ते कीं । करिती योजना निकी बाबांसाठीं ॥६५॥
वासुअण्णा भागवत आणि सबजज्ज गुप्ते । झाले योजिते ते उपायांसी ॥६६॥
पटवोनी समजूत त्या दुर्गाताईंची । करविती बाबांची सुटका तेव्हां ॥६७॥
आणिक दोन तीन स्नेही मदतीस । होते त्यांचे खास तये वेळीं ॥६८॥
देवोनियां हमी मनोरुग्णालयांत । आणिलें गृहाप्रत बाबांलागीं ॥६९॥
वासुअण्णा जाणती थोरवी बाबांची । न ये सर त्यांची आणिक कोणा ॥७०॥
पुनरपि हजर जाहले ऑफिसांत । परी नाहीं तेथ लक्ष त्यांचें ॥७१॥

कांहीं रजा घेणें कांहीं हजर होणें । ऐसेंचि वागणें होत असे ॥७२॥
ऐसें चालतांना क्लेश होती फार । पाठीशीं संसार असेची तो ॥७३॥
पुढें ठरविलें पेन्शन तें घ्यावें । इन्व्हॅलिड व्हावें म्हणोनियां ॥७४॥
सन एकोणीसशें अठ्ठावीस सालांत । बाबा ते भेटत सेक्रेटरीसी ॥७५॥
आणिक आपुल्या साहेबां भेटोन । दोघांसी वंदन केलें त्यांनीं ॥७६॥
सेक्रेटरी होता तो कीं युरोपिअन । पुसे तें कारण रजेचें कीं ॥७७॥
बाबा सांगताती विचार मीं केला । पेन्शन घेण्याला सिद्ध झालों ॥७८॥
अखेरचा नमस्कार वरिष्ठ साहेबांसी । तेवीं निज ऑफिसरासी
करिती बाबा ॥७९॥
म्हणती आतां जातों पेन्शनींत आम्हीं । लक्ष अमुचे कामीं असूं द्यावें ॥८०॥
रजा होवोनियां मंजूर बाबांची । झाली विश्रांतीची तरतूद ॥८१॥
इन्व्हॅलिड पेन्शनचा अर्ज त्यांनीं केला । अर्ज तो पोंचला कचेरींत ॥८२॥
वरिष्ठ डॉक्टरांनीं केली तपासणी । इन्व्हॅलिड म्हणोनी दिधला शेरा ॥८३॥
डॉक्टरी रिपोर्ट गेला ऑफिसांत । मान्य तो करीत सेक्रेटरी ॥८४॥
प्रमुख वरिष्ठ पी. डब्ल्यू. डी. चा । करी मान्य त्यांचा रिपोर्ट तो ॥८५॥
वरिष्ठ युरोपिअनसाहेब सेक्रेटरी । अर्ज तो स्वीकारी बाबांचा कीं ॥८६॥
त्याचीही नोकरी संपवोन तोही । जाणार स्वगेहीं युरोपांत ॥८७॥
आठ दहा दिवस उरली मुदत त्याची । जावया स्वदेशीं परतोनी ॥८८॥
परी सद्गुरु बाबा स्वयें अवतारी । महती त्यांची भारी असे थोर ॥८९॥
तयांचे पाठींशी उभे बीडकर । सदा सद्गुरुवर रामानंद ॥९०॥
त्यांचिये कृपेनें साहेबांचे मनीं । आलें तेव्हां झणीं करणें कार्य ॥९१॥
सर्व्हिस बुक आणि जरूर ते सारे । कागद केले त्वरें गोळा त्यानें ॥९२॥
इन्व्हॅलिड ठरवोन लिहिला रिपोर्ट । अनुकूल बाबांप्रत जो कीं फार ॥९३॥
समस्त जमवोन कागद जरूरीचे । पेन्शन-पेपरांचें काम केलें ॥९४॥
आर्. ए. सहस्रबुद्धे रावसाहेबांसी । द्यावें पेन्शनासी इन्व्हॅलीड ॥९५॥

म्हणोनियां शेरा स्वहस्तें मारोन । केस केली पूर्ण सेक्रेटरीनें ॥९६॥
शिक्कामोर्तब सही करोनि आपुली । केस पाठविली ए. जी. कडे ॥९७॥
अकौंटंट-जनरलासी भेटे सेक्रेटरी । जावोनी सत्वरीं जातीनें तो ॥९८॥
सहस्रबुद्धे यांचें ठरवोनि पेन्शन । सँक्शन करोन झणीं द्यावें ॥९९॥
ऐशी हे विनंती करोनी तयासी । पेन्शन सँक्शनासी करविलें ॥१००॥
संपूर्ण कागद सही शिक्क्यासहित । ए. जी. कडुनी घेत साहेब तो ॥१०१॥
पी. डब्ल्यू. डी. सेक्रेटरीएट ऑफिसांत । स्वयें तो आणीत
कागद सारे॥१०२॥
स्वहस्तें भरोनी सर्वही कागद । पाठवोनि देत बाबांकडे ॥१०३॥
कागद पाठवोन, देवोनि पेन्शन । झाला युरोपिअन स्वस्थचित्त ॥१०४॥
पेन्शन बसलें रुपये चौऱ्यांऐशीं । सद्गुरु बाबांसी सरकारांत ॥१०५॥
महागाई सहा रुपये एक आणा । म्हणोनि बाबांना मिळे मग ॥१०६॥
घेवोनि पेन्शन सेवामुक्त झाले । मनीं आनंदले सद्गुरु बाबा ॥१०७॥
सद्गुरु बाबांकडे धाडोनि कागद । साहेब झाला सिद्ध जावयासी ॥१०८॥
संपवोनि नोकरी बसला बोटीवरी । एक दोन दिनाउपरी साहेब तो ॥१०९॥
गेला तो साहेब परतुनी युरोपांत । पेन्शन बाबांप्रत देवोनियां ॥११०॥
सद्गुरु बाबांची नोकरी संपली । वांद्र्याची सोडिली जागा मग ॥१११॥
आले परतोन पुण्यासि ते तेव्हां । गुरुगृहीं बांधवां भेटायासी ॥११२॥
भिड्यांचे वाड्यांत बीडकर मठाजवळी । बिऱ्हाड ते काळीं मांडियेलें ॥११३॥
पुढें सद्गुरु बाबा कैसे ते वर्तले । जाईल कथिलें सप्तमाध्यायीं ॥११४॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । षष्ठाध्याया झाली पूर्तता ही ॥११५॥

**॥ षष्ठाध्याय समाप्त ॥**

# अध्याय सातवा

सकल विद्यांचें जें कीं आश्रयस्थान । आत्मरूप पूर्ण स्वयंभू तें ॥१॥
त्याच गणेशाचें करोनि स्मरण । तेचि सद्गुरुचरण-स्मरण असे ॥२॥
ज्यांचिये स्मरणें अवघी शब्दसृष्टि । येई निरवधी हातासी ती ॥३॥
शब्दमात्र सारें होवोनि अंकित । मनिंचें स्फुरण होत साकार तें ॥४॥
स्पष्ट सुयोग्य ते शब्द उमटती । होय अभिव्यक्ति विचारांसी ॥५॥
ज्याच्या चरण-स्मरणें मुख्य सरस्वती । बैसे जिव्हेवरती येवोनियां ॥६॥
वक्तृत्व तें होत गोड सर्वांलागीं । वक्तृत्वाचे अंगीं गोडी चढे ॥७॥
ज्याचिये स्मरणें स्थिरावें तें मन । आणि अंतःकरण स्थिरावतें ॥८॥
मार्मिकपणा तो बाणोनि वाचेसी । होत श्रोतयांसी प्रिय शब्द ॥९॥
सद्गुरुचरण हृदयीं स्थिर धरितां । ज्ञाना वभव येतां वेळू न लगे ॥१०॥
ऐसे जे परम पवित्र विमल । प्रभायुक्त कोमल सद्गुरुचरण ॥११॥
तया सद्गुरुचरणीं नमोनि आदरें । विनवीं प्रेमभरें साह्य व्हावें ॥१२॥
आपुली हे कथा मुखें बोलवावी । भक्तासी सुखवी ऐसी बापा ॥१३॥
परिसोनी वचन द्रवले ते चित्तीं । वासुदेवानंतसरस्वती सद्गुरु बाबा ॥१४॥
भिड्यांचे वाड्यांत वरुषें होतां तीन । जागा ती सोडोन दिधलीसे ॥१५॥
नारायणपेठेंत धुमाळ वाड्याप्रत । राहावया येत नंतर ते ॥१६॥
एकोणीसशें तीस एकतीस सालांत । धुमाळ वाड्यांत आले बाबा ॥१७॥
पहिले मजल्यावरी येवोनी राहिले । शेवटवेरी झाले स्थिर तेथें ॥१८॥
पहिल्या मजल्याची बहुतेक जागा । होती भाड्यानें गा बाबांकडे ॥१९॥
फक्त राजगुरु नामक ब्राह्मण । राहिले व्यापोन खोल्या दोन ॥२०॥
सर्वे दुर्गाताई बाबांची मंडळी । कन्या ती राहिली चिमणाबाई ॥२१॥
दुर्गाताई सारा करिती संसार । आणि व्यवहार पाहती सर्व ॥२२॥

कन्या ती सद्गुणी हांसे खेळे तेव्हां । बालकस्वभावा अनुसरोनी ॥२३॥
तये काळीं बाबा असती ध्यानमग्न । खोलींत बैसोन राहाती एका॥२४॥
अखंड तें ध्यान चाले स्वरूपाचें । नाहीं तें जगाचें भान कांहीं ॥२५॥
मनीं येतां जाती मठांत उठोन । ध्यावया दर्शन समाधीचें ॥२६॥
सदा ऊर्ध्व दृष्टी असे झांकोळली । खिन्न न दिसली मुद्रा कधीं ॥२७॥
सान थोर कोणी बीडकर-मठांतील । दिसतां त्याच वेळ नमिताती ॥२८॥
मठींचा पाणक्या भेटतां रस्त्यांत । त्यासी दंडवत करिती तेथ ॥२९॥
सान थोर कोणी मठींचें भेटतां । उल्हास तो चित्ता होय त्यांचे ॥३०॥
उचंबळुनी चित्तीं, धरोनियां पाय । नमिती सद्गुरुमाय म्हणोनियां ॥३१॥
ठायीं ठायीं त्यांसी दिसे आत्माराम । गेले धर्माधर्म निरसोनी ॥३२॥
सद्गुरु-स्वरूपीं बघती भूतजात । सहजीं वर्तत उन्मनींत ॥३३॥
जावा अहंकारू अवघाचि जळोन । म्हणुनि भक्ती वंदन स्वीकारिली ॥३४॥
वंदनभक्तीनें मान अपमान । जाती ते जिरोन आपेंआप ॥३५॥
नमितां भूतमात्रीं गळे अहंकार । नुरे सान-थोर ऐसा भावो ॥३६॥
धुरेचा हा असे भक्ति-योगू साचा । असे भगवंताचा निर्णयो हा ॥३७॥
सानपण घेतां जाई द्वैत सारें । निजानंदीं खरें रमतां येत ॥३८॥
वंदनभक्ती योगू दिसे हा कीं सान । परी हें साधन अती मोठें ॥३९॥
भक्तीवीण नोहे साध्य हा कीं योगू । गुरुकृपें मार्गू सांपडे हा ॥४०॥
बीडकरमठीं जातांच बाबांनीं । करणें रस्त्यामधुनी वंदनास ॥४१॥
प्रथम पायरीस देखतां नयनीं । नमस्कार झणीं करिती तेथ ॥४२॥
सकल पायऱ्या नमिलिया वरी । प्रवेशती भीतरीं मठामाजी ॥४३॥
बीडकर महाराजांचे बसावयाचे स्थानीं । जाउनी लोटांगणीं लोळती ते ॥४४॥
तेथोनी समाधी-कलशस्थानीं जाती । नाक तोंड घाशिती धरुनी कान ॥४५॥
करुनी नमस्कार करिती विनवणी । नयनीं धरोनी सद्गुरुरूप ॥४६॥

पुढें पलंगापाशीं जावोनी वंदन । वारंवार जाण करिती बाबा ॥४७॥
मला द्यावें ज्ञान मला द्यावी भक्ती । स्वरूपीं राहण्या युक्ती सांगावी गा ॥४८॥
अनाथाची माझी राखा आतां लाज । निवारावा माज अंहतेचा ॥४९॥
स्वरूपापासोनी एक निमिषभरी । लक्ष न होईल दुरीं ऐसें करा ॥५०॥
तुम्ही हो सद्गुरु स्वामी रामानंद । द्या मजसी आनंद अविनाशी ॥५१॥
नको मज कीर्ती नको तो कीं अर्थ । चुकवावा अनर्थ संसारींचा ॥५२॥
ठेवा अविरत तुमचे चरणांपाशीं । नका भवपाशीं गुंतवुं आतां ॥५३॥
क्षणोक्षणीं मग समाधीचे पुढें । रडावें तें कोडें करोनियां ॥५४॥
पुन्हां पुन्हां तेथ टेकोनी मस्तक । प्रार्थिताती एक सद्गुरुराज ॥५५॥
सेवा घ्या करोन माझे हातीं आतां । नका लोटूं ताता मजसी दूर ॥५६॥
रडावें हांसावें आनंदें नाचावें । सद्गुरु तुमच्यासवें सर्वकाळ ॥५७॥
ऐका विनवणी घेवोनियां कानीं । मज दीना जनीं तारावें कीं ॥५८॥
सद्गुरु बाबा मग उठती तेथोन । जाती राउळिं स्थान लक्षोनियां ॥५९॥
शिवालयद्वारीं साष्टांग नमोनी । मस्तक घासोनी करिती ध्यान ॥६०॥
काष्ठमय मूर्ती विठ्ठल-रखुमाईच्या । सजीव त्या साच्या दिसती त्यांसी ॥६१॥
करूनी नमस्कार त्यांचिये चरणांसी । प्रार्थिती तयांसी सर्वभावें ॥६२॥
आईसाहेबांसी तुम्ही सांभाळिलें । तेवीं मज वहिलें सांभाळावें ॥६३॥
स्वयंभू गणपती असे त्या स्थानांत । तया प्रणिपात करिती बाबा ॥६४॥
कारणिक असे हनुमंत मठांत । स्वयंभू जो होत मूळांतची ॥६५॥
तयासी वंदोन करिती प्रार्थना । मारुतिराया ज्ञाना देईं मज ॥६६॥
सद्गुरु रामानंद तुम्हां उपासिती । हनुमंत-कवच करिती पाठ नित्य ॥६७॥
ऊग्र तप त्यांचें देखोनि बलभीमा । केलें त्यांचे कामा रामदूता ॥६८॥
करितां अनुष्ठान घेवोनियां ध्यास । केलें प्रतिज्ञेस पूर्ण तुम्हीं ॥६९॥
सद्गुरु रामानंदीं सेवा करितां ऐशी । देसी दृष्टांतासी तयांलागीं ॥७०॥

देवोनी दृष्टांत पुरविला हेत । ऐसा वायूसुत प्रेमळ तूं ॥७१॥
अक्कलकोटीं जावें स्वामिदर्शन घ्यावें । तुवां प्रेमभावें निरोपिलें ॥७२॥
अक्कलकोट स्वामी सद्गुरूंचा शोध । देउनी रामानंद तोषविले ॥७३॥
मायलेकरांची करविली भेटी । संसारासी तुटी पाडावया ॥७४॥
तो तूं अंजनीसुत होवोनी प्रसन्न । माझें संरक्षण करीं आतां ॥७५॥
ऐशी ऐशी ते कीं करोनी प्रार्थना । घालिती लोटांगणा वारंवार ॥७६॥
भोळा शिवसांब जो कीं उमावर । तया वारंवार वंदिताती ॥७७॥
तया मृडानीवरा हिमनगजामाता । स्तविती एकाग्रचित्ता करोनियां ॥७८॥
प्रार्थितां शिवासी नयनीं लोटे नीर । स्वर सद्गद फार होवोनियां ॥७९॥
जोडोनियां हात करिती दंडवत । ललाट टेकीत भूमीवरी ॥८०॥
म्हणती भवांतका भवभयहारका । येईं त्रिपुरांतका धांवोनियां ॥८१॥
रामनामबीज तूंची जाणतोस । भक्त तूंची खास एकमेव ॥८२॥
सद्भक्ती पाहोन होसी तूं प्रसन्न । देसी वरदान निज भक्तां ॥८३॥
न मागें मी कांहीं गुरुभक्तीवीण । द्यावें वरदान हेंची मज ॥८४॥
माझी सद्गुरुभक्ती होवो दृढतर । आन तो विचार मनीं न यावा ॥८५॥
ऐसें वारंवार नमोनियां तेथ । प्रदक्षिणा करित शिवालयीं ॥८६॥
चंद्र सूर्य यांसी देखोनि नयनीं । तयांसी प्रार्थोनी निघती पुढें ॥८७॥
औदुंबरापाशीं येवोनी थांबती । आणीक करिती नमस्कार ॥८८॥
पाकशाळेमाजी जावोनियां येती । अन्नपूर्णा वंदिती तये स्थानीं ॥८९॥
वासुअण्णा भागवत तेव्हां हेडट्रस्टी । बीडकर मठीं असती तये वेळीं ॥९०॥
त्यांची पत्नी सुत मठींच राहती । बीडकरांप्रती सेवोनियां ॥९१॥
बाबा मग येती पुढील भागांत । वासुअण्णा बसत जये स्थानीं ॥९२॥
महाराजांचे स्थानीं हेडट्रस्टीलागीं । बघती स्वरूपरंगीं रंगोनियां ॥९३॥
तयांचे चरण धरोनी वंदिती । आणिक प्रार्थिती वारंवार ॥९४॥

म्हणती कृपा करा सांभाळा लेंकुरा । मायिकाचा वारा सारा दुरी ॥९५॥
सांगा महाराजांसी मज रक्षायासी । कराया कृपेसी विनवा तुम्ही ॥९६॥
दूर नका ठेवूं मज लेकुरातें । ऐसें सद्गदचित्तें प्रार्थिताती ॥९७॥
प्रसाद महाराजांचा द्या हो मज आतां । तेणें शांती चित्ता येईल गा ॥९८॥
नका पाहूं अंत व्हावें कृपावंत । ऐसें एसें वदत प्रेमभरें ॥९९॥
मठींच्या सकल वंदिती नरनारी । मस्तक पायांवरी ठेवोनियां ॥१००॥
मठींचे मांजरूं देखतां नयनीं । त्याचेही चरणीं लागताती ॥१०१॥
गवळी दूधवाला अथवा मोलकरीण । त्यासी करिती जाण नमस्कार ॥१०२॥
जे जे जीव कोणी बीडकर मठांत । तयां तयां वंदित सर्वत्रांसी ॥१०३॥
बैसोनियां मग समाधीचे पुढें । नयनीं रूप उघडें धरोनीयां ॥१०४॥
लागे ती समाधी नसे भान कांहीं । काळवेळ नाहीं शुद्धी तेव्हां ॥१०५॥
मग परतोनी स्वगृहासी जाती । जावोनी बैसती स्वानंदांत ॥१०६॥
वासुअण्णा भागवत शिष्य बीडकरांचे । ध्यान योगीं त्यांचें लक्ष थोर ॥१०७॥
तेही अधिकारी होते परमार्थांत । बाबांसी मानीत ते कीं फार ॥१०८॥
कडक स्वभाव दक्ष व्यवहारीं । मठ-कारभारीं लक्ष देती ॥१०९॥
यांनीं तन मन धन आपुलें तें सारें । बीडकरचरणीं कीं रे अर्पियेलें ॥११०॥
पंचवीस तीस सहस्र रुपयांचा हिस्सा । अर्पियेला खासा रामानंदां ॥१११॥
निस्पृह ते थोर आणि स्पष्टवक्ते । बघती व्यवस्थेतें बीडकर-मठीं ॥११२॥
यांची पत्नी प्रेमळ मायाळू ती भारी । मठीं सेवा करी सकळिकांची ॥११३॥
ऐशा कीं त्या काळीं तीनही त्रिकाळ । दर्शनां केवळ बाबा येती ॥११४॥
तीन वेळां दर्शन करोनियां जावें । इतर काळीं राहावें स्वस्थ गृहीं ॥११५॥
चिपळ्या आणि करीं घेउनी एकतारी । भजन करिती भारी
बाबा तेव्हां ॥११६॥

तासन्तास राहावें रंगोनी भजनांत । ना तरी समाधिस्थ स्वरूप
ध्यानीं ॥११७॥
अंगीं ज्वर असतां डिग्री पांच पांच । पत्ता नसे यांस त्याचा कांहीं ॥११८॥
बसुनी गादीवरी टेकोनि तक्क्यास । लक्षिती स्वरूपास सर्वकाळ ॥११९॥
कधीं कधीं जाती ॐकारेश्वरासी । घेती दर्शनासी शंकराचे ॥१२०॥
कधीं लहर ती लागतां बाबांची । उपासना सूर्याची करिती ते ॥१२१॥
सूर्योदयापासोनी सूर्यास्तापर्यंत । एकाग्र लावीत लक्ष बिंबीं ॥१२२॥
दृष्टी नच चळे उष्णतेचेयोगें । ध्यान न तें भंगे तीव्रतापें ॥१२३॥
राहोनियां उभे लक्षिती भानूसी । सूर्यमंडलासी भेदावया ॥१२४॥
भेद केला त्यांनीं सूर्यमंडलाचा । चैतन्य-भानूचा उदय झाला ॥१२५॥
तेथ ना उदय नाहीं तेथ अस्त । सहस्र भानू जेथ उदैजले ॥१२६॥
अनंत अपार तेजाचा सागर । शीतल तो फार चंद्रासम ॥१२७॥
पौर्णिमेचा चंद्र धरोनियां लक्षीं । लक्षिती अलक्षीं सद्गुरु बाबा ॥१२८॥
लौकिक चंद्रासी असे वृद्धी क्षय । तेथें चंद्र होय अक्षय तो ॥१२९॥
शीतल प्रकाशु ताप क्षयावीण । असे तें साधन अलौकीक ॥१३०॥
चंद्र सूर्यां जेथ होत मिसळणी । लाविती त्या स्थानीं लक्ष बाबा ॥१३१॥
खेचरी गोचरी आणि अगोचरी । मुद्रा परात्परीं लावियेली ॥१३२॥
चौवीस मुद्रांचे पैल निघुनी गेले । परब्रह्मीं मीनले असुनी देहीं ॥१३३॥
जनक राजानें जो योग साधिला । तोचि आचरिला बाबांनींही ॥१३४॥
स्वरूप-सांप्रदायी विहंगम-मार्ग । अष्टांग राजयोग पूर्ण झाला ॥१३५॥
मनाचा हा योग नोहे हठयोग । लक्षीं घ्या हें चांग भावीकांहीं ॥१३६॥
भगवान ते कृष्ण बोलले गीतेंत । चतुर्थ अध्यायांत अर्जुनासी ॥१३७॥
हा योगू धुरेचा कथिला मीं साचा । सूर्यालागीं ऐसा जाण पार्था ॥१३८॥
सूर्ये विवस्वता सांगितला योग । विवस्वतें चांग आचरीला ॥१३९॥

वैवस्वतें मग आपुले पुत्रासी । कथिला इक्ष्वाकूसी योग हाची ॥१४०॥
तेथोनी पुढती चाले परंपरा । राजर्षी आचारा करिती याच्या ॥१४१॥
परी त्या योगाचा पुढें लोपू झाला । म्हणोनि कथिला तुजसी आतां ॥१४२॥
ऐसा हा मानवा योगू हितकारी । आतां तूं आचरीं कुंतीसुता ॥१४३॥
करीं हा संसार धरोनियां धीर । स्वधर्म आचार नच सांडीं ॥१४४॥
असतां संसारांत करावा हा योगू । ऐसा कथाभागू श्रीहरि वदे ॥१४५॥
स्वरूप-संप्रदायीं हाचि मुख्य योगू । राजयोग मार्गू जाणावा कीं ॥१४६॥
प्रभू रामचंद्रा वसिष्ठ ऋषींनीं । दावीयेला झणीं आचरोनी ॥१४७॥
अंतरंगीं त्याग बाहेरी तो संग । परी तूं निःसंग राहीं पूर्ण ॥१४८॥
अवधूत-पंथी सरस्वती-शाखेंत । संप्रदाय वसत स्वरूपाचा ॥१४९॥
नृसिंह सरस्वती अक्कलकोट स्वामी । रामानंदां नामी उपदेशिती ॥१५०॥
देवोनी थप्पड दिधलें योगसार । ध्यानीं परात्पर भेटवीला ॥१५१॥
शक्तिपातयोगें लाविली समाधी । हरियेली आधी व्याधी त्यांची॥१५२॥
आणि बीडकरां दिधला अधिकार । चालवाया थोर योगू हाची ॥१५३॥
बीडकर महाराज चालविती त्यासी । कळाया जीवांसी संप्रदाय ॥१५४॥
स्वरूप-संप्रदाय श्रीराम दैवत । जानकी शक्ति येथ असे साची ॥१५५॥
हनुमंत-उपासना लावा सकळ जनां । पावाया निर्वाणा परब्रह्मीं ॥१५६॥
ऐशा ऐशा रीतीं उपासना होत । विदेहावस्थेंत वर्तताती ॥१५७॥
मुकुंदराव मोघे, गर्दे काशिनाथपंत । गुरुबंधू होत बाबांचे हे ॥१५८॥
शिवरामपंत खांडेकर आणि पुसाळकर । भिडे ते कीं थोर बापुसाहेब ॥१५९॥
डॉक्टर निरोखेकर जे कीं दत्तोपंत । गुरुबंधू होत बाबांचे कीं ॥१६०॥
श्रीमती बापट बाई त्या मठांत । गुरुभगिनी करित सद्गुरु-सेवा ॥१६१॥
नाना बापटांसी कृपा बीडकरांची । म्हणुनी हेडट्रस्टीची मिळे जागा ॥१६२॥

त्यांनीं लिहियेलें चरित्र बीडकरांचे । परि तें अच्युत मामांचें मुळांतील ॥१६३॥
पानवलकर अच्युतमामा अधिकारी । काय त्यांची थोरी वर्णावी ती ॥१६४॥
बाबांचे ते असती ज्येष्ठ गुरुबंधू । प्रेमाचा संबंधू उभयांचा ॥१६५॥
अण्णासाहेब गुप्ते आजी विद्यमान । पुण्यामाजी जाण वसती हे ॥१६६॥
देशपांडे दामुअण्णा बाबांचे गुरुबंधू । तुटला यांचा संबंधु इहलोकींचा ॥१६७॥
राजाभाऊ भिडे वसती कल्याणांत । विद्यमान असत आज ते कीं ॥१६८॥
ज्ञात व अज्ञात गुरुबंधू बाबांचे । असती किती कैसे देव जाणे ॥१६९॥
वरी जे कथिले ते ते बहुतेक । देखियेले देख डोळियांनीं ॥१७०॥
अच्युतमामा मात्र न देखिले डोळां । परि आला पडताळा सद्गुरुकृपे ॥१७१॥
रावसाहेब सद्गुरु वसतां पुण्यांत । कथिला वृत्तांत सुरवातीचा ॥१७२॥
उपासनामार्ग किंचित् विशद केला । गुरुबंधू नाममाला निवेदिली ॥१७३॥
संप्रदाय आणि योगाचा विचार । कथिला थोडा फार कळायासी ॥१७४॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । सप्तमाध्याया बरी पूर्ती झाली ॥१७५॥

॥ सप्तमाध्याय समाप्त ॥

# अध्याय आठवा

असे जो सद्गुरु सच्चिदानंदघन । विमलबोधू ज्ञानदाता जो कीं ॥१॥
जयजय परमानंदू सद्गुरु तो थोर । जीवा-शिवापर पुरुषोत्तमु ॥२॥
माया-ब्रह्म यांच्या पैल जो कीं वसे । सद्गुरुस्वरूप कैसें बोलूं शब्दीं ॥३॥
शब्दा जें कानडें दिक्कालातीत । जेथें नित्यानित्य आटुनि जाय ॥४॥
जयासी उपमा नसे जगीं कांहीं । अनुपम्य पाहीं सद्गुरुरूप ॥५॥
एक वेळां दिठीं पडुनी होतां भेटी । हरपे अवघी सृष्टी मायिक ही ॥६॥
अनुभवाविरहित असे नित्य स्थित । हृदीं जें वसत सर्वकाळ ॥७॥
तया श्रीसद्गुरु-स्वरूपी गजानना । करितों वंदना आत्मभावें ॥८॥
रावसाहेब बाबा तेचि कीं सद्गुरु । धरुनि सगुण आकारू आले जगीं ॥९॥
बीडकर महाराजांचें कार्य उर्वरीत । पूर्ण करण्या येथ प्रगटले ॥१०॥
एकोणीसशें तेरा सालीं एप्रिल मासीं । एक तारखेसी विपरीत घडले ॥११॥
बीडकर महाराजांनीं त्यजुनी पार्थिवासी । संपविलें यात्रेसी इहलोकींच्या ॥१२॥
त्यजोनियां देह ब्रह्मीं लीन झाले । तेव्हां हरपलें सगुण रूप ॥१३॥
बाबा नव्हते जवळी त्यांचे अंतकाळीं । नंतर हे कळली वार्ता त्यांसी ॥१४॥
वार्ता कळों येतां घेवोनी रजेस । पातेले पुण्यास सद्गुरु बाबा ॥१५॥
मांडियेला शोक अद्भुत बाबांनीं । एकचि धरुनी ध्यानीं सद्गुरुरूप ॥१६॥
अन्नपाणी वर्ज्य करोनि राहिले । अस्वस्थ ते झाले चित्तीं तेव्हां ॥१७॥
और्ध्वदेहिकाचें कार्य झाल्यावरी । बाबा नोकरीवरी हजर झाले ॥१८॥
बीडकर महाराजांनीं शांत केलें त्यांसी । ते वार्ता कवणासी न बोलती ॥१९॥
बाबांलागीं पूर्ण केलें बीडकरांनीं । स्वयें असतां जनीं देहामाजी ॥२०॥
रामानंद महाराज निवर्तल्यावरी । बसविती गादीवरी बहुतुल्यांसी ॥२१॥
अण्णा बहुतुले शिष्य बीडकरांचे । अधिकारी गादीचे झाले मग ॥२२॥

सद्गुरूंचे स्थानीं बाबा मानिति त्यांना । करोनि वंदना सर्वकाळ ॥२३॥
बहुतुले महाराज होते गादीवरी । द्वादश वर्षेंवेरी मठामाजी ॥२४॥
द्वादश वर्षांउपरी पावले पंचत्व । झालें आत्मतत्त्व ब्रह्मीं लीन ॥२५॥
त्यांनीं ट्रस्ट केला बीडकर मठाचा । कारभार साचा चालावया ॥२६॥
बीडकर महाराज झाले समाधिस्थ । वद्य त्या पक्षांत फाल्गुनांत ॥२७॥
साधीयेली दशमी भौमवार साचा । मार्ग निर्वाणाचा धरोनियां ॥२८॥
द्वादशवर्षांउपरी अण्णा बहुतुल्यांनीं । फाल्गुनमासीं झणीं त्यजिला देह ॥२९॥
वद्य ते दशमी तेची साधियेली । वेळा ही साधिली गुरूंचीच ॥३०॥
बहुतुले असती अधिकारी फार । करिती कारभार मठाचा तो ॥३१॥
तयांचे नंतर ट्रस्टी वासूअण्णा । व्यवस्था ती जाणा पाहताती ॥३२॥
बीडकर महाराजांच्या पत्नी जानकीबाई । शोभल्या त्या आईसम मठीं ॥३३॥
त्यांना सकळ शिष्य आईच म्हणती । त्याही प्रीती करिती मातेसम ॥३४॥
बाबांवरी त्यांची असे माया भारी । असतां मठाभीतरी रक्षिति प्रेमें ॥३५॥
गुरुपत्नीची ती बाबा सेवा करिती । तन मन धन खर्चिती त्यांचेसाठीं ॥३६॥
महाराज बोलतां कडक बाबांस । कैवार त्यांचा खास घेती आई ॥३७॥
बाबांच्या विवाहसमयीं आई होत्या । उपस्थित स्थळीं त्या विवाहाचे ॥३८॥
दुर्गाताई आणि बाबांसी लाधले । आशीर्वाद भले आईचे ते ॥३९॥
पत्नी बीडकरांच्या जानकीबाई गेल्या । त्यजोनी देहाला श्रावणमासीं ॥४०॥
एकोणीसशें अकरा सालीं सोमवारीं । प्रयाणा साधिली वेळ त्यांनीं ॥४१॥
त्याही वेळीं बाबा नव्हते कीं जवळी । पत्रांतोनि कळली वार्ता त्यांसी ॥४२॥
अतीव तें दुःख जाहलें बाबांसी । परी दूरदेशीं असती तेव्हां ॥४३॥
घेवोनी रजेसी पातले पुण्यासी । देण्या तिलांजलीसी दहावे दिवशीं ॥४४॥
और्ध्वदेहिक केलें अण्णा बहुतुल्यांनीं । माताच मानोनी गुरुपत्नीस ॥४५॥
सकल शिष्य गेले ओंकारेश्वरासी । दहावे दिवसासी पिंडदाना ॥४६॥

यथासांग कर्म करोनियां तेथ । पिंड तो ठेवीत स्मशानांत ||४७||
पिंडस्पर्श केला काकें तये वेळां । दिधलें तिलांजलिला सकळिकांनीं ||४८||
बाबा तिलांजली देवोनि परतले । परतोनि आले मठामाजी ||४९||
सकळ शिष्यजन आले ते मठांत । पात्रें भोजनाप्रत सिद्ध केलीं ||५०||
बीडकर महाराज सकळांसि सांगती । बसा भोजनाप्रती त्वरित आतां ||५१||
सकळही मंडळी बसली पात्रावरी । परी रीत न्यारी बाबांची ती ||५२||
बाबा एके बाजू जाऊनि बैसले । बोलायाचे झाले बंद तेव्हां ||५३||
शिष्य तेव्हां बीडकरां जावोनि सांगती । रावसाहेब न उठती भोजनासी ||५४||
महाराज आले जेथें होते बाबा । वदती चल तूं बा भोजनासी ||५५||
बाबा तेव्हां वदती महाराजांप्रत । दाखवा मजप्रत आई आतां ||५६||
दाखवावें मज आईसाहेबांसी । सगुणस्वरूपासी धरोनियां ||५७||
सगुण दर्शन घेतलीया वीण । मी ना तें करीन भोजन कीं ||५८||
हट्ट धरोनियां मारिली बैठक । उठती न देख कांहीं केल्या ||५९||
बीडकर महाराजांनीं धरिलें उग्र रूप । दिल्या शिव्या खूप बाबांलागीं ||६०||
मेलेलीं माणसें जिवंत का होती । कळेना तुजप्रती कैसें मूढा ||६१||
अतीव संतप्त होवोनी बोलती । अर्वाच्य वदती शब्द ते कीं ||६२||
जमदग्नीचा तो आणोनियां आव । दाविताती भाव कोपल्याचा ||६३||
तरीही न बाबा हलती तिळभरी । बोलती वैखरी, आई दावा ||६४||
आईचें दर्शन द्याहो लेंकुरासी । नातरी उपवासी राहीन मी ||६५||
कंटाळले सारे थकले बीडकर । म्हणती भराभर जेवा तुम्हीं ||६६||
रावसाहेब वेडा हट्टी असे फार । न करा विचार त्याचा कांहीं ||६७||
समस्त ते लोक भोजन सारोनी । घेताती जावोनी विश्रांतीसी ||६८||
खालीं घालोनियां मान ते बैसले । बाबा रुसलेले जैसे तैसे ||६९||
मग रामानंदीं काय केली गोठी । निरोपिलें शेवटीं शिष्यालागीं ||७०||

पाकशाळेमाजी मांडा पानें तीन । सर्वही वाढोन सिद्ध करा ॥७१॥
वाढोनियां सारें, व्हा तुम्हीं बाजूस । जेववीन त्यांस मीच आतां ॥७२॥
धरोनियां हात हळूच बाबांचा । वदती ते वाचा चल आतां ॥७३॥
तुज दाखवितों आई पाटावरी । करितां भोजन खरी तुजसंगें ॥७४॥
ऐकोनियां मात बाबा हरुषले । निमूटचि गेले भोजनासी ॥७५॥
सद्गुरुवचनीं धरोनी विश्वास । भोजनगृहास जाते झाले ॥७६॥
बीडकर आणि बाबा आंत गेले । बंद त्यांनीं केलें द्वार मग ॥७७॥
बसले बीडकर एका पाटावर । दुजिया पाटावर बसले बाबा ॥७८॥
परी न थांबती नयनीं अश्रुधारा । म्हणती शब्द करा खरा आतां ॥७९॥
घालुनी लोटांगण धरिले चरण । म्हणती न सोडिन दिसल्यावीण ॥८०॥
बघुनी दृढभाव सद्गुरु माउली । बहुत तोषली अंतरांत ॥८१॥
म्हणती 'रावसाहेब, माझा मोती दाणा । प्रसन्न त्याचे मना करितों आतां' ॥८२॥
बैसविलें पाटीं थोपटोनि हातीं । देवोनियां दृष्टी दिव्य ती गा ॥८३॥
आवाहन केलें मृत जानकीस । धरविलें रूपास स्वशक्तीनें ॥८४॥
सगुण साकार नटोन थटोन । आई त्या येवोन बसल्या पाटीं ॥८५॥
धांवोनियां मिठी घातली चरणीं । मग ती बाबांनीं क्षणामाजीं ॥८६॥
अश्रूंनीं धुतले चरण मातेचे । आणि दर्शनाचें सुख घेती ॥८७॥
बैसविला पाटीं धरोनियां हस्त । जेव रे त्वरित वदती बाळा ॥८८॥
एके पाटीं बसले तेव्हां बीडकर । दुसरे पाटावर जानकी माता ॥८९॥
मधलिये पाटीं बाबा स्थित झाले । त्रिवर्गीं सारिलें भोजनासी ॥९०॥
आई वदती तेव्हां शोक न करीं बाळा । मायेचा हा गोळा पंचतत्त्वीं ॥९१॥
देवादिकांलागीं सोडावाचि लागे । कवतिक काय सांगें मानवाचें ॥९२॥
नामरूपात्मक शरीराची आस । सोडोनियां ध्यास स्वरूपीं धरणें ॥९३॥
अनादि अनंत दिक्कालातीत । आत्मा विलसत स्वयंप्रभ ॥९४॥

तुझिये अंतरीं वसे निरंतर । ध्यानीं नित्य धर त्यासी बाळा ॥९५॥
नको करूं हट्ट नको मानूं क्लेश । सगुणाची आस सोडीं सोडीं ॥९६॥
तुज सद्गुरुनाथें केला परिपूर्ण । त्यजीं आवरण मायेचें हें ॥९७॥
नामरूपें नासती आत्मा तो अमर । पूर्ण परात्पर सद्गुरुनाथा ॥९८॥
तोचि तो सद्गुरु स्वयें आत्माराम । स्वरूपीं रमणें धर्म खरा हाची ॥९९॥
ऐसें हें ऐकोन करिती नमस्कार । बाबा ते सत्वर माताजींसी ॥१००॥
ऐकोनियां सारें अंतरीं तोषले । पुशिती त्यांचे डोळे रामानंद ॥१०१॥
दिधली आज्ञा त्यांनीं आईसी जावया । निघुनी अपुले ठाया मग तेव्हां ॥१०२॥
आज्ञा ती कीं होतां गुप्त झाली माता । आशीर्वाद पुता देवोनियां ॥१०३॥
मग सद्गुरु बाबा बीडकर-चरणांसी । वंदिती त्वरेंसी साष्टांगची ॥१०४॥
उमजलों आतां उमजलों आतां । हट्ट मी पुरता सोडियेला ॥१०५॥
आईचे ते शब्द धरिले अंतरीं । वर्तेन उत्तरीं आज्ञे ऐसा ॥१०६॥
गेला अहंकार विनटले चरणीं । पडोनियां धरणीं सद्गुरूंच्या ॥१०७॥
तैं रामानंद बहुत प्रेमभरें । उठविती त्वरें बाबांसी ते ॥१०८॥
कवळोनि धरिला शिष्य हृदयासी । बहू प्रेमें त्यासी बोलताती ॥१०९॥
बंडू आतां तुज नको दुजा भाव । दिधला माझा ठाव सर्वहि तुजला ॥११०॥
अहंकार तुझा घेतला मीं सारा । करुनी चमत्कारा तोषविलें ॥१११॥
मग गुरुशिष्य आले ते बाहेर । उघडोनि द्वार सहजपणें ॥११२॥
दोघे जण आंत परी पानें तीन । जेवलीं तीं पूर्ण तये काळीं ॥११३॥
चतुर्दश दिवसांचें सारें क्रियाकर्म । संपवोनि धर्म करिती मोठा ॥११४॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । पूर्ती झाली बरी अष्टमाध्याया ॥११५॥

॥ अष्टमाध्याय समाप्त ॥

# अध्याय नववा

सकळसुरांमाजी श्रेष्ठ सद्गुरुनाथा । तुम्ही हो वाटतां मजलागीं ॥१॥
जागवोनि प्रज्ञा नाशितां तिमिर । अज्ञानाचा थोर जीवांचा तो ॥२॥
ज्ञानरवीचा कीं करोनि उदय । सुखाची ती सोय दावीतसां ॥३॥
तुमचा जयजयकार करीतां वाणीनें । आनंदु तो वाणे तेणें मजमना ॥४॥
तुम्हीं हो जगाचें विश्रांतीचें स्थान । साक्षित्वें संपूर्ण विश्व चाले ॥५॥
"**अहं ब्रह्मास्मि**" या कथोनि मंत्रास । त्याची वाढ खास करितां तुम्हीं ॥६॥
आर्तां हात देतां तुम्ही संकटांत । दावोनियां सत्य मार्ग तो कीं ॥७॥
दयेचे सागर शोभे तुम्हां नाम । कल्याण परम करीतसां ॥८॥
अध्यात्माचे मार्गीं जीवां चालवोन । कैवल्य-निधान देतां त्यांसी ॥९॥
तुम्ही न दिसा ज्यांसी त्यांसी हें जगत । सत्यची वाटत अज्ञानानें ॥१०॥
परी जयालागीं दावितां स्वरूप । तयां मिथ्यारूप जगत कळे ॥११॥
उपजे सत्य ज्ञान जावोनि अज्ञान । आत्मतत्त्व खूण बाणोनियां ॥१२॥
आत्मानात्म त्यासी उपजे विचार । सत्य ज्ञान थोर ठायीं पडे ॥१३॥
तुझिये स्तवनीं पडती अपुऱ्या । चारी वाणी खऱ्या सद्गुरुनाथा ॥१४॥
तुमचा कृपाकर पडे ज्याचे माथां । त्या जीवा योग्यता चढे थोर ॥१५॥
ब्रह्मा विष्णु शिव तुम्हां आराधिती । लय स्थिती उत्पत्ती साधावया ॥१६॥
रवि आणि शशी तुझिये सत्तेनें । तेवीं मर्यादेनें प्रकाशती ॥१७॥
पंचमहाभूतें खाती एकमेकां । तव आज्ञें एका वसती ठायां ॥१८॥
अथांग जगतीं कवणा दाविसी माया । तेवीं बोधू सदया देसी कोणा ॥१९॥
मन आणि बुद्धी यांसी अगोचर । व्यापुनि चराचर अलिप्त तूं ॥२०॥
निद्रित तूं होसी तंव माया खेळे । ब्रह्मांडांचे गोळे कल्पोनियां ॥२१॥
जंव तूं प्रगट होसी तंव विलया जात । माया ती लोपत तुझिये रूपीं ॥२२॥

अखंड प्रकाशू चैतन्याचा दीपू । असशी निर्लेपू सर्वांतोनी ॥२३॥
शब्दीं कैसा वानूं महिमा सद्गुरुनाथा । मौनें चरणीं माथा ठेवियेला ॥२४॥
होवोनी निःशब्द जाहलों निवांत । वर्षीं कृपामृत झडकरी ॥२५॥
तुझें हें चरित्र तुवां बोलवावें । आणि तोषवावें सकळिकां ॥२६॥
ऐसे जे सद्गुरु बाबा रामचंद्र । जगतीं अवतार धरुनी आले ॥२७॥
त्यांचा उपदेश जीवां काय कैसा । तराया भवाचा सागरू हा ॥२८॥
जीव भांबावोन विसरोनि स्वरूपा । मानी नामरूपा सत्यचि तो ॥२९॥
अनित्य तें मानी नित्य सर्वकाळ । प्रवृत्तीचा खेळ खेळोनियां ॥३०॥
असतां आत्माराम हृदयीं रात्रंदिन । गेला विसरोन तयालागीं ॥३१॥
पंचभूतांचा हा नाशिवंत देह । तेथें धरितो भाव नित्य ऐसा ॥३२॥
असोनियां एक कल्पितो अनेक । न करी तो विवेक कदाकाळीं ॥३३॥
आशा तृष्णा इच्छा मोह आणि माया । पांच जणी जीवा या वेढीताती ॥३४॥
मुख्य ते वासना आणिक कल्पना । गांजिती जीवांना अपरंपार ॥३५॥
सप्त पाताळांसी सप्तही स्वर्गांसी । तेवीं भूलोकासी नाचविती ॥३६॥
मिथ्या अहंपण नसतेंच घेई । मी मी ऐसें पाहीं वदतसे ॥३७॥
मग मायासंगें कल्पोनियां द्वैत । न स्मरे अद्वैत आपुलें तें ॥३८॥
मी तूं मी तूं म्हणुनी धरी अभिलाष । करीतसे भाष संसाराची ॥३९॥
आणि कल्पों लागे कल्पनेचे संगें । तें तें तिसरें घे आकळोन ॥४०॥
मी तूं तें हें तीन मानोनियां नित्य । वाढवी अनित्य संसारू हा ॥४१॥
मन बुध्दी चित्त आणिक अहंता । यांसी जागविता म्हणे मीच ॥४२॥
नाना विषयांचे संगीं मानी सुख । जन्म मृत्यु दुःख स्मरेचि ना ॥४३॥
काम क्रोध लोभ आणिक तो दंभ । मद मत्सर स्वयंभ वाढवी तो ॥४४॥
चिळस न वाटे पचतां नरकांत । दुःखा न स्मरत ते ठायींच्या ॥४५॥
पंचप्राण देहीं मीच चाळविता । सकळीं माझी सत्ता ऐसें वदे ॥४६॥

दश इंद्रियांचे दहाही विषय । धरी तेथें सोय सुखासाठीं ॥४७॥
माता पिता बंधु आणिक भगिनी । सोयरीं हीं मानी जीवींचीं कीं ॥४८॥
कांतेवरी प्रेम करी प्राणाहोन । मेळवाया पूर्ण विषयसुख ॥४९॥
कांता दुहिता सुत म्हणे माझे माझे । वासनेचें ओझें वाढवीत ॥५०॥
नाना उदिम करी जातो बहुतचि ठायां । श्रमतसे वायां रात्रंदिन ॥५१॥
धन मान यांची करोनियां जोड । पुरवितो कोड इंद्रियांचें ॥५२॥
गेला विसरोन देहा असे मरण । जाणे तो सोडोन घडेल कीं ॥५३॥
विवेक विचार न करी अंतरीं । भक्ती ते न बरी स्वीकारीत ॥५४॥
सत्य ज्ञान जें कीं चुकवी जन्ममरण । स्वप्नींही स्मरण न करी त्याचें ॥५५॥
मदोन्मत्त होय असतां शरीरीं शक्ती । योजी नाना युक्ती अर्थासाठीं ॥५६॥
अनित्य जो अर्थ पाववी अनर्थ । त्याचे ठायीं स्वार्थ वाढवीतो ॥५७॥
न स्मरे हरीसी न करी पूजा-पाठ । सदैव ती ताठ ठेवी मान ॥५८॥
ऐसा भ्रमत असे येथें मायाजाळीं । परी न देखे जवळी असुनी हरी ॥५९॥
एसे जे कीं जीव भ्रमती संसारांत । होवोनियां त्रस्त तापत्रयें ॥६०॥
आध्यात्मिक आणि आधिभौतिक तो । ताप कीं गांजितो नाना रीतीं॥६१॥
आधिभौतिकाचा ताप होई फार । सोसवेना थोर तापत्रय ॥६२॥
नाना आधिव्याधी गांजिती जीवास । शारीरिक त्रास तैसे बहु ॥६३॥
मानसिक त्रास ताप देती फार । करोनी बेजार जीवालागीं ॥६४॥
भोगोनि तापांसी पावला जो क्षीण । मग तो नारायण आठवीत ॥६५॥
आर्त तो पीडित बहुत गांजला । सोडवी न त्याला तेव्हां कोणी ॥६६॥
मायेचीं पिसुणें सकळही जाती दूर । एकला हा थोर सोशी दुःख ॥६७॥
ऐसा जो पोळला संसारीं विटला । उपरती पावला अंतरीं जो ॥६८॥
अंतःकरणांतोनी प्रार्थी जो देवास । सोडवी तूं खास म्हणे आतां ॥६९॥
नको मायाजाळीं गुंतवूं मजला । आलों शरण तुला सर्वभावें ॥७०॥

म्हणे सद्गुरुनाथ तारीं तारीं आतां । बाधा कृपावंता मज दीना ||७१||
गेलें आयु माझें रमतां संसारांत । न केला परमार्थ कवणे काळीं ||७२||
अहंतेच्या योगें जाहलों उन्मत्त । पाहिलें न हित कैसें काय ||७३||
कोठोनि मी आलों कवण्या ठायीं जाणें । कां मज घडलें
येणें जगतांत ||७४||
पुढतीं मजला जन्म येईल कोठें कैसा । विचार मी ऐसा नच केला ||७५||
आतां सद्गुरुनाथा दावा मार्ग कांहीं । जेणें तरुनी जाईं भवाब्धी हा ||७६||
ऐसा जो शरण बाबांचे चरणीं । गेला जीव झणीं निरहंकारें ||७७||
तयासी तराया संसार-सागरीं । युक्ती ते सोपारी दावितांती ||७८||
पावोनियां थोर पश्चात्ताप आंत । झाला शरणागत चरणीं त्यांचे ||७९||
मग सान थोर म्हणती न त्यासी । मार्ग तरायासी दाविताती ||८०||
परी प्रथम पोटीं व्हावा अनुताप । मग आपेंआप दाविती वाट ||८१||
पाहोनि प्रारब्ध संचित जीवाचें । क्रियमाण त्याचें अवलोकिती ||८२||
कांहीं पुण्य गांठीं असतां पूर्वार्जित । कथित मार्ग हित व्हावयासी||८३||
दुर्जन दुराचारी दांभिक ते येतां । त्यांसी झिडकारितां वेळू न लगे||८४||
बहुत दिसांची साचलीसे घाण । दुर्गंधी सुटोन त्रस्त झालों ||८५||
निसटा निसटा आतां बैसूं नका येथ । वाटेसि लावीत वदुनी ऐसें ||८६||
परी पूर्व पुण्य ज्यांचें फळा आलें । त्यांसी जवळी केले बाबांनीं तें ||८७||
पाहोनियां भाव असे केवीं कैसा । देती त्यासी तैसा मार्ग ते कीं ||८८||
अधिकारासम देती उपदेश । न होती ते वश सहजासहजीं ||८९||
सर्व काळ असती स्वरूपीं रंगोन । देहा विसरोन सद्गुरु बाबा ||९०||
मार्ग हा बाबांचा असे कीं धुरेचा । विहंगम साचा म्हणती ज्यासी ||९१||
विहंगम म्हणजे उडुनी पक्षासम । गांठणें निजधाम आत्मयाचें ||९२||
एका निमिषामाजी पाहतां पाहतां । आत्मस्वरूपीं मिळतां वेळू नाहीं ||९३||

म्हणे सद्गुरुनाथ तारीं तारीं आतां । बाधा कृपावंता मज दीना ॥७१॥
गेलें आयु माझें रमतां संसारांत । न केला परमार्थ कवणे काळीं ॥७२॥
अहंतेच्या योगें जाहलों उन्मत्त । पाहिलें न हित कैसें काय ॥७३॥
कोठोनि मी आलों कवण्या ठायीं जाणें । कां मज घडलें
येणें जगतांत ॥७४॥
पुढतीं मजला जन्म येईल कोठें कैसा । विचार मी ऐसा नच केला ॥७५॥
आतां सद्गुरुनाथा दावा मार्ग कांहीं । जेणें तरुनी जाईं भवाब्धी हा ॥७६॥
ऐसा जो शरण बाबांचे चरणीं । गेला जीव झणीं निरहंकारें ॥७७॥
तयासी तराया संसार-सागरीं । युक्ती ते सोपारी दावितांती ॥७८॥
पावोनियां थोर पश्चात्ताप आंत । झाला शरणागत चरणीं त्यांचे ॥७९॥
मग सान थोर म्हणती न त्यासी । मार्ग तरायासी दाविताती ॥८०॥
परी प्रथम पोटीं व्हावा अनुताप । मग आपेंआप दाविती वाट ॥८१॥
पाहोनि प्रारब्ध संचित जीवाचें । क्रियमाण त्याचें अवलोकिती ॥८२॥
कांहीं पुण्य गांठीं असतां पूर्वार्जित । कथित मार्ग हित व्हावयासी॥८३॥
दुर्जन दुराचारी दांभिक ते येतां । त्यांसी झिडकारितां वेळू न लगे॥८४॥
बहुत दिसांची साचलीसे घाण । दुर्गंधी सुटोन त्रस्त झालों ॥८५॥
निसटा निसटा आतां बैसूं नका येथ । वाटेसि लावीत वदुनी ऐसें॥८६॥
परी पूर्व पुण्य ज्यांचें फळा आलें । त्यांसी जवळी केले बाबांनीं तें ॥८७॥
पाहोनियां भाव असे केवीं कैसा । देती त्यासी तैसा मार्ग ते कीं ॥८८॥
अधिकारासम देती उपदेश । न होती ते वश सहजासहजीं ॥८९॥
सर्व काळ असती स्वरूपीं रंगोन । देहा विसरोन सद्गुरु बाबा ॥९०॥
मार्ग हा बाबांचा असे कीं धुरेचा । विहंगम साचा म्हणती ज्यासी ॥९१॥
विहंगम म्हणजे उडुनी पक्षासम । गांठणें निजधाम आत्मयाचें ॥९२॥
एका निमिषामाजी पाहतां पाहतां । आत्मस्वरूपीं मिळतां वेळू नाहीं ॥९३॥

राजयोगामाजी असती पांच भेद । जे कीं शास्त्रशुद्ध वेदमान्य ॥९४॥
पिपीलिका म्हणिजे मुंगीसम जाणें । एक एक ओलांडणें कमल तें ॥९५॥
मूलाधारापासोनि सहस्रारावेरीं । ओलांडणें बरीं कमलें तीं ॥९६॥
दुजा कपिमार्ग असे उड्डाणाचा । सद्गुरु देत साचा किती एकां ॥९७॥
एका स्थानाहोनी त्यजुनी मधलीं स्थानें । उडी ती मारणें पुढिले स्थानीं ॥९८॥
कपीसम उड्डाणें घेतघेत जाणें । शेवटीं पावणें सहस्रदळीं ॥९९॥
तिजा मीनमार्ग असे कितीकांचा । ध्यानीं धरा त्याचा उपक्रम ॥१००॥
येथ ना कमळ नाहीं दुजें कांहीं । मीनासम पाहीं लक्ष्यीं दृष्टी ॥१०१॥
जीव हाचि मीन चैतन्यसागरीं । स्थित मध्यावरी होउनि असे ॥१०२॥
लावोनियां लक्ष आत्मस्वरूपांत । स्थित तो निवांत साधक राही ॥१०३॥
परमात्मस्वरूपाचा भरलासे सागर । व्यापोनियां थोर दश दिशा ॥१०४॥
ऐशा त्या सागरीं मीनासम जाणें । अंतर्बाह्य लक्षिणें आत्मतत्त्व ॥१०५॥
शेखीं चिदाकाश मिळतां महदाकाशीं । मीन सागराशीं एक होय ॥१०६॥
तेवीं तो चतुर्थ जाणा शांभवीचा । मार्ग साधकाचा असे उच्च ॥१०७॥
श्वासोच्छ्वासीं चाले जप सोऽहं सोऽहं । सांडोनियां अहं स्मरणें तोची ॥१०८॥
ध्वनीवरी लक्ष अखंड ठेवोन । दृष्टीं न्याहाळोन प्रकाशू तो ॥१०९॥
प्रकाश नादाची होतां ऐक्यावस्था । सोऽहं हं सः होतां न लगे वेळ ॥११०॥
याच मार्गें पुढती अनुभव घेवोन । प्रणव सांडोन होणें बिंदू ॥१११॥
बिंदुल्याचा मध्य जावें तो फोडोन । चिदाकाश पूर्ण आटे येथ ॥११२॥
सहस्रकमलांत जाई तेव्हां पाहीं । पसरोनि बाही सोऽहं भावें ॥११३॥
हं सः सोऽहं ऐसें होत उफराठी । विद्युल्लता दिठी सामावेना ॥११४॥
अनंत अपार प्रकाशू तो थोर । सहस्र भास्कर उणें जेथ ॥११५॥
शब्दीं न बोलवे कैसें तें वदावें । सद्गुरुकृपें ध्यावें जाणोनियां ॥११६॥
पिंडा पदीं येथ होत मेळवणी । साधली पर्वणी सायुज्याची ॥११७॥

हे सारे सगुण मार्ग जाणा तुम्हीं । निर्गुणाचे कार्मी उपयोगी ॥११८॥
खरा तो निर्गुण असे मार्ग शेष । विचार संधीस पाहणें जें कीं ॥११९॥
विचारू तो एक निघोनियां जात । दुजा उद्भवत मानसीं तो ॥१२०॥
दोन वृत्तींमाजी असे जें अंतर । तेंचि परात्पर स्वरूप जाणा ॥१२१॥
तया नाहीं रूप तया नाहीं नाम । असे पूर्णकाम सद्गुरु आत्मा ॥१२२॥
अंतरीं जाणीव ते घेणें ध्यानास । जाणीवेचें खास साक्षी होणें ॥१२३॥
मूळीं जेथोनियां प्रगटे संवेदना । जाणे त्याचि स्थाना शेखीं अंतीं ॥१२४॥
यावीण परमार्थ नाहीं तो कीं दुजा । गुरु पुत्र उमजा अंतरंगीं ॥१२५॥
आदिनाथ कथिती सव्वा लक्ष योगू । शब्दीं कैसे सांगू वर्णोनियां ॥१२६॥
सहजीं सद्गुरूंनीं जें कीं वदविलें । भेद हे कथिले प्रेरणेनें ॥१२७॥
मूळ स्वरूपांत नाहीं ते कीं भेद । आहे तें अभेद स्वयंप्रभ ॥१२८॥
नामें असती नाना परी वस्तू एक । आत्मस्वरूप देख म्हणती ज्यासी ॥१२९॥
आमुच्या शाखेंत स्वरूपसंप्रदाय । मुख्य हाचि होय बीडकरांचा ॥१३०॥
अधिकारियासी बाबा हा कीं देती । गुरुकृपें प्रचीती येई त्याची ॥१३१॥
शास्त्रीं जें लिहिलें गुरूंनीं दावियलें । अभ्यासितां भलें कळों येई ॥१३२॥
परी सद्गुरुकृपा जाहलियाविण । न फळे हा जाण मार्गू कवणा ॥१३३॥
वाचोनी करितां मग पस्तावणें । खुळे वेडे होणें घडे ऐसें ॥१३४॥
अनधिकाऱ्यासी मार्गू हा न देणें । शक्तिपात न करणें कच्च्या जीवां ॥१३५॥
करितां शक्तिपात जिरेना तो त्यांसी । न करी साधनासी चावट होय ॥१३६॥
प्रथम धर्माचारें करणें कर्म सारें । देहशुध्दी ती रे साधावी कीं ॥१३७॥
नित्य नैमित्तिक कर्मे आचरोन । फलेच्छा त्यजोन राहणें तेथ ॥१३८॥
ईश्वरनामस्मरण घेउनि करणें जप । दवडावें पाप येणें मार्गें ॥१३९॥
हरिनाम घेतां पुण्याई वाढतां । पाप सरूनी जातां वेळु न लगे ॥१४०॥
जोंवरि ज्ञानाचा मार्गू न मिळे हाता । तोंवरि कर्मपथा सोडों नये ॥१४१॥

ज्ञान झालें तरी कर्म ना सांडावें । ईश्वरीं अर्पावें सर्वस्वेंसी ॥१४२॥
विश्वासाठीं संतां करणें तप थोर । व्हावया उद्धार जड-मूढां ॥१४३॥
कर्माहंता नाहीं अपेक्षी ना फल । कर्मबंध सकळ गेले त्याचे ॥१४४॥
देह असे तंव कर्म तें न सुटे । वाउगें चावटें बोलों नये ॥१४५॥
देहीं चाले कर्म ज्ञानी तेथ नसे । ज्ञानें बंध त्याचे तुटुनी गेले ॥१४६॥
जरी व्हावा सद्गुरु वाटे जीवा फार । तरी स्वयें आचार सुधारावा॥१४७॥
यमनियमांचें करावें पालन । शम दम जाण पाळावे ते ॥१४८॥
स्थल काल देश पाहोनि वर्तणें । संगती धरणें सज्जनांची ॥१४९॥
संतांचा सहवास आश्रयो नामाचा । वैखरी नामाचा करणें घोषू ॥१५०॥
चारी वाणींमाजी उमटतां नाम । उमजाया वर्म न लगे वेळू ॥१५१॥
साधनचतुष्टयसंपन्न तें व्हावें । आणिक लागावें सद्गुरुचरणीं ॥१५२॥
कापुराची राशी जळतां वेळु नाहीं । लागे वेळु तोही ओल्या काष्ठा ॥१५३॥
कापुराची वाती उजळली ज्योती । झाली ते समाप्ती काजळीवीण ॥१५४॥
यमनियमादिक आचरोनि मग । साधावा तो योग आसनाचा ॥१५५॥
एक प्रहरवेळीं करणें आसनसिद्धी । सांडोनि उपाधि आधिव्याधी ॥१५६॥
न पडतां कष्ट आसनीं बैसणें । देह न हालविणें किंचितही ॥१५७॥
कळ ना लागावी कंड ना सुटावी । कांहीं न ती व्हावी हालचाल ॥१५८॥
घेवोनि आसन बैसावें त्यावरी । साधावी ती खरी आसनसिद्धी ॥१५९॥
ऊपरी प्राणायाम सद्गुरु कथिती तैसा । साधावा तो तैसा तया रीतीं ॥१६०॥
केवल कुंभक सिद्ध व्हावयासी । अनेक रीतीसी बोधिताती ॥१६१॥
केवल कुंभक होतां आपैंआप । प्राणापानीं चाप लागतसे ॥१६२॥
मूलबंध होय होय तो उडियान । जालंदर जाण तैसा होय ॥१६३॥
मुद्रा ते गोचरी किंवा ते खेचरी । कथिती सद्गुरु तरी करणें ती गा ॥१६४॥
बसुनी सहजासनी अलक्ष्यीं लक्षिणें । मुद्रा ती साधणें हेंचि मुख्य ॥१६५॥

मग प्रत्याहार यत्नें तो साधावा । मार्ग तो चालावा गुरुकृपें ॥१६६॥
गुरु सांगताती तेथें धरणें लक्ष । राहोनियां दक्ष अभ्यासांत ॥१६७॥
मन तेथोनियां जातां दुजे ठायीं । परतोनियां तेंही घेणें मागें ॥१६८॥
जाई जेथ जेथ तेथोनि ओढावें । निज खुण लावावें आणोनियां॥१६९॥
क्षणोक्षणीं हाचि यत्न तो करणें । प्रत्याहार जाणें नाम यासी ॥१७०॥
सांडोनि विषयांचा आहार मनाचा । देणें स्वरूपाचा चारा त्यासी ॥१७१॥
हाची प्रत्याहार गुरुकृपें साधितां । वेळु न लागे चित्ता बोध व्हाया ॥१७२॥
प्रत्याहारें तें कीं स्थिरावतां मन । राहे चिकटोन तेथेंचि तें ॥१७३॥
मग तें न उठे स्वरूपापासोनी । दृढ राहे धरुनी स्वरूपची ॥१७४॥
स्वरूपाची गोडी न सोडी सर्वथा । धारणा ती होतां वेळ नाहीं ॥१७५॥
दृढ ती धारणा होवोनियां ध्यान । लागलें संपूर्ण स्वरूपाचें ॥१७६॥
लागली मनासी स्वरूपाची गोडी । सांडोनी आवडी विषयांची ॥१७७॥
स्थिरावलें मन आणिक ती बुद्धि । हरली ते उपाधी अंतर्बाह्य ॥१७८॥
ध्यान तें लागलें अखंडित पाहीं । न सांडी कदाही धरिला ठावो ॥१७९॥
चित्त चैतन्यांत गेलें मिसळोन । स्फुरेना मीपण ऐसें झालें ॥१८०॥
पुसोनियां गेला अहंतेचा ठावो । मी-तूंपण वावो जाहलेंसे ॥१८१॥
ध्यान पक्व झालें मन तें मुरालें । स्वरूप भरलें अंतर्बाह्य ॥१८२॥
ध्याता ध्येय ध्यान झालें एकरूप । समाधीचें सुख आलें हाता ॥१८३॥
संकल्प विकल्प अवघा मावळला । कल्पनेचा झाला मोडू पुरा ॥१८४॥
मग अवघाचि भरलासे आत्मा । आत्मा-परमात्मा द्वैत गेलें ॥१८५॥
अखंडित मग सहज समाधी । विश्वीं पाहे दिठी आत्मरूप ॥१८६॥
अंतर्बाह्य दोन्हीं ठायीं आत्मा । पाहणें पाहाता नामा उरेचि ना ॥१८७॥
वरौता अवघा एकचि अभ्यासू । जाणीवेतें ध्यासू जाणीवेचा ॥१८८॥
जाणीव नेणीव दोन्हीं हारपलीं । ठायींच विराली कर्पूरज्योती ॥१८९॥

सद्गुरु ते बाबा मनाचा हा योगु । देती कणवा सांगू कृपा करुनी ॥१९०॥
कवणासी कथिती सगुण करा ध्यान । कवणा नामस्मरण घ्या रे म्हणती ॥१९१॥
जथा जया योग्य त्या त्या देवतेची । उपासना साची देती त्यांसी ॥१९२॥
कवणासी विष्णु कवणातें शंकरु । नामाचा निर्धारु निवेदिती ॥१९३॥
कवणा हनुमान कवणा तो श्रीराम । कवणा पूर्णकाम गजानन ॥१९४॥
कवणातें श्रीकृष्ण कवणा रुक्मिणीरमणा । दत्त तो जाणोन कथिती कोणा ॥१९५॥
कोणा भगवती कोणासि ते भक्ती । कोणातें बोधिती कर्मयोगू ॥१९६॥
संसारीं राहोनी करावें भजन । देवाचें स्मरण करा कांहीं ॥१९७॥
दक्षता धरोनी करावा संसार । न सांडा व्यवहार आपुलाले ॥१९८॥
कोणां गुरुभक्ती कोणां स्वामिसेवा । कोणां म्हणती गावा व्यंकटेश ॥१९९॥
पाहोनियां भाव वदती सद्गुराव । साधा रे वैभव आत्मारामीं ॥२००॥
बैसोनियां स्वस्थ संध्या हे साधावी । सायुज्यता घ्यावी मेळवोन ॥२०१॥
कवणा गुरुभक्ती दाविती उकलोन । कवणा सद्गुरुध्यान करा म्हणती ॥२०२॥
मुख्य तो सद्गुरु देवांचाहि देव । ऐसा दृढ भाव धरणें मुख्य ॥२०३॥
सद्गुरुवांचोनी कोणी न तारील । याचा अर्थ खोल ध्यानीं धरा ॥२०४॥
आसनीं बैसोनी स्वस्थ तें कीं व्हावें । मिटोनियां घ्यावे चर्म-चक्षु ॥२०५॥
मेरू दंड ताठ ठेवोनी बैसणें । सहजीं ते साधणें बंध तीन ॥२०६॥
बैसोनियां ऐसें बघणें आकाशांत । जें जें दिसे तेथ दिठीसी कीं ॥२०७॥
एक तारा अथवा नक्षत्र धरोन । धरावी ते खूण दृढतर ॥२०८॥
दिसेल तें पाहावें ध्यानीं तें धरावें । दिसे तोंवरी राहावें पहातची ॥२०९॥
सद्गुरुकृपेनें कवणा दिसे काय । ज्याची त्यानें सोय धरणें दृढ ॥२१०॥
ऐसें न्याहाळीत करावा अभ्यास । राहोनि उदास देहधर्मीं ॥२११॥
आहार विहार सात्त्विक ठेवावा । स्पर्शू तो न व्हावा रज-तमीं ॥२१२॥

शुद्ध सात्त्विक तें बाणावें अंतरीं । परमार्थ सत्वरीं साधे तेणें ॥२१३॥
परिमित निद्रा परिमित जागणें । परिमित सारे करणें व्यवहार ॥२१४॥
आचार विचार आणीक उच्चार । ऐक्य यांत फार असणें मुख्य ॥२१५॥
आराध्यदेवता नित्य उपासावी । नामस्मरणीं व्हावी वाढ सदा ॥२१६॥
भोजनाचे आधीं स्वस्थ तें बैसोन । अभ्यास करोन साधन साधा ॥२१७॥
साधा क्षणोक्षणीं आपुलालें हित । बाष्कळपणें मात न बोलावी॥२१८॥
परिमित बोलणें परिमित चालणें । परिमित अवघा करणें व्यवहारू ॥२१९॥
तनु मनु धनें करणें सद्गुरुसेवा । हाचि धर्म व्हावा जीवनाचा ॥२२०॥
ऐसें ऐसें बाबा मौनत्त्वें कथिती । उक्त जीवांप्रती होय जें जें ॥२२१॥
सत्यची बोलावें धर्मा सांभाळावें । आचार करावे शुद्ध तेची ॥२२२॥
हितकर ऐसें वदती ज्याचें त्यास । लाविती मार्गास योग्य जीवा॥२२३॥
ऐसे सद्गुरु बाबा जीवां साह्य होती । देवोनी प्रचीती स्वयें कांहीं॥२२४॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । नवमाध्याया झाली पूर्ती येथ ॥२२५॥

**॥ नवमाध्याय समाप्त ॥**

# अध्याय दहावा

विश्वाचा आभासू नाहींसा जो करी । अद्वैताची करी दीपवाळी ॥१॥
लौकिक सूर्यनिं विश्व प्रकाशितां । वाढे द्वैतावस्था फार फार ॥२॥
सद्गुरुस्वरूपी भानू उदया येतां । विश्वाभासू जातां न लगे वेळू ॥३॥
अद्वैत स्थितीचा करी जो विकास । सकलही मायाभास नाशोनियां ॥४॥
नाशोनियां सारी मायेची ती रात । चांदण्या नाशीत ज्ञानाज्ञान ॥५॥
ज्ञानियासी देत अध्यात्माचें ज्ञान । जागृती सुदिन करी जो कीं ॥६॥
ज्याच्या उदयानें आत्मज्ञान दृष्टी । मिळोनियां कष्टी होती न जीव ॥७॥
बुद्धि-बोधाचें जो करोनी मीलन । घडवी समाधान समरसतेचें ॥८॥
चिदाकाशगृहीं सद्गुरुस्वरूपी भानू । निजानंदीं ध्यानू घडवीत ॥९॥
सद्गुरुकृपें जाई उडुनी सारें द्वैत । भेद न रहात रेंसभरी ॥१०॥
साधक चालती आत्मानुभव-वाट । जावोनि पावत निजानंदीं ॥११॥
ज्याचिये कृपेनें लाधताति सिद्धी । भेटे निज हृदीं आत्मारामू ॥१२॥
ऐसा ज्ञान-भानू सद्गुरु रामचंद्र । त्यांसी नमस्कार सर्वभावें ॥१३॥
तोचि करोनियां दावी सारी लीला । वदवी चरित्राला आपुलीये ॥१४॥
सद्गुरु बाबा आणि दुर्गाताई यांसी । शकुंतला नामेंसी जाहली कन्या ॥१५॥
बालपणीं तिजसी लाडें वाढविलें । उपनाम दिधलें चिमणी ऐसें ॥१६॥
नाना लीला करूनी रिझवी माता-पितरां । दुःखाचा तो वारा लागुं न देती ॥१७॥
मराठी शिक्षण जाहलें शाळेंत । आंग्ल विद्या शिकत थोडी थोडी॥१८॥
सुंदर देखणी अव्यंग कन्यका । उपवर झाली देखा विवाहासी ॥१९॥
बाबा रंगुनी गेले आत्मस्वरूपांत । कष्टी संसारांत दुर्गाताई ॥२०॥
खटपट विवाहाची करणार कोण । चिंतामग्न मन मातेचें तें ॥२१॥
बाबांचे गुरुबंधू यांनीं खटपट केली । आणिक जोडली सोयरीक ॥२२॥

मोतीवाले लागू होते मदतीस । गुप्त्यांनी साह्यास केलें असे ॥२३॥
चिमणीचे चुलते वकील जुन्नरांत । हरीभाऊ म्हणत ज्यांसी लोक ॥२४॥
वर्धा नगरीचे कोंकणस्थ ब्राह्मण । जयां नामाभिधान खरे ऐसें ॥२५॥
वर नियोजिला खरे नीळकंठ । जो कीं ॲडव्होकेट वर्ध्यामाजी ॥२६॥
सुविद्य तो वर सुशील प्रेमळ । योजिला तात्काळ सकळांनीं ॥२७॥
सहस्रबुद्धे हरिभाऊ बंधू ते बाबांचे । देवक लग्नाचें ठेविती ते ॥२८॥
अंदाजें एकोणीसशें एकेचाळीस सालीं । विवाहाची झाली पूर्तता ती ॥२९॥
सद्गुरु बाबा बसले तेथेंच बाजूस । नेसुनी सोंवळ्यास पाटावरी ॥३०॥
दोहीं बाजूंचे ते वऱ्हाडी जमोन । लावियेलें लग्न शुभ वेळीं ॥३१॥
शकुंतला कन्या दिधली नीळकंठासी । विवाहहोमासी करोनियां ॥३२॥
झाली सप्तपदी सारे धार्मिक विधी । साधोनियां संधी मुहूर्ताची ॥३३॥
वरातीची दिधली करुनी बोळवण । नामगोत्र वर्जोन कुळ तेंही ॥३४॥
नीळकंठें ठेविलें नाम तें निर्मला । लक्ष्मीपूजन-सोहळा करोनियां ॥३५॥
नीळकंठांचे वडील तेही होते वकील । प्रसिद्ध सकळ वर्ध्यामाजी ॥३६॥
सधन गृहींचे आणि जमीनदार । आजोबा ते थोर नीळकंठांचे ॥३७॥
आजोबा ते होते थोर दत्तभक्त । खरे-गृहीं वसत पुण्याई ती ॥३८॥
बाबांचे जांवई वकिली करितात । वर्धा-कचेरींत सद्यःकाळीं ॥३९॥
वकिली चांगली चालते तयांची । आहे लक्ष्मीची कृपा त्यांसी ॥४०॥
सुखें ते संसार करिती वर्ध्यास । करूनी पोषणास कुटुंबाचे ॥४१॥
कुटुंबाचा भार मुख्य यांचे शिरीं । कुशल व्यवहारीं वर्तती हे ॥४२॥
स्वभाव तो गोडा मनमिळाऊ हीं । म्हणुनी मैत्री होई बहुतां ठायां ॥४३॥
यांसी कन्या तीन आणि दोन सुत । सुविद्य शिक्षित सर्वही तीं ॥४४॥
नीला नीरा संध्या कन्यांची हीं नामें । वसती त्या प्रेमें पितृगृहीं ॥४५॥
नीला दिधली असे बापटांचे कुळीं । पुत्र संतती झाली तिजला दोन ॥४६॥

नीरा नामें दुजी कन्या नागपुरास । दिधली पटवर्धनास सुसंपन्न ॥४७॥
तिजला एक कन्या असे ती सांप्रत । वकील ते असत यजमान ॥४८॥
संध्येचा विवाह होणें तो अद्याप । होईल आपेंआप त्वरितचि आतां ॥४९॥
नरेंद्र तो नातू असे कीं बाबांचा । बी. ई. व्हावयासी शिकतसे ॥५०॥
चित्रकला यासी असे अवगत । भक्तिमार्गी असत प्रीती यासी ॥५१॥
दुजा तो राजेंद्र नातू कीं बाबांचा । पुत्र नीळकंठांचा तरतरीत ॥५२॥
जाहला मॅट्रीक आतां कॉलेजांत । जातसे सांप्रत वर्ध्यासी तो ॥५३॥
बाबांचा गरुड असे यांचे घरीं । कृपा धरावरी असे त्यांची ॥५४॥
बाबांचें समाधि-स्थान जें पुण्यास । त्याची ही वारस असे मुलगी ॥५५॥
मालक म्हणुनी तीच असे त्या स्थानाची । जाणावी हे साची सत्य वार्ता ॥५६॥
खाजगी मालकीचें मुलीचें हें स्थान । सार्वजनिक जाण करावया ॥५७॥
पुण्यांतील कांहीं दुष्ट त्या लोकांनीं । केला दावा झणीं कोरटांत ॥५८॥
लीज-होल्डर म्हणुनी विठ्ठल गणेश जोशी । असती या स्थानासी, रजिस्टर ॥५९॥
कन्येपासोनियां बाबांचें घेतलें । जोशी यांनीं भलें भाड्यानें हें ॥६०॥
समाधि-मंदिर सुधारिलें त्यांनीं । घर तें बांधोनी भव्य तेथ ॥६१॥
सद्गुरु बाबांचे समाधि-मंदिर । म्हणुनी पाटी थोर लावियेली ॥६२॥
मुख्य प्रतिवादी करुनी विठ्ठलराव । दावा दुःस्वभाव धरुनी केला ॥६३॥
फिर्यादी ते होते एस्. आर्. आंबेकर । होते समाधीवर महिने सहा ॥६४॥
त्यांचे संगतीस दुजे ते बहूत । ज्यांचे हेतू नसत बरोबर ॥६५॥
दुय्यम प्रतिवादी निर्मलाबाईस । केलें त्यांनीं खास कोर्टामाजी ॥६६॥
प्रभाकर जोशी, चितळे माधव । फडके वसंतराव विरुद्ध कीं ॥६७॥
असिस्टंट चॅरिटी कमिशनरांचे । कोर्टांत हें साचें चाले काम ॥६८॥
हुपरीकर नामें होते ते साहेब । बहुतचि त्यांचा आब कचेरींत ॥६९॥
साडेतीन वर्षे खटला हा चालला । शेखीं निर्णय झाला कचेरींत ॥७०॥

सद्गुरु बाबांचे समाधि-मंदिर स्थान । खासगी तें पूर्ण म्हणुनी ठरलें ॥७१॥
निर्मलाबाईच्या खाजगी मालकीचें । म्हणुनी ठरलें साचें स्थान हें कीं ॥७२॥
ऐसा हा फैसल्ला झाला कचेरींत । पराजय होत फिर्यादींचा ॥७३॥
स्थानांत राहोन फिरले स्थानावरी । ऐसे उपकारी आंबेकर ॥७४॥
त्यांची वाताहात होवोनियां गेली । इष्टेट घेतली सावकारांनीं ॥७५॥
नादार होवोनि बसले आंबेकर । राहण्या नाहीं घर ऐसें झालें ॥७६॥
दुष्ट बुद्धीचा हा घ्या हो पडताळा । धरा वेळोवेळां मानसांत ॥७७॥
बाबांच्या कन्येचें माहेर हक्काचें । स्थान सद्गुरूंचें पुण्यांत हें ॥७८॥
तेथें नित्य होत पूजा अर्चा सारी । अभिषेक पादुकांवरी बाबांच्या कीं ॥७९॥
गणपति अथर्वशीर्ष श्रीसूक्त रुद्र । अभिषेक फार होत यांचा ॥८०॥
पवमान आणि सौराची आवृत्ती । होत ती निगुती प्रतिदिनीं ॥८१॥
सप्तशती-पाठ एक नित्य होत । हनुमान-कवच वाचित दररोज ॥८२॥
श्रीगुरुचरित्र श्रीगुरुलीलामृत । आणि नवनाथ वाचिती रोज ॥८३॥
वैश्वदेव आणि त्रिसुपर्णासाठीं । ब्राह्मण पाचारिती भोजनास ॥८४॥
श्रीसूक्ताचें होई हवन प्रतिदिनीं । गणपति अथर्वशीर्ष म्हणोनि हवन होत ॥८५॥
भक्तजनांचीं तीं चालती अनुष्ठानें । सविस्तर लिहिणें दुरापास्त ॥८६॥
कार्तिक पौर्णिमेस सद्गुरु बाबांचा । जन्मोत्सव खासा चालतसे ॥८७॥
पालखी सोहळा जन्मोत्सव कीर्तन । करिती भक्तजन प्रेमभरें ॥८८॥
विठ्ठलराव जोशी शिष्य ते बाबांचे । कीर्तन जन्मोत्सवाचें करिताती ॥८९॥
बहात्तर तास चाले नामस्मरण । अविरत पूर्ण उत्सवांत ॥९०॥
प्रतिदिनीं लघुरुद्र अभिषेक होत । मूर्ती सजवितात बाबांची ती ॥९१॥
सद्गुरु बीडकर महाराजांची मूर्ती । तीही बैसविती बाबांसंगें ॥९२॥
अक्कलकोट स्वामी समर्थांची मूर्ती । भक्त बैसविती बाबांसंगें ॥९३॥
करूनी रोषणाई विजेच्या दिव्यांची । शोभा बहुतची वाढविती ॥९४॥

मंदिर-परिसरांत घालिती मंडप । भव्य तें कीं माप मंडपाचें ॥९५॥
लांब लांबोनियां बहु भक्त जन । उत्सवा येवोन करिती सेवा ॥९६॥
वैदिक ब्राह्मणांचे मंत्रजागर होती । विद्वान वैदिकांप्रती निमंत्रोनी ॥९७॥
शास्त्री आणि संत यांचीं प्रवचनें । उत्सवाकारणें असती रोज ॥९८॥
भक्त जन वाचिती धार्मिक ग्रंथांसी । करिती सोहळ्यासी आनंदानें ॥९९॥
पालखी बाबांची भव्य ती सजवोन । त्रयमूर्ती जाण ठेविती आंत ॥१००॥
सायंकाळीं आरती जाहल्यानंतर । सोहळा तो थोर पालखीचा ॥१०१॥
बहुत भक्तजन करिती भजनास । टाळ-मृदुंगांस वाजवोनी ॥१०२॥
पालखीच्या पुढें भजनाची दिंडी । भक्तगण मांडी परमानंदें ॥१०३॥
अभंग ते गाती उत्साहें नाचती । नामघोषीं जाती रंगोनियां ॥१०४॥
मंदिराभोंवती प्रदक्षिणा तीन । घालिती प्रतिदिन उत्सवांत ॥१०५॥
पालखीच्या सवें छत्री अबदागीर । पुढें दंडधर चालताती ॥१०६॥
चवऱ्या मोरचेलें आणिक ते पंखे । घेउनी भक्त हरिखें करिती सेवा ॥१०७॥
नाचती धरुनी फेर, विसरुनी देहभान । सकलही भक्तजन तये काळीं ॥१०८॥
प्रातःकाळापासुनी सायंकाळावेरी । सकलही हर्षें भारी करिती सेवा ॥१०९॥
चहा पाणी आणि अल्प उपाहार । भक्तांसाठीं फार असे सज्ज ॥११०॥
दोन प्रहरास आणिक रात्रीस । महाप्रसाद खास होत असे ॥१११॥
कीर्तन तें होत प्रथम तृतीय दिनीं । रात्रीं बंधू भगिनी मिळोनियां ॥११२॥
कीर्तनाची सेवा करिती विठ्ठलराव । चरणीं ठेउनी भाव बाबांचिये ॥११३॥
जन्मोत्सव-दिनीं रात्रीचे समयास । काढिती छबिन्यास भक्तजन ॥११४॥
प्रथम चौघडा आणिक वाजंत्रीं । उच्च नाद करी शिंगाड्या तो ॥११५॥
त्याचीये पाठीशीं जरीपटका निशाण । घेउनि भक्तजन खडे होत॥११६॥
पालखीच्या पुढें उडविती दारू । शोभा ती अपारू वर्णवे ना ॥११७॥
चंद्र सूर्य आणि गरुड हनुमंत । टके झळकत भक्तांहातीं ॥११८॥

निशाणें लावोनि भक्त नाचताती । मुखानें गर्जती सद्गुरुनाम ॥११९॥
पालखीचे पुढें भक्तांची ती दिंडी । नाचे निरवधी प्रेमभरें ॥१२०॥
गावोनी अभंग करिती जयजयकार । बाबांचा तो थोर वारंवार ॥१२१॥
टाळ मृदुंगांनीं असे दिंडी युक्त । उत्साहें नाचत स्वानंदानें ॥१२२॥
नसे कोणासीही तेथ देहभान । सकळां एकचि ध्यान सद्गुरूंचें ॥१२३॥
दिंडीचे मागुती गरुड हनुमान । घेउनी उभे जाण मोदें भक्त ॥१२४॥
आणि दंडधारी घेवोनियां दंड । करिताती उदंड जयजयकार ॥१२५॥
शंखांचा तो नाद निनादे अंबरीं । मुदित तेणें बरी वृत्ती होय ॥१२६॥
मागें सजवोनी भव्य पालखीस । धरिती ती खांद्यास भक्तजन ॥१२७॥
आंत त्रयमूर्ती असती बैसल्या । दर्शन देती सगळ्या भाविकांसी ॥१२८॥
पालखीचे पुढें आणि पाठीमागें । भक्तजन उभे रक्षणासी ॥१२९॥
त्यांचिये मागुती माय भगिनी येती । बहुतचि असती श्रद्धायुक्त ॥१३०॥
त्याही करिती भजन नाम उच्चारोन । होवोनी तल्लीन सद्गुरुभजनीं ॥१३१॥
त्यांचे मागें असती रक्षणार्थ लोक । मोटारी अनेक असती संगें ॥१३२॥
निघोनी छबिना चाले मिरवत । ठायीं ठायीं येत भक्त-मेळा ॥१३३॥
सुवासिनी येती घेवोनी आरत्या । मार्गी बहूत त्या श्रद्धायुक्त ॥१३४॥
ओवाळुनि आरती त्यांसी प्रसाद देती। बहु भक्तां वाटिती प्रसादतो ॥१३५॥
ज्ञानेश्वर-पादुका-मंदिरमार्गामाजी । तेथें आरती-काजीं पालखि तिष्ठे ॥१३६॥
करोनी आरती तुकया ज्ञानेशांची । करिती प्रसादाची विखुरणी ॥१३७॥
तीन साडेतीन कलाकापर्यंत । छबिना मिरवत येत मंदिरासी ॥१३८॥
मार्गी पाच सात नारळ ओवाळोन। टाकिती पालखिवरून उतार्‍यार्थ ॥१३९॥
मंदिरासि येतां परतोनियां दिंडी । भक्तजन मांडी गजरू थोर ॥१४०॥
मंदिराचे द्वारीं महाद्वारापाशीं । उभे पालखीसी करितात ॥१४१॥
प्रथम दहींभात आणिक नारळ । ओवाळुनि सत्वर टाकिताती ॥१४२॥

उपरी सुवासिनी घेउनि दूधपाणी । पादप्रक्षाळणी करिती मग ॥१४३॥
पांच सुवासिनी घेउनि पंचारति । करिती औक्षणाप्रति सद्गुरूंसी ॥१४४॥
ऐसा छबिन्याचा सोहळा होवोन । जात भक्तजन भोजनासी ॥१४५॥
भोजनानंतर घेताती विश्रांती । थकोनियां जाती म्हणुनी भक्त ॥१४६॥
छबिन्याचे सर्वे सरकारी पोलिस । असती रक्षणास खास ते कीं॥१४७॥
बक्षीस-समारंभ होय तिसरे दिनीं । स्पर्धकां लागोनि बक्षिसें देती ॥१४८॥
पाठांतर आणि वक्तृत्वही तैसें । नियोजन ऐसें मंडळ करित ॥१४९॥
तेवीं वक्तृत्वाची करुनी चढाओढ । परीक्षा ती गोड ठेविताती ॥१५०॥
पारितोषिकें तीं देती क्रमांकानें । तेणें स्पर्धक मनें उल्हासती ॥१५१॥
तृतीय दिनीं अखंड रात्रीसी कीर्तन । होवोनियां जाण लळीत होई ॥१५२॥
सूर्योदयाउपरी कीर्तन संपत । नारळ प्रसाद मिळत सकळिकांसी ॥१५३॥
आणिक उत्सवाची होतसे सांगता । तेणें होत भक्तां समाधान ॥१५४॥
सकळ भक्तांसाठी सद्गुरूंचे चरणीं । प्रार्थना करोनी गर्जताती ॥१५५॥
ऐशा उत्सवाची सांगता ती होत । भक्तजन जात निजगृहासी ॥१५६॥
आतां ते करीन मुख्य निरूपण । उत्सव किती पूर्ण होती स्थानी॥१५७॥
सद्गुरु बाबांची पुण्यतिथी होत । श्रावण मासांत वद्य पक्षीं ॥१५८॥
संकष्टी चतुर्थी धरुनी सद्गुरु बाबा । समाधी घेती गा श्रावणमासीं ॥१५९॥
सन एकोणीसशें चौपन्न सालांत । अठरा ऑगस्टांत समाधी घेत ॥१६०॥
बारा वाजोनियां अठ्ठावीस मिनिटांनीं । सद्गुरु बाबांनीं त्यजिला देह ॥१६१॥
मध्यरात्रीचा तो समय कीं होता । निवर्तोनि जाता सद्गुरुराय ॥१६२॥
अठराशें शहात्तर शालिवाहन शक । होता तो कीं देख तये वेळीं ॥१६३॥
त्यजुनि पार्थिव देह अनंतीं मिळाले । वासुदेवानंत झाले स्वरूपीं लीन ॥१६४॥
भक्तजनीं केला अर्ज कलेक्टरासी । चिनमुलगुंद त्या समयासी कलेक्टर ॥१६५॥
जाणती कीं पूर्ण बाबांसी ते जाणा । परवानगी भक्तांना दिधली त्यांनीं ॥१६६॥

बक्षीस मिळालेल्या त्यांचे जागेवर । दहनाची सत्वर दिधली आज्ञा ॥१६७॥
पुणें म्युनिसिपालटीनें संमती देवोन । दाखविलें स्थान दहनासी ॥१६८॥
खंडेराव वाघ पुण्याचे नागरिक । त्यांनीं दिधली एक बक्षीस जागा ॥१६९॥
ज्ञानेश्वरपादुकांजवळी असे स्थान । पुणें सोळा जाण म्हणती आतां ॥१७०॥
मिळे परवानगी भक्तजनांलागीं । मिरवणूक अंगी काढिती मग ॥१७१॥
परवानगीचे कामीं अण्णासाहेब गुप्ते । आणि प्रमुख होते प्र. पु. जोशी ॥१७२॥
अंत्ययात्रा येत ओंकारेश्वरासी । केसरी ऑफिसपाशीं त्यानंतर ॥१७३॥
तेथोनियां आली संभाजी पुलास । ओलांडोनि त्यास जाती पुढें॥१७४॥
फर्ग्युसन कॉलेज-रस्त्यावरूनी पुढती । ज्ञानेश्वर-चौकांतुनि येती समाधिस्थानीं ॥१७५॥
बहू भक्तजन जमले त्या काळीं । महायात्रा आली इष्ट स्थानीं ॥१७६॥
सद्गुरु बाबांचे सेवेसाठीं एक । बीडकर देख सेवक देती ॥१७७॥
नरहर भानुदास काळे या नांवाचा । सेवक तो साचा असे जाणा ॥१७८॥
काळे हे देशस्थ असती यजुर्वेदी । प्रूफ करेक्टर असती 'केसरी' माज ॥१७९॥
आतां ते निवृत्त झाले केसरींतून । स्वगृहीं राहोन करिती सेवा ॥१८०॥
शिष्य हे विश्वनाथ चैतन्य स्वामींचे । केसकर महाराजांचे असती जाणा ॥१८१॥
बाबांचे हे शिष्य खचीत नाहींत । सत्य गोठी येथ लिहिणें आली ॥१८२॥
सद्गुरु रामानंदीं देवोनि प्रेरणा । दिधले त्यां जाणा बाबांपाशीं ॥१८३॥
पूर्व अवतारींचा जाणोनी सेवक । सेवेलागीं देख पाचारिला ॥१८४॥
नाहीं राग द्वेष मनांत तो कांहीं । वदलों सत्य तेही गोठी येथ ॥१८५॥
अंदाजें बत्तीस तेहतीस सालामाजीं । सेवेचिये काजीं पातले हे ॥१८६॥
बीडकर मठांत केसकरमहाराजांसी । नेउनी श्रीफलासी ठेवियेलें ॥१८७॥
समाधीचे पुढें ठेवोनि श्रीफल । प्रार्थिले दयाळ रामानंद ॥१८८॥
तुमची हे आज्ञा मानोनि प्रमाण । सेवेसाठीं जाण दिधला यासी ॥१८९॥
ऐसा विधी करुनी जाहले सेवक । नरहरि काळे एक बाबांपाशीं ॥१९०॥

बक्षीस मिळालेल्या त्यांचे जागेवर । दहनाची सत्वर दिधली आज्ञा ॥१६७॥
पुणें म्युनिसिपालटीनें संमती देवोन । दाखविलें स्थान दहनासी ॥१६८॥
खंडेराव वाघ पुण्याचे नागरिक । त्यांनीं दिधली एक बक्षीस जागा ॥१६९॥
ज्ञानेश्वरपादुकांजवळी असे स्थान । पुणें सोळा जाण म्हणती आतां ॥१७०॥
मिळे परवानगी भक्तजनांलागीं । मिरवणूक अंगी काढिती मग ॥१७१॥
परवानगीचे कामीं अण्णासाहेब गुप्ते । आणि प्रमुख होते प्र. पु. जोशी ॥१७२॥
अंत्ययात्रा येत ओंकारेश्वरासी । केसरी ऑफिसपाशीं त्यानंतर ॥१७३॥
तेथोनियां आली संभाजी पुलास । ओलांडोनि त्यास जाती पुढें॥१७४॥
फर्ग्युसन कॉलेज-रस्त्यावरुनी पुढती । ज्ञानेश्वर-चौकांतुनि येती समाधिस्थानीं ॥१७५॥
बहू भक्तजन जमले त्या काळीं । महायात्रा आली इष्ट स्थानीं ॥१७६॥
सद्गुरु बाबांचे सेवेसाठीं एक । बीडकर देख सेवक देती ॥१७७॥
नरहर भानुदास काळे या नांवाचा । सेवक तो साचा असे जाणा ॥१७८॥
काळे हे देशस्थ असती यजुर्वेदी । प्रूफ करेक्टर असती 'केसरी' माज ॥१७९॥
आतां ते निवृत्त झाले केसरींतून । स्वगृहीं राहोन करिती सेवा ॥१८०॥
शिष्य हे विश्वनाथ चैतन्य स्वामींचे । केसकर महाराजांचे असती जाणा ॥१८१॥
बाबांचे हे शिष्य खचीत नाहींत । सत्य गोठी येथ लिहिणें आली ॥१८२॥
सद्गुरु रामानंदीं देवोनि प्रेरणा । दिधले त्यां जाणा बाबांपाशीं ॥१८३॥
पूर्व अवतारींचा जाणोनी सेवक । सेवेलागीं देख पाचारिला ॥१८४॥
नाहीं राग द्वेष मनांत तो कांहीं । वदलों सत्य तेही गोठी येथ ॥१८५॥
अंदाजें बत्तीस तेहतीस सालामाजीं । सेवेचिये काजीं पातले हे ॥१८६॥
बीडकर मठांत केसकरमहाराजांसी । नेउनी श्रीफलासी ठेवियेलें ॥१८७॥
समाधीचे पुढें ठेवोनि श्रीफल । प्रार्थिले दयाळ रामानंद ॥१८८॥
तुमची हे आज्ञा मानोनि प्रमाण । सेवेसाठीं जाण दिधला यासी ॥१८९॥
ऐसा विधी करुनी जाहले सेवक । नरहरि काळे एक बाबांपाशीं॥१९०॥

तैंपासोनियां अंतकाळावेरी । सेवेची चाकरी करित होते ॥१९१॥
देह त्यजायाचे आधीं वर्षें दोन । बाबा वदती जाण काळे यांसी ॥१९२॥
महाराजांची आज्ञा मानोनि प्रमाण । घेतलें ठेवोन तुजसी येथ ॥१९३॥
माझ्याकडिल काम तुझें तें संपलें । परतुनी जावें भलें निजगुरूपाशीं ॥१९४॥
निघोनियां जावें केसकरांपाशीं । सांगती त्या रीतीसीं वर्ता पुढती ॥१९५॥
केसकर महाराज यांसी होते पाचारीत । परी काळे नच जात तयांकडे ॥१९६॥
बाबांनीं टोंचविले स्वचःचे ते कान । पश्चात्ताप मानोन काळ्यांसाठीं ॥१९७॥
हे गोठी घडली बावन् त्रेपन्नांत । असे ही विदित बहुतांसी ॥१९८॥
चिता ते रचोनि देह तो बाबांचा । चितेवरी साचा ठेवियेला ॥१९९॥
चंदन कापूर द्रव्यें सुगंधित । घालिती चितेंत भक्तजन ॥२००॥
आणिक लावोन अग्नी तो चितेसी । करूनी धार्मिक विधिसी तये वेळीं ॥२०१॥
चतुर्दशदिनावेरी क्रिया कर्म । सर्वहि झालें कर्म यथोचित ॥२०२॥
नरहरि काळे यांनीं सकळही तें केलें । अस्थिविसर्जन झालें शरयूमाजी ॥२०३॥
बाळकृष्ण दातार शिष्य ते बाबांचे । मदतीस त्यांचे होते तेव्हां ॥२०४॥
संपवोनि अवतार बाबा निघुनि गेले । परि ते सामावले अनंतांत ॥२०५॥
सहस्र वर्षेंवेरी राहिन समाधिस्थानीं । भक्तांसी रक्षोनि माझिया कीं ॥२०६॥
ऐसें हें वचन सद्गुरु बाबांचें । असे सत्य साचें सकळ जनां ॥२०७॥
समाधी उत्सव होत मंदिरांत । भक्त बहु येत उत्सवासी ॥२०८॥
कृष्णजन्माष्टमी आणिक तो काला । समाधीचे स्थळा घडतसे ॥२०९॥
नारळी पौर्णिमा वरदशंकरव्रत । वरदलक्ष्मी होत व्रत तेवीं ॥२१०॥
श्रावणी समारंभ होत याच स्थानीं । सत्यदत्तव्रतालागोनी करिती भक्त ॥२११॥
सत्यनारायणव्रत तेंही श्रावणांत । होत असे नित्य मंदिरीं या ॥२१२॥
हरितालिका व्रत आणि गणपती । प्रेमें पूजिताती भक्तजन ॥२१३॥
गौर आणिताती माय त्या भगिनी । तियेसी पूजोनी विसर्जित ॥२१४॥

श्रीमद् अनंतव्रत भाद्रपद मासीं । अनंत चतुर्दशीसी शुद्ध पक्षीं ॥२१५॥
अनंत पूजोन घेती तो प्रसाद । पावोनियां मोद अंतरंगीं ॥२१६॥
महालय विधी वद्य चतुर्थीस । करिती तो खास श्रीबाबांचा ॥२१७॥
अश्विनीं नवरात्र स्थापोनियां घट । तें कीं ठेविताती श्रींचे स्थानीं॥२१८॥
ललिता पंचमी व्रत आचरती । सरस्वती-पूजा करिती तेवींच ती ॥२१९॥
सरस्वती बलिदान-दिवशीं करिती हवन ।
नवरात्र-उत्थापन करोनियां ॥२२०॥
विजया दशमीसी अश्मंतक शमी । वृक्षपूजा नामी करिती भक्त ॥२२१॥
सोनें देती घेती आणिक हर्षती । उत्साहें करिती विजयादशमी ॥२२२॥
कोजागिरी व्रत करिती पौर्णिमेस । नैवेद्य चंद्रास दाखवोनी ॥२२३॥
गुरुद्वादशीचा दिन तो पाळिती । सांप्रदायरीतीं इये स्थानीं ॥२२४॥
धनत्रयोदशी करुनी लक्ष्मी-पूजा । दिपवाळीचे काजा आरंभिती॥२२५॥
दिपवाळी सण करिती चार दिन । तुलसीविवाह जाण करती पुढतीं॥२२६॥
कार्तिक पौर्णिमेसी जन्मोत्सव होत । कथिला अध्यायांत पूर्वीं याच॥२२७॥
मार्गशीर्ष मासीं नैवेद्य अर्पिती । चंपाषष्ठीप्रती म्हाळसाकांता ॥२२८॥
मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी दिनीं । करिती मध्यान्हीं दत्तजन्म ॥२२९॥
या वेळीं करिताती तीन पारायणें । दांपत्य-भोजनें घालोनियां ॥२३०॥
सायंकाळीं पालखी काढोनियां भक्त । दिंडी ते काढीत स्थानांतची॥२३१॥
तीन प्रदक्षिणा घालोनि मंदिरा । करिती हा पुरा उत्सव कीं ॥२३२॥
सकळ भक्तजनां महाप्रसादासी । देती या स्थानासी त्याच दिनीं॥२३३॥
पौष मासीं होत संक्रांतीसोहळा । देती तिळगुळा एकमेकां ॥२३४॥
माघ शुद्ध पक्षीं विनायकी येत । चतुर्थीसी असत गणपतिजन्म ॥२३५॥
सहस्रावर्तनें करिती त्या दिनीं । त्या विनायकव्रता लागोनी करिती रात्रीं॥२३६॥
माघ वद्य नवमी दासनवमी होत । पूजा आरती करित रामदासां॥२३७॥

समर्थ रामदासांची ठेवोनी तसबीर । प्रार्थना समग्र करिती भक्त ॥२३८॥
त्याचे आधीं करिती दासबोध-पारायण। मनाचे श्लोक पूर्ण वाचोनियां ॥२३९॥
माघ वद्य चतुर्दशी शिवरात्री व्रत । पाळिताती नित्य सद्गुरुस्थानीं॥२४०॥
सद्गुरुपादुकांसी करिती अभिषेकासी । मध्यान्ह रात्रीसी लघुरुद्राचा ॥२४१॥
फाल्गुनमासीं होळी करिती पौर्णिमेस। पेटवोनि होमास सद्गुरुस्थानीं ॥२४२॥
फाल्गुन वद्य पक्षीं दशमी तिथीस। बीडकर पुण्यतिथीस करिताती ॥२४३॥
करुनी लघुरुद्र पवमान-अभिषेक । मूर्ती तिन्ही देख सजविती ॥२४४॥
बीडकर चरित्राचें करोनी वाचन । सांगती ब्राह्मण भोजनासी ॥२४५॥
सायंकाळी करिती महाप्रसादासी । भक्तजन हर्षी जमोनियां ॥२४६॥
चैत्र शुद्ध प्रतिपदे गुढी उभारिती । गांठी ते अर्पिती सकळिकां ॥२४७॥
अक्कलकोट-स्वामीसमर्थांचा थोर । जन्मोत्सव प्रकार द्वितीयेसी ॥२४८॥
द्वादश कलाक करिती नामस्मरण । लघुरुद्र जाण तोही करिती ॥२४९॥
सायंकाळीं पालखी दिंडीसमवेत । भक्तजन काढित मंदिरस्थानीं ॥२५०॥
सकळिकां प्रसाद देवोनि अन्नाचा । तोष सकळांचा करितात ॥२५१॥
तृतीयेसी चैत्रा गौरी बसवोन । करिताति पूजन एक मास ॥२५२॥
चैत्र शुद्ध नवमीसी करिती रामजन्म । मर्यादा पुरुषोत्तम पूजिताती ॥२५३॥
चैत्र पौर्णिमेसी प्रातःसमयासी । हनुमंत-जन्मासी साधितात ॥२५४॥
उधळोनि गुलाल गर्जति कपिनामें । नाचताती प्रेमें भक्तजन ॥२५५॥
चैत्र वद्य त्रयोदशीयुक्त चतुर्दशीस । स्वामी-पुण्यतिथीस आचरती ॥२५६॥
लघुरुद्राभिषेक करिताती तेथ । महाप्रसाद देत भक्तांसी तो ॥२५७॥
अक्षय्यतृतीया साधोनियां दिन। जयंती करिती जाण परशुरामांची ॥२५८॥
चैत्रमासीं होत माय-भगिनींचें । स्थानीं समाधीचे हळदीकुंकू ॥२५९॥
ज्येष्ठमासीं करिती वटवृक्षपूजन । पुरोहितांकडुन समाधिस्थानीं ॥२६०॥
आषाढ शुद्धांत करिती व्यासपूजा । व्यास महाराजा पूजोनियां ॥२६१॥

याच दिनीं करिती गुरुपौर्णिमेचा । उत्सव महत्त्वाचा या स्थानांत॥२६२॥
आषाढ वद्य तृतीया या दिनीं कीं होत । श्राद्ध विधीयुक्त या स्थानांत ॥२६३॥
बाबांच्या त्या पत्नी दुर्गाताई जाणा । त्यजिती पंचप्राणा याच दिनीं ॥२६४॥
म्हणुनी अभिषेक करिती श्रीसूक्ताचा । मंत्रजागर वैदिकांचा तोही करिती ॥२६५॥
टेंबे स्वामी आणि स्वामी सिद्धारूढ । यांचे दिन थोर पाळिताती ॥२६६॥
निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान मुक्ताबाई । यांचे दिनीं होई अभिषेक ॥२६७॥
एकनाथ तुकाराम मोरया गोसावी । यांचे दिनीं करावी एकादशनी ॥२६८॥
पौष शुद्ध द्वितीया नरहरिजयंती । स्वामींची जयंती असे तेची ॥२६९॥
तेही या स्थानांत भक्त पाळितात । लघुरुद्राभिषेक करित सद्गुरुस्थानीं ॥२७०॥
विश्वेश्वरअय्या अम्मा म्हणती ज्यांसी । गाणगापुरासी वसती जे कीं ॥२७१॥
श्रावण अमावास्या दिनीं जन्म-तिथी । अभिषेक करिती त्यांचेसाठीं ॥२७२॥
आश्विन वद्य षष्ठी त्यांची पुण्यतिथी । तीही पाळिताती या स्थानांत ॥२७३॥
माघ वद्य प्रतिपदा महत्त्वाचा दिवस । गुरुप्रतिपदा खास म्हणती ज्यासी ॥२७४॥
श्रीशैल्ययात्रेचें करोनि निमित्त । नृसिंह सरस्वती गुप्त होती कीं ते ॥२७५॥
जावोनि बैसले कर्दळीवनांत । तेचि अक्कलकोटस्वामी जाणा ॥२७६॥
ते दिनीं लघुरुद्र करुनी अभिषेक । प्रसाद सकळिक स्वीकारिती ॥२७७॥
सत्यदत्तव्रत होत या स्थानांत । महती ज्याची गात सुर नर सारे ॥२७८॥
करूनी दत्तात्रेय-मूर्तीचें पूजन । शास्त्रविधिप्रमाण करिती व्रत ॥२७९॥
गणेशसहस्रनाम प्रतिदिनीं वाचोन । करिती आराधन हेरंबाचें ॥२८०॥
ऐसा हा वृत्तांत सद्गुरुस्थानींचा । निवेदिला साचा सूत्रात्मक ॥२८१॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । दशमाध्याया झाली पूर्तता ही ॥२८२॥

**॥ दशमाध्याय समाप्त ॥**

# अध्याय अकरावा

तूंचि गणपती गणांचा तूं स्वामी । नमितों तुजला मी सर्वभावें ॥१॥
तुझी योगमाया प्रकाशी जगासी । माया सत्तादासी तुझी असे ॥२॥
धीदुर्गपुरांत घेउनि जीवभाव । बद्ध आत्मदेव असे झाला ॥३॥
सत्त्व रज तम तीन तट त्यासी । कोंडिती सर्वस्वेंसी अटकेमाजीं ॥४॥
तया आत्मदेवा शंभू सोडवीत । स्मरोनी तुजप्रत गजवदना ॥५॥
तोचि तूं सद्गुरु शिवाहोनि श्रेष्ठ । मानोनि वरिष्ठ नमितों चरणी ॥६॥
मूढ अज्ञानासी तूं बा वक्रतुंड । ज्ञानियां अखंड सामोरा तूं ॥७॥
दृष्टी उघडोनी जंव तूं झांकिसी । उत्पत्ती प्रलयासी तंववरी करिसी ॥८॥
तव माया नृत्य हाचि जगदाभास । दाविसी तूं खास तांडव करुनी ॥९॥
अहो सद्गुरुनाथा करितां ज्यांवरि प्रेम । सकळीं आत्माराम भेटे त्यांस ॥१०॥
ऐसा तूं सोयिरा होसी जगीं ज्याचा । त्यासी मीपणाचा फुंज न उरे ॥११॥
तुझ्या ऐक्यबोधीं करितां तुझें ध्यान । देसी तुझें पूर्ण प्रेम त्यासी ॥१२॥
शब्दज्ञानें न लगे तुमचा वेदां अंत । तुम्ही सद्गुरुनाथ श्रुतिसी पैल॥१३॥
मौन हेंचि तुझें असे राशीनांव । म्हणुनी मौनें स्तव करितों तुझा ॥१४॥
ऐशा तुम्हां पायीं साष्टांग वंदन । सर्वस्वें करोन पूजितसें ॥१५॥
ऐसे जे सद्गुरु वासुदेवानंत । बाबा ज्यांसी वदत भक्तजन ॥१६॥
नारायणपेठेंत धुमाळांचा वाडा । मांडोनी बिऱ्हाडा वसती तेथ ॥१७॥
जवळिच अष्टभुजा जगदंबेचें स्थान । शक्तीसंन्निध जाण राहताती ॥१८॥
एकोणीसशें तीस एकतीस सालांत । गोष्टी घडुनि येत तेची परिसा ॥१९॥
विष्णु आणि हरी सखाराम जोशांचा । नातू जो कीं साचा विठ्ठल तो ॥२०॥
इंग्रजी सहावीच्या परीक्षेस न बसतां । पळाला स्वहिता साधायासी ॥२१॥
अठरा वरुषांचें असे वय त्यांचें । घरदार यांचें सोडी नांव ॥२२॥

रत्नागिरीहोनि पुण्यासि तो आला । मुंबईमार्गें भला एकलाची ॥२३॥
येवोनि राहिला बीडकर मठांत । वासूअण्णा देत आश्रय त्यासी ॥२४॥
ठेवोनि घेतलें आणि संरक्षिलें । बाळासम केलें प्रेम त्यांनीं ॥२५॥
आश्वासोनि त्यासि जवळी ठेवीत । वासूअण्णा भागवत कृपावंत ॥२६॥
परमार्थांत यांची उच्च ती तयारी । निस्पृह ते भारी असती जाणा ॥२७॥
सदा अंतर्मुख होवोनी वर्तती । बीडकर मठाप्रती प्रमुख ट्रस्टी ॥२८॥
त्या काळीं मठांत सुत-पत्नीसह । राहती ते देह कष्टवोनी ॥२९॥
पंचसूक्त पवमान मठीं नित्य होत । अभिषेक करीत ब्राह्मण ते ॥३०॥
रानडे म्हणोन तरूण ब्राह्मण । सर्वही पूजा करून राहती तेथ ॥३१॥
आतां ते कीं गेले देह सोडोनियां । मठावरी माया असे त्यांची ॥३२॥
मठाचे समोरीं मठाचेंच घर । दुसरे रानडे तत्र राहताती ॥३३॥
वासूअण्णांसी ते बरें न पाहती । कधीं कधीं येती मठीं ते कीं ॥३४॥
हेही येती पुढें बाबांचे दर्शना । गोड गोड जाणा खावयासी ॥३५॥
तेही आतां गेले झाले स्वर्गवासी । सांप्रत पूजेसी गुणे करिती ॥३६॥
गुणे गुरुजी फार असती प्रेमळ । पूजा पाठ सकळ करिती प्रेमें ॥३७॥
गीताबाई आणि कन्या यमू त्यांची । राहाती मठामाजी तये काळीं ॥३८॥
रंगोबा भागवत होते देशभक्त । राहाती मठांत सेवा करुनी ॥३९॥
गुरुचरित्राचे एकशें ते आठ । केले यांनीं पाठ त्या काळांत ॥४०॥
दाढी जटा दोन्ही असती वाढवोन । शक्तीनें संपन्न देह त्यांचा ॥४१॥
त्या काळीं मठांत दामले शेषशायी । येती नित्य तेही दर्शनास ॥४२॥
भीमाशंकर जोशी येवोनी राहती । रुद्राभिषेक करिती शिवपिंडीसी ॥४३॥
एकभुक्त ते कीं वसती मठांत । पुसाळकर येत कधीं कधीं ॥४४॥
काशिनाथपंत गर्दे कधींतरी दर्शना । बाहेरूनी जाणा येती मठीं ॥४५॥
सब्जज्ज होते नागपूर बुलढाण्यासी । तयारी परमार्थासी यांची बहुत ॥४६॥

शिवरामपंत खांडेकर तेही मठीं येत । करिती सुखसंवाद वासूअण्णांपाशीं ॥४७॥
शिखरे वैद्य येती दर्शना मठांत । पेणेचे ते येत लिमये वकील ॥४८॥
थोर थोर येती साधुसंत तेव्हां । ठेवोनियां भावा बीडकरचरणीं ॥४९॥
वासूअण्णापाशीं चर्चा परमार्थाची । चाले बहुतांची मठीं तेव्हां ॥५०॥
बीबीकर वसती मठांत येवोन । मधोन मधोन बीडकरांचे ॥५१॥
दामूअण्णा देशपांडे येती नाशिकाहून । मानिताती जाण अण्णांसी ते ॥५२॥
सकलही येती दर्शना मठांत । आणिक दर्शन घेत रावसाहेबांचें ॥५३॥
रावसाहेब बाबा तीनही त्रिकाळ । दर्शना तीन वेळ मठीं येती ॥५४॥
सर्वांठायीं करुनी बहु नमस्कार । वासूअण्णा थोर नमिती शेखीं ॥५५॥
वासूअण्णा बाबांसी बहुतचि मानिती । सख्यत्वें बोलती बाबांसंगें ॥५६॥
वासूअण्णा भागवत प्रमुख ते ट्रस्टी । महाराजांसम मानिती बाबा त्यांसी ॥५७॥
विठोबासी आश्रयो देवोनियां त्यांनीं । रामगीता देवोनी वाचीं म्हणती ॥५८॥
दोन तीन दिवस झाले ते येवोन । आले एक दिन मठीं बाबा ॥५९॥
महाराजां आणि सकल दैवतां । वंदोनियां येतां झाला वेळ ॥६०॥
त्या वेळीं विठ्ठल वाचीत रामगीता । बैसला कीं होता अण्णांपाशीं ॥६१॥
रावसाहेब येऊन वासूअण्णांपाशीं । पाटावरी सहजेंसी उभे राहती ॥६२॥
अकस्मात वदले विठ्ठलाकारण । आलासी पळोन कां रे बाळा ॥६३॥
दुजें वाक्य बोलतां पाहती अण्णांकडे । बोट विठोबाकडे करोनियां ॥६४॥
आणिक वदले अतीव वेगानें । आणिक प्रेमानें वाक्य एक ॥६५॥
अक्कलकोटस्वरूपांत हे कीं पाहतात । म्हणोनियां स्वस्थ झाले बाबा ॥६६॥
पाहतां पाहतां देहीं पालटु झाला । दिसूं तो लागला स्वामीसम ॥६७॥
गेले कपडे सारे धोतरही गेलें । स्वामी उभे दिसले कौपीनधारी ॥६८॥
प्रचंड तेजाचा झोत प्रगटला । विठ्ठल नुरला देहभाव ॥६९॥
वासूअण्णांनी तो करूनी नमस्कार । घातिलें पायावर विठ्ठलासी ॥७०॥

अश्रुपूर चाले नयनीं विठ्ठलाचे । मस्तक बाबांचे चरणावरी ॥७१॥
कांहीं कालानंतर पालटलें सारें । म्हणती विठ्ठला रे उठीं आतां ॥७२॥
नको खेद चिंता करूं तूं बा कांहीं । येई माझे गेहीं उदईक ॥७३॥
बोलोनियां ऐसें दिधला प्रसाद । गेला सारा खेद मानसींचा ॥७४॥
वासूअण्णा वदती तुझें भाग्य थोर । भेटले सद्गुरुवर तुजलागीं ॥७५॥
त्यांचे गृहीं उद्यां जरूर तूं जाईं । पूर्ण ध्यानीं घेई स्वरूप तें ॥७६॥
विठ्ठलासी झाला अतीव आनंद । मनें धरिला छंद रावसाहेबांचा ॥७७॥
दुजे दिनीं गेला बाबांचे दर्शना । बघुनी त्या बाबांना हर्ष होत ॥७८॥
बैसवोनि जवळी सांगताती गोष्टी । अससी तंव भेटी येत जावें ॥७९॥
न करीं संकोच असशी तूं माझा । होतों गृहीं तुझ्या रत्नागिरिंत ॥८०॥
जेवणाचे आधीं बैसावया स्वस्थ । बाबा ते सांगत विठ्ठलासी ॥८१॥
ऐसें हें साधन करावें प्रतिदिन । त्यासी वाढवोन साधीं स्वहित ॥८२॥
असतां पुण्यांत बाबांचे गृहासी । जाणें विठोबासी घडे नित्य ॥८३॥
घ्यावया दर्शन नित्य तो कीं जात । दुर्गाताई देत खाण्या कांहीं ॥८४॥
बाबा पाठीवरून हात प्रेमभरें । फिरविती खरे प्रतिदिन ॥८५॥
तेव्हां दर्शनासी नव्हती ते गर्दी । नव्हती ते उपाधी बाबांसी ती ॥८६॥
कश्चित् कोणी येती जाणोनियां खरें । इतर म्हणती वेडे भ्रमिष्ट ते ॥८७॥
सदा स्वरूपांत बाबा रंगताती । नसे त्यांसि क्षिति इतरांची ॥८८॥
अखंड चिंतनीं गुंतले लोचन । लागोनियां ध्यान आत्मारामीं ॥८९॥
त्यांनीं विठोबासी म्हणोनी आपुला । अनुग्रह केला त्याच काळीं ॥९०॥
त्या काळीं पुण्यांत कॅम्पामाजी होती । एक विभूती ती मोठी संत ॥९१॥
तिचे दर्शनासी रावसाहेबांनीं । आणिक अण्णांनीं धाडियेलें ॥९२॥
विठोबासी तिनें देवोनि दर्शन । पटविली खूण सद्गुरूंची ॥९३॥
प्रसाद घातिला विठोबाचे मुखीं । स्वहस्तें कौतुकीं वंदोनियां ॥९४॥

धन्य तेरा दाता धन्य तेरा दाता । वदोनी स्वहस्ता फिरवी पृष्ठीं ॥९५॥
'फकीर बाबा' म्हणुनी एक यवन संत । होते कीं पुण्यांत अधिकारी ॥९६॥
तयांसी भेटला जावोनि विठ्ठल । त्यांनींही तात्काळ ओळखिलें ॥९७॥
ओळखोनि खूण दिली पटवोन । बहुतचि हांसोन प्रेमभरें ॥९८॥
त्या काळीं मठांत वीस पंचवीस पानें । जेवती नेमानें प्रतिदिनीं ॥९९॥
जयराम भटजी करंबेळकर आणीक संन्यासी । प्रतिदिनीं भोजनासी
येती मठीं ॥१००॥
रुद्र अथवा पवमान म्हणोनी मठांत । ब्राह्मणानें तेथ भोजन घ्यावें ॥१०१॥
तेव्हां ती दक्षणा होती आणे चार । देती हातावर ब्राह्मणाचे ॥१०२॥
मठींची सकळ मंडळी त्या काळीं । तापानें जाहली आजारी कीं ॥१०३॥
नित्य भोजनास असती मठीं पानें । स्वयंपाक करणें पडे तेव्हां ॥१०४॥
कोणी न मिळत स्वयंपाकासाठीं । चिंता करिती मोठी वासूअण्णा ॥१०५॥
तंव विठ्ठल आणि रंग्या भागवत । सांगती अण्णांप्रत शब्द हे कीं ॥१०६॥
आम्ही स्वयंपाक करूं दोन्ही वेळां । नका काळजीला करूं तुम्ही ॥१०७॥
तीन मास स्वयंपाक दोघांनींही केला । आणि चालविला नित्यनेम ॥१०८॥
बाई महाराज शिष्या बीडकरांची । नाना बापटांची भगिनी जी कीं ॥१०९॥
त्याही नव्हत्या मठीं त्या काळीं पुण्यांत । घडला वृत्तांत ऐसा जेव्हां ॥११०॥
बाबांकडे जावें प्रतिदिनीं विठोबानें । प्रेमभरें घेणें दर्शन तें ॥१११॥
पुढें विठोबासी जाहला आजार । आला ताप फार देहासी तो ॥११२॥
शिखरे वैद्य देती औषध प्रेमानें । बाबा ते नेमानें येऊनी बघती ॥११३॥
वासूअण्णा आणि त्यांची पत्नी थोर । सांभाळिती फार विठ्ठलासी ॥११४॥
वात एक दिनीं झाला आजारांत । हरपुनी जात भान सारें ॥११५॥
तेथें सद्गुरु बाबा, बीडकर आणि स्वामी । रक्षिती स्वधामीं बाळकासी ॥११६॥
दत्त अवधूत तेही स्वयें आले । विठ्ठल रक्षिलें सर्वांनींही ॥११७॥

दिधला पुनर्जन्म निवारोनी व्याधी । संपविली उपाधी आजाराची ॥११८॥
रत्नागिरिस नेलें पुढें विठोबास । दवडुनि भाऊ खास वडिलांनीं ॥११९॥
पुढें विठोबा तो बाबांचे दर्शना । येत पुण्यपत्तना मधुनी मधुनी ॥१२०॥
एकोणीसशें त्रेपन्न सालीं जून महिन्यांत। विठोबा तो येत दर्शनासी ॥१२१॥
बाबांनीं ठरविलें एक ऑगस्टास । देह सोडण्यास सिद्ध झाले ॥१२२॥
सकल वृत्तांत नये तो लिहितां । ग्रंथ वाढे निगुता अतीशय ॥१२३॥
बाबा-विठोबाचा वाद तो प्रेमाचा । सहा दिवस साचा होता चालू ॥१२४॥
म्हणे विठोबा तो मी आधीं जाणार । नाहीं राहणार तुमचे पाठीं॥१२५॥
सहा दिवसांनीं बाबा ते वदले । राहतों मी पुढलें वर्ष एक ॥१२६॥
तंव विठोबाची बोली झाली बंद । बाबा विचारीत म्हणणें काय ॥१२७॥
विठोबासि तेव्हां देवोनि वचन । बाबांनीं भाषण केलें ऐसें ॥१२८॥
एकोणीसशें त्रेपन्नीं चोवीस जुलईस । बाबा विठोबास निरोपिती ॥१२९॥
आज मी घेतला अहंकार सारा । तुझा कीं रे मुला स्वीकारोन ॥१३०॥
आतां याचेपुढें तूं कांहीं न करणें । तुझें सर्व करणें करीन मी ॥१३१॥
स्वस्थ तूं राहोनी सांगेन तें करीं । बहुतचि वैखरी वदले गोष्टी ॥१३२॥
तुझेपाशीं मी बा आहें निरंतर । सर्वत्रां सर्वत्र सर्वां ठायीं ॥१३३॥
एक वर्षा उपरी आज्ञा ती मठाची । आज्ञा जाण साची असे माझी ॥१३४॥
जैसें जैसें त्यांनीं असे निरोपिलें । तें तेंची चालिलें असे आज ॥१३५॥
त्याच वरुषास गुरुपौर्णिमेसी । पूजिलें बाबांसी विठोबानें ॥१३६॥
चरणीं घातिल्या बाबांचे पादुका । पूजा करुनी देखा स्वीकारिल्या ॥१३७॥
त्याच वेळीं बाबांनीं स्वकरींच्या दोन । आंगठ्या काढोन दिधल्या त्यासी ॥१३८॥
गुरूच्या बोटांतिल दोन या मुद्रिका । गुरूचे बोटीं लेका स्वकरें घालीं ॥१३९॥
पुण्यपत्तनास घेवोनि गृहास । सांभाळावें खास मजलागीं ॥१४०॥
एकावन्न सालांत आज्ञा ऐसी केली । प्रत्यक्ष चालिली तेची आतां ॥१४१॥

नरहरी काळे सेवक बाबांचे । रामानंदीं साचे दिधलेले ॥१४२॥
सर्वदा वर्तत पुण्यपत्तनांत । बाबांची करित सेवा ती कीं ॥१४३॥
महाराजांनीं दिलें सेवेसी म्हणोन । आज्ञा ती जाणोन सेवा घेती॥१४४॥
बाबांकडे जाती काळे तीन वेळ । पाहती सकळ कामकाज ॥१४५॥
त्यांचे गृहीं पूजा चालते स्वामींची। पुण्यतिथी साची करिती त्यांची ॥१४६॥
आज्ञा महाराजांची म्हणुनी बरोबर । बाबा ते सकळ स्थानीं नेती ॥१४७॥
नरहरी काळ्यांचा बहुतचि संबंध । बाबांजवळी येत आयुष्यांत ॥१४८॥
बहुत स्थित्यंतरें आणि बहुतचि गोष्टी । घडल्या परि न येती लिहायासी ॥१४९॥
काळ्यांसी लाविली बाबांनीं नोकरी। वास्तपुस्त सारी करिती त्यांची ॥१५०॥
काळ्यांची भगिनी नामें मथूताई । बाबांकडे जाई तीही जाणा ॥१५१॥
अन्न शिजवोन डबा देती त्यांना । आलें जरी मना खाती बाबा ॥१५२॥
ना तरी तैसाच असे तो पडोन । काळ्यांघरीं अन्न जाई रात्रीं ॥१५३॥
आपट्यांकडोन दुजा डबा येत । पैसे त्याचे देत बाबा नित्य ॥१५४॥
गजानन गोखले आणि दत्ता काळे । येती काळ्यांमुळें बाबांपाशीं ॥१५५॥
कधींकधीं तेही डबा तो आणिती । मथूताई देती भरोनी जो ॥१५६॥
बाबांची मंडळी ज्या कीं दुर्गाताई । सांडियेला त्यांहीं अपुला देह ॥१५७॥
आजार तो नव्हता जाहला कीं फार । परी कलेवर खंगलें तें ॥१५८॥
येई त्यां चक्कर होवोनी भोंवळ । वाढला विकार हाचि फार ॥१५९॥
येवोनी चक्कर पडल्या भूमीसी । सोडिलें प्राणांसी माताजींनीं ॥१६०॥
शकें अठराशें सदुसष्ट सालांत । आषाढ मासांत घडलें हें ॥१६१॥
वद्य ती तृतीया साधियेली त्यांनीं । गेल्या त्या निघोनी कैलासांत ॥१६२॥
और्ध्वदेहिक त्यांचें बाबांनींच केलें । सकळही झालें यथासांग ॥१६३॥

सत्तावीस जुलई तारीख त्या दिनीं । एकोणीसशें पंचेचाळीस सनीं
निवर्तल्या ॥१६४॥
तेव्हांपासोनियां पुढें एकटेच । रावसाहेब साच राहिले ते ॥१६५॥
दुर्गाताई गेल्या निघुनी जगांतोन । पुढें वर्तमान घडे काय ॥१६६॥
सेहेचाळीस साला उपरी बाबा यात्रा करिती । नाना स्थानीं जाती
यात्रेसाठीं ॥१६७॥
काशी गया आणि प्रयाग रामेश्वर । कन्याकुमारी थोर यात्रा झाली ॥१६८॥
तेवीं महाबळेश्वरीं यात्रेसी ते गेले । श्रीशैल्यीं पातले यात्रेसाठीं ॥१६९॥
गाणगापुरीं आणि गेले अक्कलकोटीं । पंढरपुरीं जाती यात्रेसी ते ॥१७०॥
पांडुरंग-चरणीं जावोनि लागती । आणि विनविती पांडुरंगा ॥१७१॥
हातरुमालांत ठेवोनि पैशांस । म्हणती विठोबास घ्या हो घ्या हो ॥१७२॥
आम्ही तों पामर काय तुम्हां देऊं । घ्यावें स्वयमेवु आवडे तें ॥१७३॥
ऐसें ते वदोन पदीं झाले लीन । साष्टांग नमोन पंढरिनाथा ॥१७४॥
जातां रामेश्वरीं मदुरेसी अपरात्रीं । मोटार बंद पडली अकस्मात ॥१७५॥
पुढें अकस्मात मोटार एक आली । सर्व मंडळी गेली बसुनी त्यांत ॥१७६॥
गिरीचा व्यंकोबा आणि मंत्रालयीं । यात्रा करिती तीही सद्गुरु बाबा ॥१७७॥
जाउनि सिद्धटेकीं गणपती-दर्शन । करिती सकळ जन बाबांसंगें ॥१७८॥
पैठणीं यात्रेसी बाबा निघुनि गेले । दर्शन घेतलें एकनाथांचें ॥१७९॥
नाथषष्ठीसाठीं न राहती तेथ । परतोनि येत पुण्यासी ते ॥१८०॥
एक वेळ बाबा गेले कल्याणास । भिड्यांचे गृहास उतरले ॥१८१॥
राजाभाऊ भिडे गुरुबंधू साचे । राहिले तयांचे गृहीं ते कीं ॥१८२॥
नाना फडक्यांचे बिन्हाडीं जावोन । आले परतोन भिड्यांघरीं ॥१८३॥
कुळगांवासी गेले बाबा जोश्यांकडे । ऐसे थोडे थोडे हिंडती बाबा ॥१८४॥

बाबा जोशी यासी मुलगी एकच होती। लग्न झालेली ती तये वेळीं ॥१८५॥
तयांसी दिधला पुत्र तो बाबांनीं । सेवा स्वीकारूनी तयांची ती ॥१८६॥
एकोणीसशें त्रेपन्न सालीं बाबा यात्रा करिती । त्यांच्या संगें जाती
लोक फार ॥१८७॥
गाणगापुरा गेले आणि अक्कलकोटीं । औरंगाबाद ती करिती तेवीं ॥१८८॥
गया काशी आणि जगन्नाथपुरी । कलकत्त्यावेरी जाती ते कीं ॥१८९॥
अलाहाबादेशी प्रयागयात्रा करिती । चमत्कार घडती यात्रेमाजी ॥१९०॥
परी ते न येथें लिहिणें घडे आतां । संक्षिप्त चरिता योजियेलें ॥१९१॥
पुढें जेव्हां केव्हां बाबा सांगतील । मोठें तें होईल लिहुनी सारें ॥१९२॥
याच यात्रेमाजी गेले अयोध्येस । शरीर सोडण्यास म्हणुनी बाबा॥१९३॥
सर्वांसी सांगती घेणार समाधी । आम्ही शरयूमधीं अयोध्येसी ॥१९४॥
देशपांड्यांचे गृहीं राममंदिरांत । स्वर्गद्वारीं उतरत बाबा तेव्हां ॥१९५॥
सकल मंडळी घेउनी शरयू-तीरीं । बाबा ते सकाळीं प्राप्त झाले॥१९६॥
शरयू-स्नानासी आले वाळवंटीं । मंडळी होती कष्टी सकळही ॥१९७॥
बाबा सांगताती सकळांसी मात । जातों शरयूप्रत आम्हीं दोघे ॥१९८॥
नरहरी काळे आणि बाबा गेले । पात्रांत पावले शरयूच्या ॥१९९॥
समाधी घेण्यासी डोह शोधिताती । परि तयांप्रती न मिळे डोह ॥२००॥
चवडाभर पाणी असे जेथें तेथें । पंधरावीस मिनिटें फिरती तेव्हां ॥२०१॥
तदनंतर बाबा वदले काळ्यांस । देते आवाजांस शरयू गंगा ॥२०२॥
"अद्यापी न आली वेळ समाधीची । करोनियां स्नानासी
परता आतां ॥२०३॥
करोनियां स्नान जावें सकळांनीं । पुण्यासि परतोनी येथोनियां" ॥२०४॥
बाबा स्नान करून आले वाळवंटीं । काळेही करिती स्नान तेव्हां ॥२०५॥
पाहोनी बाबांसी हर्ष सकळां झाला । करिती स्नानाला सर्व जण ॥२०६॥

बाबा जोशी यासी मुलगी एकच होती। लग्न झालेली ती तये वेळीं ॥१८५॥
तयांसी दिधला पुत्र तो बाबांनीं । सेवा स्वीकारूनी तयांची ती ॥१८६॥
एकोणीसशें त्रेपन्न सालीं बाबा यात्रा करिती । त्यांच्या संगें जाती
लोक फार ॥१८७॥
गाणगापुरा गेले आणि अक्कलकोटीं । औरंगाबाद ती करिती तेवीं ॥१८८॥
गया काशी आणि जगन्नाथपुरी । कलकत्यावेरी जाती ते कीं ॥१८९॥
अलाहाबादेशी प्रयागयात्रा करिती । चमत्कार घडती यात्रेमाजी ॥१९०॥
परी ते न येथें लिहिणें घडे आतां । संक्षिप्त चरिता योजियेलें ॥१९१॥
पुढें जेव्हां केव्हां बाबा सांगतील । मोठें तें होईल लिहुनी सारें ॥१९२॥
याच यात्रेमाजी गेले अयोध्येस । शरीर सोडण्यास म्हणुनी बाबा॥१९३॥
सर्वांसी सांगती घेणार समाधी । आम्ही शरयूमधीं अयोध्येसी ॥१९४॥
देशपांड्यांचे गृहीं राममंदिरांत । स्वर्गद्वारीं उतरत बाबा तेव्हां ॥१९५॥
सकल मंडळी घेउनी शरयू-तीरीं । बाबा ते सकाळीं प्राप्त झाले॥१९६॥
शरयू-स्नानासी आले वाळवंटीं । मंडळी होती कष्टी सकळही ॥१९७॥
बाबा सांगताती सकळांसी मात । जातों शरयूप्रत आम्हीं दोघे ॥१९८॥
नरहरी काळे आणि बाबा गेले । पात्रांत पावले शरयूच्या ॥१९९॥
समाधी घेण्यासी डोह शोधिताती । परि तयांप्रती न मिळे डोह ॥२००॥
चवडाभर पाणी असे जेथें तेथें । पंधरावीस मिनिटें फिरती तेव्हां ॥२०१॥
तदनंतर बाबा वदले काळ्यांस । देते आवाजांस शरयू गंगा ॥२०२॥
"अद्यापी न आली वेळ समाधीची । करोनियां स्नानासी
परता आतां ॥२०३॥
करोनियां स्नान जावें सकळांनीं । पुण्यासि परतोनी येथोनियां" ॥२०४॥
बाबा स्नान करून आले वाळवंटीं । काळेही करिती स्नान तेव्हां ॥२०५॥
पाहोनी बाबांसी हर्ष सकळां झाला । करिती स्नानाला सर्व जण ॥२०६॥

न घेतां समाधी मी येतों पुण्यास । बीडकर मठास कळविलें ॥२०७॥
जामातांचे गृहीं पत्र पाठवोन । केलें निवेदन पत्रानें तें ॥२०८॥
माझ्या भक्तांसाठीं येतों मी पुण्यास । न घेतां समाधीस लिहिलें ऐसें ॥२०९॥
आग्रा आणि मथुरा पाहुनि वृंदावन । घेतलें दर्शन श्रीकृष्णाचें ॥२१०॥
परततां पुण्यास उतरले वर्ध्यास । जाउनी आले गृहास जामातांचे ॥२११॥
चहाच घेवोन स्टेशनावरी आले । खऱ्या-गृहीं जेवले इतर लोक ॥२१२॥
निर्मलाबाईंस आणि जामातांस । आशीर्वाद खास दिधला त्यांनीं ॥२१३॥
निर्मलाबाईंनीं निजपुत्रा आणोनं । पायावरी जाण घातियेलें ॥२१४॥
आशीर्वाद त्यासी देवोनियां थोर । हस्त माथ्यावर फिरविला ॥२१५॥
सर्वही होईल ठीक तें येथोन । करीस हा लग्न ऐसें जाणा ॥२१६॥
वाटेमाजी आली कीं दत्त-जयंती । तेव्हां सकळही जाती नाशिकास ॥२१७॥
बीडकर मठीं दत्तमंदिरांत । उतरले सद्गुरुनाथ बाबा तेव्हां ॥२१८॥
दामूअण्णा देशपांडे करोनी स्वागत । करिती बाबांप्रत नमस्कार ॥२१९॥
दत्तजन्म झाला तेथें तो साजरा । सर्वांसी दिधला प्रसाद तो ॥२२०॥
तेथोनियां गेले त्र्यंबकेश्वरासी । करुनी दर्शनासी श्रीरामचे ॥२२१॥
त्र्यंबकेश्वर-दर्शन कुशावर्तीं स्नान । ऐसें हें सारोन गृहा आले ॥२२२॥
कांहीं मंडळी गेली नीलांबा पर्वतीं । तेथें एक वसती सत्पुरुष ॥२२३॥
मंडळींनीं केला त्यांसी नमस्कार । तंव झाला प्रकार काय ऐका ॥२२४॥
पुसती ते साधु पुढें कोठें जातां । लोक म्हणती आतां जातों पुढती ॥२२५॥
पुढें एक असती सत्पुरुष थोर । त्यांसी नमस्कार करावया ॥२२६॥
तंव ते साधू वदले सकळ मंडळीस । तुमचे अज्ञानास म्हणों काय ॥२२७॥
तुमचेपाशीं गृहीं असतां कीं सद्गुरु । सत्पुरुष थोरू न कळे तुम्हां ॥२२८॥
कस्तुरी-मृगास न कळे कस्तुरी कोठें । रानोरानीं हिंडे शोधावया ॥२२९॥
तैसें तुम्हांजवळी परब्रह्मनिधान । तया नोळखोन हिंडतसां ॥२३०॥

त्र्यंबकेश्वराहोनि येतांना बाबांनीं । आणिल्या जमवोनी वस्तु नाना ॥२३१॥
देवांच्या तसबिरी आणिक त्या माळा । लसूण कांद्याला गोळा केलें ॥२३२॥
शेंगा कोथिंबीर आणिक वस्तू नाना । भरोन खिशांना आणियेलें ॥२३३॥
नाशिकास आले परतोनि जेव्हां । भेटले ते तेव्हां गुरुबंधूंस ॥२३४॥
दत्तोपंत निरोखेकर गुरुबंधू बाबांचे । नाशिकास त्यांचें वसतिस्थान ॥२३५॥
येउनि त्यांचेकडे भेटोनियां त्यांस । भराभर वस्तूंस फेंकिती पुढें ॥२३६॥
आणिक घालोनि साष्टांग नमस्कार । वंदिती सत्वर दत्तोपंतां ॥२३७॥
पाहोनियां सारा प्रकार तो डोळां । आश्चर्य निरोखेकरां वाटतसे ॥२३८॥
म्हणती रावसाहेबांसी हें हो काय केलें । वस्तूंसी आणिलें कशासीं या ॥२३९॥
गंभीर दत्तोपंत हंसले तेव्हां फार । आश्चर्यें उद्गार काढोनियां ॥२४०॥
म्हणावें यां मुक्त करिती वेड्यासम । बद्ध म्हणतां ब्रह्म झाले असती ॥२४१॥
महाराजांची लीला न कळे ती कोणास । करिती आश्चर्यास सकळिक ॥२४२॥
चहापाणी तेव्हां घेवोनियां तेथ । आले पंचवटींत परतोनी ॥२४३॥
दुजे दिनीं आले पुण्यास परतोन । सांगाती घेवोन सकळिकां ॥२४४॥
ठायीं ठायीं होती चमत्कार फार । नाहीं पारावार तयांलागी ॥२४५॥
पुढें मोठ्या ग्रंथीं समग्र लेखन । बाबा घडवोन आणतील ॥२४६॥
त्यांचे तें चरित्र असल्या इच्छा त्यांची । करतील लेखनाची पूर्ती ते कीं ॥२४७॥
गाणगापूर-यात्रेंत बाबांचे सांगातीं । कुळकर्णी मास्तर जाती यात्रेसी ते ॥२४८॥
त्यांच्या पिशाच्चासी दवडिलें बाबांनीं । मार्गासी लावोनी दिधलें त्यासी ॥२४९॥
त्यांचा मुलगा तो कीं वसंता कुळकर्णी । तयाचें बाबांनीं हित केलें ॥२५०॥
अण्णा देशपांडे धुळ्याचे असती । त्यांसी अनुग्रह देती सद्गुरु बाबा ॥२५१॥
बी.ए.बी.टी. ते कीं आहेत मास्तर । हायस्कूलांत नोकर सरकारी त्या ॥२५२॥
त्यांसी अनुभव येती वारंवार । प्रीती त्यांची फार बीडकर-मठीं ॥२५३॥
संस्कृत कवित्व करिती हे छान । बाबांचे वर्णन करिती त्यांत ॥२५४॥

यांसी अनुग्रह दिधली उपासना । लाविलें त्यांसी ध्याना मध्यरात्रीं ॥२५५॥
निष्ठा यांची फार बाबांचे चरणीं । स्मरती क्षणोक्षणीं बाबांसी ते॥२५६॥
बाबांसंगें गेले यात्रे गाणगापुरीं । घेउनि बरोबरी मातेसी हे ॥२५७॥
यांची माता होती शिष्या ती बाबांची । पिशाच्चपीडा तिची दूर केली ॥२५८॥
ताई देशपांडे गेल्या निवर्तोन । आतां तें कथीन वृत्त दुजें ॥२५९॥
चिदानंदांचिये धर्मशाळेमाजी । गाणगापुरासी जी राहाती बाबा ॥२६०॥
बाहेर ओट्यावरी बसले एक दिन । सवें ते घेवोन सकळ भक्तां॥२६१॥
देशपांडे अण्णा तेथ कीं बैसले । त्यांसी पाचारिलें बाबांनीं तें ॥२६२॥
समोरी ती भीमा दुथडी भरोन । भरोनियां पूर्ण वाहातसे ॥२६३॥
बाबा सकळांसी वदले उत्तर । कोण नदी पार जाईल आतां ॥२६४॥
जावोनी पल्याड आणावी ती रेती । इच्छा ही निगुती असे माझी ॥२६५॥
सकळही स्वस्थ भक्त ते बैसले । कोणी न च बोले तेव्हां कांहीं ॥२६६॥
अण्णा देशपांडे उठुनी उभे ठेले । आणिक गर्जले मी हो जातों ॥२६७॥
तुमचीये कृपेनें पल्याड जावोन । रेती ते घेवोन येईन मी ॥२६८॥
अण्णा मास्तरांनीं करुनी नमस्कार । मस्तक चरणावर ठेवियेलें ॥२६९॥
आशीर्वाद बाबा देती तेव्हां त्यांसी । मिळवाल यशासी ईशकृपें॥२७०॥
अण्णा मास्तरांनीं कसीयेला कांचा । आणि जावयाचा बेत केला ॥२७१॥
त्यासवें जावया नरहरी काळे । तये वेळीं झाले सिद्ध तेही ॥२७२॥
दोघेही निघोन उतरले भीमेंत । भीमा ते वहात भरोनिया ॥२७३॥
सद्गुरूंचा जप करिती देशपांडे । चालती आनंदें पाण्यामाजी ॥२७४॥
गेली भय भीती सांडोनि तयांस । धरितांच बाबांस मनीं त्यांनीं ॥२७५॥
एक एक पाऊल जाती उचलीत । पाणी तें कीं येत वरिवरी ॥२७६॥
गळ्यावेरी आलें पाणी तें अण्णांच्या । परी तोंडीं त्यांच्या न च जात ॥२७७॥
सवें ते कीं काळे त्यांच्याही गळ्यास । पाणी येत खास तैसेंची कीं ॥२७८॥

शेवटवेरी जातां पाणी गळ्यावेरी । गेले पैलतीरीं देशपांडे ॥२७९॥
इकडे ओट्यावरी बसोनियां बाबा । दृष्टीचा वोथंबा धरिती तेथ ॥२८०॥
टक लावोनियां त्या कीं दोघांवरी । बैसले बाहेरी बाबा तेव्हां ॥२८१॥
घेवोनियां रेती अण्णा परतले । त्यांचेसवें आले काळे तेही ॥२८२॥
येतां परतोन तेवढेंच पाणी । लक्षिलें दोघांनीं तैसेंचि तें ॥२८३॥
अमाप तें जल असतां बहु खोल । झालें गळाभर दोघांसी तें ॥२८४॥
सद्गुरूंचे कृपें परतोनि आले । यश तें मिळालें देशपांड्यांसी ॥२८५॥
आणियेली रेती ठेविली बाबांपुढती । चरणांतें वंदिती प्रेमभरें ॥२८६॥
आनंदाश्रू आले नयनीं मास्तरांच्या । शब्द न उमटे वाचा सद्गदीत ॥२८७॥
सद्गुरु बाबांनीं उठवोन त्यांसी । वंदिलें रेतीसी धरुनी भालीं ॥२८८॥
ज्ञान-वैराग्याची असे ही कीं रेती । लावा भाळाप्रती सकळिक ॥२८९॥
सर्वांनीं ती रेती धरोनि मस्तकीं । वंदिली कीं निकी तात्काळची॥२९०॥
अण्णा मास्तर झाले गुरुकृपें यशस्वी । परीक्षा ही बरवी पास झाले ॥२९१॥
कृपा त्यांचेवरी असे कीं बाबांची । अतीव प्रेमाची सत्य सत्य ॥२९२॥
श्रीपाद गोखले भक्त तो बाबांचा । जाई दर्शना त्यांच्या प्रतिदिनीं ॥२९३॥
मॅट्रिक परीक्षेमाजी यश तें न येत । नापास तो होत वेळोवेळां ॥२९४॥
बाबा सांगताती लावीं उदबत्तीस । करुनी प्रार्थनेस बीडकरांसी ॥२९५॥
चार पांच वेळां ऐसेंचि तें झालें । यश न मिळालें तयासी तें ॥२९६॥
लोक चिडविती काय देती बाबा । वायांचि तूं कां बा श्रमतोसी ॥२९७॥
तरी त्याचा विश्वास बाबांवरी खास । शेखीं अखेरीस पास झाला ॥२९८॥
बाबांनीं वाटिले पेढे सकळांस । श्रीपाद तो पास झाला म्हणती ॥२९९॥
चेष्टेखोर झाले खजील ते फार । शब्द न उच्चार करिती मग ॥३००॥
भालू थत्ते यासी आणि श्रीपाद गोखल्यासी । बिळें लिंपायासी
सांगती बाबा ॥३०१॥

उंदरांचीं बिळें प्रतिदिनीं लिंपोन । जाती परतोन स्वगृहासी ॥३०२॥
दुजे दिनीं येतां बाबांचे दर्शना । जैशीं तैशीं पुन्हां दिसती बिळें॥३०३॥
पुनरपि लिंपाया सांगती सद्गुरु । खेळ महिनाभरू चाले हाची ॥३०४॥
चार दिवसांचें शिळें अन्न त्यांसी । द्यावें खावयासी प्रसाद तो ॥३०५॥
परी न त्या अन्ना वास तिळभरी । ताजें भासे तरी जैसें तैसें ॥३०६॥
श्रीपाद गोखल्यासी बाबांनीं ते दिले । रुपये त्या वेळे भांडवलासी ॥३०७॥
भांडवल म्हणोन ठेवावें जपोन । घालोनी दुकान करिं तूं धंदा ॥३०८॥
आज्ञेप्रमाणें तो भुसार-मालाचा । आणिक दुधाचा धंदा करितो ॥३०९॥
भागीदार असती त्याचे या धंद्यांत । परी ना तें होत भांडण कीं॥३१०॥
भागीदारपत्र करुनी रजिस्टर । मिळोनी सर्वत्र धंदा करिती ॥३११॥
धंदा करुनी त्यानें बांधियेलें घर । पुण्यास तें थोर एरंडवण्यांत ॥३१२॥
पत्नी मुलगे आणि वडील-मातेसह । राहोनि निर्वाह करीतसे ॥३१३॥
बंधू-भगिनीसी देवोनि शिक्षण । चतुर करोन ठेवियेलें ॥३१४॥
गृहीं सकलांची निष्ठा बाबांवरी । असे ती कीं पुरी भक्तियुक्त ॥३१५॥
उपासना श्रीपादा दिधली बाबांनीं । करितो प्रतिदिनीं तो ही तीच ॥३१६॥
अण्णा गोखले हे वडील श्रीपादाचे । निष्ठावंत साचे असती भक्त ॥३१७॥
त्यांसीही रक्षिलें बाबांनीं हें सत्य । अर्धांग-वातांत आजवेरी ॥३१८॥
तेही नित्य करिती उपासना फार । श्रद्धा बाबांवर ठेवोनियां ॥३१९॥
पुढिलिये अध्यायीं आणिक भक्तांचीं । नामें अनेकांची कथिजितील ॥३२०॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । एकादश अध्याया झाली समाप्ती ही ॥३२१॥

॥ एकादशाध्याय समाप्त ॥

# अध्याय बारावा

मलरहित तूं असति गुरुदेवा । काय तो वानावा महिमा बोलीं ॥१॥
सेवकां रक्षिसी करोनी कल्याण । त्यांचें जन्म-मरण निवारोनी ॥२॥
वायूसम तूंचि सकळां जीवविसी । भक्तांतें रक्षिसी सर्वकाळ ॥३॥
वेदशास्त्ररूपी वृक्षाचें तूं फळ । सामर्थ्य अतुल तुझे ठायीं ॥४॥
उपनिषदांनीं वर्णिल्या आत्म्याची । प्राप्ती करूनी साची देसी तूं कीं ॥५॥
पूर्ण परात्परू तूंचि सद्गुरुनाथ । कैवार तूं घेत सद्भक्तांचा ॥६॥
विषयवासना नसे जयांपाशीं । त्यांच्या कैवारासी धांव घेसी ॥७॥
कराल तो काळ तुझाचि अंकित । परिपूर्ण नित्य अससी तूं ॥८॥
उपाधीरहित स्वानंदसागरू । तुझा अंत-पारू न लगे कवणा ॥९॥
स्वयंप्रकाशी तूं जगतासी आधार । तुझा जयजयकार करीतसे ॥१०॥
अत्यंत तूं शुद्ध स्वयें तूंचि ज्ञान । मदनासी नाशोन टाकितोसी ॥११॥
दयेचा सागर तूं गा परात्पर । तुझा जयजयकार असो सदा ॥१२॥
माझा तो मीपणा नाशोनियां तुम्ही । स्तवनाची ऊर्मी दिधली मज ॥१३॥
तूं गा त्रिगुणातीत तूंचि मायबाप । त्रिविधही ताप निवारिसी ॥१४॥
अंतर्बाह्य जो कीं व्यापोनि राहतो । आत्मा असती तो तूं कीं माझा ॥१५॥
कांहीं न बोलणें हेंचि तुझें स्तवन । पूजा हेचि जाण न करणें कांहीं ॥१६॥
जीव-शिव अथवा ब्रह्मभाव दुरी । सांडोनी निर्धारीं राहणें तें ॥१७॥
ऐसें असे जरी तरी मी लेंकरूं । म्हणोनि स्वीकारू करीं माझा ॥१८॥
वेडावलें बाळ बोले नाना रीती । तैसा तुम्हांप्रती स्तवितों मी ॥१९॥
सकळिकाची मज क्षमा ती करोन । घ्यावें सामावोन स्वरूपामाजी ॥२०॥
ऐसा तूं समर्थ म्हणूनी जयजयकार । करितों साचार क्षणोक्षणीं ॥२१॥
ऐसे जे सद्गुरु बाबा रामचंद्र । रावसाहेब थोर म्हणती ज्यांसी ॥२२॥

वासुदेवानंत सरस्वती हें नाम । अवधूत पूर्णकाम देती त्यांसी ॥२३॥
योगपटामाजी हेंचि नाम त्यांचें । लिहिलेलें साचें असे जाणा ॥२४॥
पूर्ण योगारूढ होवोन बैसले । हें नाम त्या वेळे ठेविती दत्त ॥२५॥
स्वयें सद्गुरु बाबा आपुलिये हस्तें । नांव लिहिती तें फोटोखालीं ॥२६॥
तो फाटो दिधला जोगळेकर यांसी । रामभाऊ शिष्यासी सद्गुरूंनीं ॥२७॥
जोड पादुकांची जोडी दिली एक । गाणगापुरीं देख तयांसी ती ॥२८॥
पुरंदरे कॉलनींत असे ज्यांचें घर । रक्षिती ते फार फोटोसी त्या ॥२९॥
तयां मंत्रदीक्षा देती सद्गुरुराज । जावयासी माज अहंतेचा ॥३०॥
एकदां तयांचा मुलगा आमांशानें । आजारीपणानें गृहीं होता ॥३१॥
रामभाऊ आले बाबांचे दर्शना । सांगती बाबांना पुत्रवार्ता ॥३२॥
बाबांनीं आणविलीं केळीं डझनभर । भक्षिलीं समग्र तेच क्षणीं ॥३३॥
बाबा आमांशानें जाती परसाकडे । इकडे वाटे बरें रामभाऊसुता ॥३४॥
रामभाऊ काढिती भूतपिशाच्चासी । साह्य ते लोकांसी करिती ऐसें ॥३५॥
मिसर नांवाचे शिष्य एक होते । परि निवर्तले ते पुण्यांतची ॥३६॥
त्यांचे नांवापुढें बाबांनीं लिहिलें । शिवाजी हें भलें एक नांव ॥३७॥
आर्. बी. आंबेकर शिष्य हे बाबांचे । रहिवासी पुण्याचे
असती आज ॥३८॥
रामचंद्र नाम म्हणती भाऊ यांसी । हे दत्त-भक्तीसी करिताल ॥३९॥
यांसी गणपति एक बाबांनीं दिधला । गृहांत ठेविला असे यांनीं ॥४०॥
एक तो पोपट पिंजऱ्यासहित । बाबा यांसी देत पाळावया ॥४१॥
इस्लामपुरीं चालवील दत्त-संप्रदाय । ऐसी उक्ती होय बाबांची ती ॥४२॥
पी. डब्ल्यू. डीं. त होते नोकरीस । पाणी-खातीं त्यास दिधली सेवा ॥४३॥
सतत दश वरुषें यांनीं सेवा केली । बाबांची सकाळीं देउनी चहा ॥४४॥
न चुकतां येती चहा द्यावयास । कोणी तरी खास प्रतिदिनीं ॥४५॥

उदबत्ती लावोन गृहीं बैसतात । प्रश्न सांगतात लोकांसी हे ॥४६॥
यशवंत अप्पा यांचा एकचि हा सुत । नोकरी करित पुण्यामाजी ॥४७॥
तोही बाबांकडे जात सर्वकाळ । तया सद्गुरु दयाळ सांभाळिती ॥४८॥
बी. डी. कुळकर्णी असती शिष्य एक । नोकरी सुरेख करोनियां ॥४९॥
त्यांसी मंत्रानुग्रह दिधलासे बाबांनीं । गणेश अथर्वशीर्ष सांगोनी
सुखी केलें ॥५०॥
कुळकर्णी जाती बाबांकडे नित्य । साधाया स्वहित आपुलें तें ॥५१॥
गणोरे ते भक्त स्वपत्नीसहित । बाबांकडे जात दर्शनासी ॥५२॥
शंकर टिकारे होता एक भक्त । बाबांच्या तो येत दर्शनासी ॥५३॥
पावला पंचत्व गेला तो मरोन । येती कोण कोण ऐसें जाणा ॥५४॥
रामभाऊ सहस्रबुद्धे दर्शनासी जाती । सेवा ते करिती बाबांची कीं ॥५५॥
आपुले गृहांत वसती पुण्यांत । आजारी ते असत सर्वकाळ ॥५६॥
मोडक टेलर्स यांचे चालक मोडक । दर्शनासी एक येत होते ॥५७॥
हेजीब दुकानदार दर्शनासी येती । श्रध्दा त्यांची होती बाबांवरी ॥५८॥
जी. पी. जोशी एक येत दर्शनास । पी. डब्ल्यू. डी. खात्यास नोकरी करिती ॥५९॥
पाटील नांवाचे एक इंजिनिअर । भाविक जे फार येती तेथ ॥६०॥
दर्शन बाबांचें करोनियां जाती । असे दृढ भक्ती त्यांची थोर ॥६१॥
तयां आशीर्वाद असे तो बाबांचा । भाव थोर त्यांचा बाबांवरी ॥६२॥
महाडदोळकर भक्त राहती बुधवारांत । दर्शनासी येत रावसाहेबांचे ॥६३॥
अद्यापही येती समाधीचे स्थानीं । दर्शना लागोनी महाडदोळकर ॥६४॥
त्यांचे पुत्र तेही पुढें चालविती । वडिलांची ही भक्ती भावनेनें ॥६५॥
अजोनिही बाबा देवोनि दर्शन । करिती समाधान तयांचे कीं ॥६६॥
इंजीनिअर गोडबोले बाबांचे खोलींत । दर्शनासी येत वारंवार ॥६७॥
खंडेराव वाघ भक्त ते बनोन । राहताती अजून पुण्यामाजी ॥६८॥

त्यांनींच एक प्लॉट दिधला बक्षीस । करुनी कागदास रजिस्टर ॥६९॥
अप्पा आठवले पुण्याचे डॉक्टर । जाती वारंवार दर्शनासी ॥७०॥
एक रत्तल कॉडलिव्हर यांसी तें पाजिलें । एका वेळीं गेले पिओनी हे ॥७१॥
यांचे ते वडील असती भाऊराव । दर्शना स्वयमेव येती जाती ॥७२॥
दत्तोपंत भट नोकरी करीत । रेशनिंग खात्यांत होते तेव्हां ॥७३॥
येती बाबांपाशीं सेवा करण्यासी । करिती वंदनासी भावें हे कीं ॥७४॥
श्रीसूक्ताचे पाठ करण्या सांगितलें । बाबांनीं त्या वेळे यांसी सदा ॥७५॥
किराणा दुकान नारायण पेठेंत । कांहीं दिवस असत यांचें तें गा ॥७६॥
बाबांचे हे भक्त असती श्रद्धायुक्त । परी विपरीत वर्ततातीं ॥७७॥
मकरंद भट असती वकील पुण्यांत । बालाजी मंदिराप्रत वाडा यांचा ॥७८॥
यांचे लग्नासमयीं बाबा हजर होते । नातेवाईक ते बाबांचे कीं ॥७९॥
भापकर पिता-पुत्र येती दर्शनास । पेट्रोल पंपास चालविती ॥८०॥
रंगराज बछराज मेहता मारवाडी । श्रद्धा यांची बडी सद्गुरुचरणीं ॥८१॥
नित्य सोमवारीं दर्शनासी जाती । बाबा पुशितातीं वृत्त सारें ॥८२॥
बाबांचे कृपेनें यांसी पुत्र दोन । दिलीप विजय म्हणोन झाले तेव्हां ॥८३॥
भाविक मारवाडी असे निष्ठावंत । भक्ती जो करीत श्रद्धेनें कीं ॥८४॥
रंगराज आणि त्यांचे पुत्र दोन । मंदिरीं येवोन दर्शन घेती ॥८५॥
दर सोमवारीं बाबांचे मंदिरीं । न चुकतां यांची स्वारी येत असे ॥८६॥
बाबांचे कृपेनें असती आनंदांत । आनंदें रहात पुण्यामाजी ॥८७॥
घसेटी पुलावरी बेंद्रे एक भक्त । दर्शनासी जात बाबांकडे ॥८८॥
त्याच्या मालकीचें घर असे तेथ । समाधी असत तेथें एक ॥८९॥
नाथ-सांप्रदायी समाधी ती एक । वरी नंदी देख बसलेला ॥९०॥
याचे गृहीं बाबा गेले एक वेळ । पाहोनी सकळ आले स्थान ॥९१॥
तयासी सांगती मीच असें नंदी । बोलुनी कृपानिधी स्वयमेव ॥९२॥

नंदीवरी गळती ठेवा सांगितलें । अभिषेला भले करा तेथ ॥९३॥
यांचेवरी कृपा असे ती बाबांची । बेंद्रे ज्योतिबाची करिती भक्ती ॥९४॥
ठाकुर बॉन्डरायटर काम लिहिण्याचें । करिती हे साचें बुधवारांत ॥९५॥
सिटी पोस्टासमोर बैसोनी लिहितात । मनीऑर्डरी पत्रें नित्य लोकांची ते ॥९६॥
अद्यापी हे येती समाधी-मंदिरीं । निष्ठा यांची खरी बाबांवरती ॥९७॥
वसंतराव पेठे भक्त ते बाबांचे । येउनी समाधीचें दर्शन घेती ॥९८॥
बाबांनीं दिलेले यांसी कांहीं पैसे । त्यांची पूजा तैसे करिती नित्य ॥९९॥
मुकुंद आणिक रमेश तो पेठे । भक्त हेही मोठे मुलगे दोन्ही ॥१००॥
पेठ्यांची मंडळी आणिक ती कन्या । येती दर्शन घेण्या समाधीस ॥१०१॥
शंकर कुळकर्णी सिनेमांत नट । त्याची होत भेट बाबांपाशीं ॥१०२॥
भक्ती करितसे बाबांची तो तेव्हां । दावी प्रेमभावा बाबांठायीं ॥१०३॥
प्रभाकर जोशी असे जो ज्योतिषी । तोही बाबांपाशीं नित्य येई ॥१०४॥
करूनियां जाई बाबांचें दर्शन । मंत्र त्या देवोन तोषवीला ॥१०५॥
माधव दत्तात्रेय चितळे पुण्यास । करोनियां वास राहातसे ॥१०६॥
त्यासी मंत्रानुग्रह दिधला बाबांनीं । उपासना करोनी वर्तत आहे ॥१०७॥
त्याचे चुलते होते थोर ते कीं फार । परी कवणा थार देती न ते ॥१०८॥
अपुलें अनुसंधान कळाया न देती । नित्य ते राहती गृहीं यांच्या ॥१०९॥
दिघे मास्तर यांसी म्हणती ते बाबा । अँड्र्यूज सेंट तूं गा पूर्वजन्मीं ॥११०॥
त्याचेवरी कृपा करुनी बाबांनीं । लावियेला ध्यानीं आपुलिये ॥१११॥
मधु देशपांडे भक्त हा बाबांचा । करी नोकरी साचा परोपरी ॥११२॥
थोर ती भावना बाबांचिये ठायीं । याची असे पाहीं सर्वकाळ ॥११३॥
येउनी बाबांपाशीं सेवा तो करीत । बाबा कृपावंत झाले यासी ॥११४॥
कृपा करोनीयां दिधला आशीर्वाद । भजोनि स्वानंद करीं म्हणती ॥११५॥
बाबांसवें यात्रेमाजी हे कीं जाती । यात्रा ते करिती बाबांसंगें ॥११६॥

बाबांचे अनुभव यांसी तेव्हां येत । बाबांसी मानीत दैवत हे ॥११७॥
धुमाळ बिल्डिंगांत परांजपे दादा । बाबांसी सर्वथा मानिताती ॥११८॥
जाती बाबांपाशीं नित्य एक वेळ । दर्शन केवळ घ्यावयासी ॥११९॥
कधीं सांगितल्या करिती हे सेवा । बाबांचे वैभवा काय वानूं ॥१२०॥
बी. पी. गवळी येत बाबांचे दर्शना । कल्याणाहुनी जाणा
कधीं कधीं ॥१२१॥
सोळा ताड्यांची ती छत्री त्या सांगती । आणावयाप्रती सद्गुरु बाबा ॥१२२॥
तैसे अनुभव यासी आले फार । अंत न कळे पार बाबांचा तो ॥१२३॥
दिगंबर दाभोळकर भक्त मुंबईचा । आला दर्शनाचा घेउनि ध्यास ॥१२४॥
अधू त्याची दृष्टी त्यासी सांगताती । तुझ्या दृष्टीप्रती लक्ष माझें ॥१२५॥
फिरूं नका पुण्यांत सांडोनियां जाल । स्वस्थ जरि बैसाल
तरिच साधे ॥१२६॥
अहमदनगरचे ते वकील भालेराव । परमार्थाची हांव भारी यांसी ॥१२७॥
कुळकर्णी महाराज होते गुरु यांचे । चरित्र तयांचें लिहिलें यांनीं॥१२८॥
बाबांचे दर्शना आले हे पुण्यांत । दर्शनानें तृप्त झाले फार ॥१२९॥
सुंदरराव नाईक वसती मुंबईस । दर्शनासी खास आले तेथ ॥१३०॥
हिंगाष्टक-चूर्ण एक बाटलीभर । बाबांनीं सत्वर दिधलें यांसी ॥१३१॥
नाईक गणपतराव असती वकील । राहती करूनी घर ग्रँट-रोडासी ॥१३२॥
यांच्या घरीं जोडे आहेत स्वामींचे । मिळाले ते यांचे आजोबांसी ॥१३३॥
यांचे वडील रामचंद्रपंत । अंगावरी पाजीत स्वामी त्यांसी ॥१३४॥
यांचे घरावरी कृपा ती स्वामींची । असे कीं प्रेमाची सर्वकाळ ॥१३५॥
पांडुरंगराव मरबळ्ळी थोर स्वामिभक्त । मुंबापुरीं वसत ताडदेवास ॥१३६॥
अनन्य भावानें करिती स्वामिभक्ती । स्वामिचरणीं प्रीती ठेवोनीयां ॥१३७॥
स्वामींनींच दिला यांसी ध्यानयोग । अभ्यासें हा योग साधिती ते ॥१३८॥

एकोणीसशें त्रेपन्न सालीं बाबा यांसी । कथिती पुण्यासी यावयास ॥१३९॥
आज मी येईन खालीं उतरोन । घेईं तूं दर्शन येउनि तेथें ॥१४०॥
ऐसा तो दृष्टांत होताच बाबांचा । मार्गू तो पुण्याचा धरिला त्यांनीं ॥१४१॥
साच त्याच दिनीं माडीवरूनी खालीं । बाबांची ती आली स्वारी सत्य ॥१४२॥
काळ्यांचे गृहास जावोनी बैसले । परी न रमलें चित्त त्यांचें ॥१४३॥
सर्वेच परतोन आले स्वस्थानासी । धुमाळ बिल्डिंगासी लगबग करूनी ॥१४४॥
त्या वेळीं मरबळ्ळी होते त्यांच्या संगें । दर्शनाचे रंगें आनंदले ॥१४५॥
देह तो सोडितां बाबांनीं पुण्यांत । अंत्ययात्रेप्रत आले हे कीं ॥१४६॥
बाबांनीं कथिलें पांडुरंगरावांसी । दोन त्या अस्थींसी काढुनि घ्यावें ॥१४७॥
आणि विठोबास द्याव्या तूं त्या अस्थी । म्हणोनियां देती दृष्टांत तो ॥१४८॥
दृष्टांताप्रमाणें दोन अस्थी यांनीं । घेतल्या काढोनी चितेंतून ॥१४९॥
पुढें एकोणीसशें पासष्ट सालांत । विठ्ठलरावांप्रत देती अस्थी ॥१५०॥
शास्त्रशुद्धमार्गें करुनी शुद्धी त्यांची । अस्थी कलशासी ठेवियेल्या ॥१५१॥
ऐसी ही समाधी सद्गुरु बाबांची । मुंबापुरींत जी असे आज ॥१५२॥
तेथ दररोज होत अनुष्ठान । ब्राह्मणाकडोन तीन तास ॥१५३॥
करिती पूजाअर्चा भक्तजन सारे । आणि प्रेमभरें दर्शन घेती ॥१५४॥
पांडुरंगरावांची मंडळी रुक्माबाई । स्वामिभक्त तीही असे फार ॥१५५॥
मरबळ्ळी गेले सोडुनि कलेवर । लक्षुनि स्वर्गद्वार निघुनी गेले ॥१५६॥
आज समाधिमंदिरीं असे जें पुण्यांत । तैलचित्र सांप्रत बाबांचें कीं ॥१५७॥
तेंची काढियेलें सावर्डेकरांनीं । चित्रकार म्हणुनी कीर्ती त्यांची ॥१५८॥
चित्र रेखितांना त्यांसी तीन वेळा । दिधलें दर्शन सोज्वळ रावसाहेबांनीं ॥१५९॥

कांहीं सूचना त्या देवोनियां त्यांसी । चित्राचे पूर्तीसी करवीलें ॥१६०॥
हेही स्वर्गवासी होवोनियां गेले । बाबांचे जाहले चित्रकार ॥१६१॥
प्रताप विश्वास वामन जयंत । दर्शनासी येत यंदे-बंधू ॥१६२॥
त्यांचे काका आणि माता तीही येई । दर्शन घेउनि जाई बाबांचें ती ॥१६३॥
गजानन गुप्ते महाराजांचे सारे । भक्त हे कीं खरे मुंबापुरीस ॥१६४॥
नाना पाठक येती दर्शना बाबांचे । गजानन महाराजांचे भक्त तेही ॥१६५॥
डॉक्टर कारखानीस गणेश त्रिंबक । असती उपासक आणि संत ॥१६६॥
तांबे-बोळामाजी असे गृह यांचें । दर्शना बाबांचे हेही येतो ॥१६७॥
बाबा यांसी वदती तुम्ही नाजूक फार । कृपा तुम्हांवर ईश्वराची ॥१६८॥
पांडुरंगाचीं हो तुम्ही कीं लेंकुरें । खेळा प्रेमभरें सर्वकाळ ॥१६९॥
गजानन गुप्ते महाराज थोर । त्यांचा कृपाकर मस्तकिं तुमचे ॥१७०॥
हुरडा जोंधळ्याचा एक मूठभर । घातिला सत्वर यांचे मुखीं ॥१७१॥
आजवरी यांसी मिळे ती भाकरी । जोंधळ्याची बरी वेळापुरीं ॥१७२॥
कांहीं वेळ राहती हे कीं वेळापुरीं । कांहीं दिनवेरी पुण्यामाजी ॥१७३॥
सतत असती रंगोनी स्वरूपीं । वर्तती साक्षेपी सर्वकाळ ॥१७४॥
नसे देहभान चहाची आवडी । तपकिरीची गोडी फार यांसी ॥१७५॥
सिद्ध पुरुष हे कीं आज विद्यमान । कृपा यांसी पूर्ण बाबांची कीं ॥१७६॥
स्वानुभवानें ते करिती प्रवचन । साधकासी ज्ञान व्हावयासी ॥१७७॥
बाबांचे मंदिरीं येती वारंवार । चरणीं भाव थोर असे यांचा ॥१७८॥
डॉक्टर हरीभाऊ आठल्ये मुंबईस । मानिती बाबांस फार हे कीं ॥१७९॥
त्यांचे कृपेनें ते करिती नोकरी । खाजगी प्रॅक्टिस बरी असे त्यांना ॥१८०॥
पतिपत्नी दोघें करिती उपासना । मानीती बाबांना अतिशय ॥१८१॥
त्रिंबकराव तेंडोलकर वकील मुंबईस । त्यांनीं दर्शनास घेतलें कीं ॥१८२॥
बाबा असतांना घडलें यां दर्शन । आशीर्वाद मिळुन तृप्त झाले ॥१८३॥

कांहीं सूचना त्या देवोनियां त्यांसी । चित्राचे पूर्तीसी करवीलें ॥१६०॥
हेही स्वर्गवासी होवोनियां गेले । बाबांचे जाहले चित्रकार ॥१६१॥
प्रताप विश्वास वामन जयंत । दर्शनासी येत यंदे-बंधू ॥१६२॥
त्यांचे काका आणि माता तीही येई । दर्शन घेउनि जाई बाबांचें ती ॥१६३॥
गजानन गुप्ते महाराजांचे सारे । भक्त हे कीं खरे मुंबापुरीस ॥१६४॥
नाना पाठक येती दर्शना बाबांचे । गजानन महाराजांचे भक्त तेही ॥१६५॥
डॉक्टर कारखानीस गणेश त्रिंबक । असती उपासक आणि संत ॥१६६॥
तांबे-बोळामाजी असे गृह यांचें । दर्शना बाबांचे हेही येतो ॥१६७॥
बाबा यांसी वदती तुम्ही नाजूक फार । कृपा तुम्हांवर ईश्वराची ॥१६८॥
पांडुरंगाचीं हो तुम्ही कीं लेंकुरें । खेळा प्रेमभरें सर्वकाळ ॥१६९॥
गजानन गुप्ते महाराज थोर । त्यांचा कृपाकर मस्तकिं तुमचे ॥१७०॥
हुरडा जोंधळ्याचा एक मूठभर । घातिला सत्वर यांचे मुखीं ॥१७१॥
आजवरी यांसी मिळे ती भाकरी । जोंधळ्याची बरी वेळापुरीं ॥१७२॥
कांहीं वेळ राहती हे कीं वेळापुरीं । कांहीं दिनवेरी पुण्यामाजी ॥१७३॥
सतत असती रंगोनी स्वरूपीं । वर्तती साक्षेपी सर्वकाळ ॥१७४॥
नसे देहभान चहाची आवडी । तपकिरीची गोडी फार यांसी ॥१७५॥
सिद्ध पुरुष हे कीं आज विद्यमान । कृपा यांसी पूर्ण बाबांची कीं ॥१७६॥
स्वानुभवानें ते करिती प्रवचन । साधकासी ज्ञान व्हावयासी ॥१७७॥
बाबांचे मंदिरीं येती वारंवार । चरणीं भाव थोर असे यांचा ॥१७८॥
डॉक्टर हरीभाऊ आठल्ये मुंबईस । मानिती बाबांस फार हे कीं ॥१७९॥
त्यांचे कृपेनें ते करिती नोकरी । खाजगी प्रॅक्टिस बरी असे त्यांना ॥१८०॥
पतिपत्नी दोघें करिती उपासना । मानीती बाबांना अतिशय ॥१८१॥
त्रिंबकराव तेंडोलकर वकील मुंबईस । त्यांनीं दर्शनास घेतलें कीं ॥१८२॥
बाबा असतांना घडलें यां दर्शन । आशीर्वाद मिळुन तृप्त झाले ॥१८३॥

हेही मानताती बाबांसी बहुत । भाव बाबांप्रत असे यांचा ॥१८४॥
इन्कमटॅक्सची हे करिताती प्रॅक्टीस । प्रॅक्टीस ती त्यांस असे बहुत ॥१८५॥
विनायकराव भागवत होते ते पुण्यांत । धंदा ते करीत पुस्तकांचा ॥१८६॥
यथाशास्त्रविधि पूजा त्यांनीं केली । बाबांची सगळी प्रेमभरें ॥१८७॥
आणि उपासना घेतली मागोन । शिष्य झाले जाण बाबांचे हे ॥१८८॥
नित्य दर्शनास येती बाबांपाशीं । त्यजोनी देहासी गेले हे कीं ॥१८९॥
गणेश आळेकर नावांचे गृहस्थ । येत कीं असत बाबांकडे ॥१९०॥
बाबा असतांना पी. डब्ल्यू. डीं. त । हाताखालीं करित होते काम ॥१९१॥
फोटो काढण्याची कला यांचेपाशीं । बाबांचे फोटोसी काढितात॥१९२॥
बहुत तीं चित्रें यांनीं काढियेलीं । बाबांचीं सगळीं वेळोवेळीं ॥१९३॥
नित्य बाबांपाशीं येवोनि बैसत । सेवा ते करीत बाबांची ती ॥१९४॥
पेन्शन आणायासी जाती बाबांसंगें । कष्टती निजांगें बाबांसाठीं ॥१९५॥
पेन्शन यांसी नाहीं झाली शेवटवेरी । पैसा नानापरी मेळविती ॥१९६॥
होमिओपाथीची प्रॅक्टीस हे करिती । औषध रोग्यांप्रती देवोनियां ॥१९७॥
तुळशीबागेपाशीं राहती पुण्यांत । बाबांसवें जात ठायीं ठायीं ॥१९८॥
गणेशनाथ वैद्य थोर सत्पुरुष । होते कीं पुण्यास पूर्वकाळीं ॥१९९॥
मटंगे वैद्य म्हणुनी ओळखिती यांसी । होते नोकरीसी रेल्वेमाजी॥२००॥
नाथ-सांप्रदायी होते बाबा वैद्य । उपासना अभेद्य असे त्यांची ॥२०१॥
गणेशनाथांचे शिष्य आळेकर । सांप्रदाय थोर नवनाथांचा ॥२०२॥
आळेकर गेले देहासी त्यजोन । झालीं वर्षे तीन तयांसी तीं ॥२०३॥
बेडेकर अनंतराव शिष्य ते बाबांचे । असती मुंबापुरीचे रहिवासी ॥२०४॥
चित्रकला आणि कला गायनाची । असे यांजपाशीं उत्तम ती ॥२०५॥
बाबांनीं दिधली यांसी उपासना । करिती ते जाणा त्याच रीती ॥२०६॥
तरंगती हे कीं पडुनी पाण्यावरी । परी न पाण्याभीतरीं बुडतात ॥२०७॥

बाबांचीं तीं पत्रें बहुत मोलाचीं । असती यांचेपाशीं लिहिलेलीं ॥२०८॥
द. म. जोशी मास्तर असती एम्. ए., बी. टी. । बाबांची कृपा ती
यांसी झाली ॥२०९॥
बाबांप्रती हे कीं विचारिती प्रश्न । यांचें समाधान करिती बाबा ॥२१०॥
यांसी अनुग्रह करुनियां बाबांनीं । एक मास ध्यानीं रंगविलें ॥२११॥
राजगुरुनगरीं खेड-मंचरास । मास्तर हायस्कुलास असती हे ॥२१२॥
दाढी जटा यांनीं असती वाढविल्या । अभ्यासाची वेळा साधिती हे ॥२१३॥
मनीं येई तैसें वागती जगांत । पत्रें यांची येत बाबांसी तीं ॥२१४॥
कधीं काळीं येती समाधिदर्शना । रक्षी सद्गुरुराणा यांसी सदा ॥२१५॥
यांच्या त्या मातोश्री होत्या जोशीण काकू । मती ज्यांची व्यापकू
असे फार ॥२१६॥
बीडकरमठीं राहती या बाई । बाबांचिये ठायीं भाव यांचा ॥२१७॥
कांहीं मार्ग दिला यांजला बाबांनीं । गेल्या निवर्तोनी स्वर्गीं या कीं ॥२१८॥
भालचंद्र बापट आणि विमलाबाई । बीडकरमठीं हीं राहतात ॥२१९॥
नाना बापटांची सून चिरंजीव । मठींचें काम सर्व पाहताती ॥२२०॥
भालचंद्र बापट बीडकर मठाचे । ट्रस्टी हे कीं साचे असती आज ॥२२१॥
दोघेही दर्शना जाती बाबांपाशीं । करिती चरणांसी नमस्कार ॥२२२॥
द्वारकाताई असे कन्या बापटांची । बीडकरमठीं हिची असे वस्ती ॥२२३॥
करुनी ईश्वरभक्ती धरुनी अंतरिं भाव । राहते सदैव मठीं जाणा ॥२२४॥
हिजवरी कृपा बाबांची ती फार । बाबा तिसी निरंतर रक्षितात ॥२२५॥
पारखी मास्तर एक भक्त ते बाबांचे । भावे स्कुलीं यांचें नोकरीस्थान ॥२२६॥
सद्गुरु बाबांनीं मंत्र यां दिधला । म्हणती परमार्थाला करा आतां ॥२२७॥
पिंजऱ्यासहित पोपट असे दिधला यांस । रक्षावा कीं यास सांगोनियां ॥२२८॥
यांचे वडील होते भक्त बीडकरांचे । घराणें मूळचें बाळबोध ॥२२९॥

दिनकर बोरकर एक भक्त येती । बाबांचे लागती चरणीं ते ॥२३०॥
नित्य करोनियां जाती दरुशन । अन्न-प्रसाद पूर्ण मिळे यांसी ॥२३१॥
बाबांचे गुरुबंधू मोघे मुकुंदराव । दंग जे सदैव स्वरूपानंदीं ॥२३२॥
बीडकरांचा मार्ग यांनीं चालवीला । शिष्यगण केला इंदुरास ॥२३३॥
इंदुरीं राहोन करिती भजनास । होते नोकरीस इंदुरासी ॥२३४॥
प्रथम हे होते क्रांतिकारकांत । खटला यांवरि होत तये काळीं ॥२३५॥
बीडकर महाराजांनीं सोडविलें यांसी । करुनी अनुग्रहासी स्थिर केलें ॥२३६॥
उच्च पातळीस होते हे कीं गेले । बाबांचे हे भले असती स्नेही॥२३७॥
मानिती बाबांना अतीव अंतरीं । वर्णोनियां थोरी सांगती जनां ॥२३८॥
अकोल्यासि हे कीं पंचत्व पावले । पुत्राघरीं जाहलें निधन यांचें ॥२३९॥
सन एकोणीसशें एकाहत्तर सालीं । यात्रा संपविली इहलोकींची ॥२४०॥
खेड़ी घाटीं होते नर्मदेच्या तटीं । मोरटक्क्याप्रती मोघे हे कीं ॥२४१॥
रानडे शाम बाबा सत्पुरुष थोर । त्यांचे गुरुवर सांईनाथ ॥२४२॥
रानड्यांसी म्हणती महाराज उद्धवेश । लळा मोघे यांस होता यांचा ॥२४३॥
त्यांचेसंगें मोघे नर्मदेते तटीं । जावोनी राहती फार वेळां ॥२४४॥
दुर्गा दत्तात्रेय फडके गांवाची । मुलगी, बाबांची शिष्या असे ॥२४५॥
मुंबई शहारांत राहतेस नित्य । आणि रेलवेंत नोकरी करी ॥२४६॥
येई बहुत वेळां मुलगी ही पुण्यास । घ्याया दर्शनास बाबांच्या कीं ॥२४७॥
आज मुंबईत असे ही राहात । भजे बाबांप्रत भक्तीभावें ॥२४८॥
नीळकंठ खरे यांचे मेव्हणे ते एक । पुणें नगरीं देखा वसताती ॥२४९॥
यांचे गृहीं बाबा गेले दोन वेळां । बसोनी त्या स्थळा गृहीं आले ॥२५०॥
बाबांचा तो फोटो आणिक पादुका । विसर्जित देखा जाहल्या ज्या ॥२५१॥
तो फोटो आणि पादुकाही त्याच । समाधिमंदिरीं त्याच होत्या पूर्वीं ॥२५२॥
आतां यांचे घरीं असती वस्तु दोन्ही । ठेविल्या जपोनी त्यांनीं गृहीं ॥२५३॥

तळेकर नांवाचे मराठे गृहस्थ । येती बाबांप्रत दर्शनासी ॥२५४॥
त्यांसी मार्ग दिला बाबांनीं दावोन । तोची आचरोन असती हे ॥२५५॥
दत्तात्रेय आणि रामभाऊ समेळ । असती उतावेळ दर्शनासी ॥२५६॥
रामभाऊ राहात होते ते पुण्यांत । बाबा कृपा करित तयांवरी ॥२५७॥
आतां निवर्तोन गेले ते स्वर्गास । इहलोकींचा वास संपवोनी ॥२५८॥
दत्तोपंत समेळ असती मुंबापुरींत । पती-पत्नी करिती उपासना ॥२५९॥
खानवेलकर नामक एक प्रोफेसर । ज्यांचे सद्गुरुवर गुळवणी ॥२६०॥
वामनराव मामा असती योगमार्गीं । खानवेलकरांलागीं दिधली दीक्षा ॥२६१॥
बाबांचे दर्शना येती मधुनी मधुनी । लागति त्यांचे चरणीं मनोभावें ॥२६२॥
मोतीवाले लागू येती बाबांकडे । करिती कौतुक कोडें त्यांचें बाबा ॥२६३॥
लेले महाराज जे होते कीं वांईस । तेची गुरु खास असती यांचे ॥२६४॥
लागू सर्वांठायीं जाताती दर्शना । बहुत महाराजांना भेटायासी ॥२६५॥
बाबांचे गृहांत यांचें येणें जाणें । स्नेहाचेनि गुणें होतें फार ॥२६६॥
रायरीकर रबडे नारायण महाराजांचे । शिष्य हे प्रेमाचे असती जाणा ॥२६७॥
केडगावीं जाती सेवा करायास । राहती तेथें खास महिना महिना ॥२६८॥
बाबांपाशीं असे स्नेह यांचा बरा । बाबांचिया घरा येती ते कीं ॥२६९॥
बाळासाहेब भिडे आणि ब्रह्मेकाका । घेती लाभ निका दर्शनाचा ॥२७०॥
बहुत दिन येती बाबांसी भेटती । वंदन चरणाप्रती करिती भावें ॥२७१॥
मुरलीधर भोर वसती कल्याणांत । कृपा तयांप्रत बाबांची कीं ॥२७२॥
त्यांसी मार्ग देती बाबा ते सद्गुरु । व्हाया पैलपारू भवाब्धी हा ॥२७३॥
भोर बाबांसंगें यात्रेमाजी जाती । आणि लाभ घेती सहवासाचा ॥२७४॥
प्रेमभावें घालुनी चरणीं लोटांगण । भक्तिभावें जाण भजताती ॥२७५॥
वासुदेव तथा बाळ पानवळकर । असती दुकानदार पुण्यामाजी ॥२७६॥
अच्युतमामा यांचे पितृव्य ते जाणा । शिष्य बीडकरांना होते जे कीं ॥२७७॥

बाळ पानवळकरांसी बाबा बोलावीत। फोटो त्यांसी देत गुरुबंधूंचा ॥२७८॥
अच्युतमामांचा फोटो तो देवोन। म्हणती करा पूजन यांचें तुम्हीं ॥२७९॥
समाधिमंदिरांत करिती हे सेवा। प्रतिदिनीं बरवा धरुनी भाव ॥२८०॥
पत्नी कन्या सुत स्नुषा आणि नातू। बाबांवरी धरितु भक्तिभाव॥२८१॥
मंदिरस्थळासी सकळहि येवोन। दरुशन घेऊन करिती कामें ॥२८२॥
गजानन भाटवडेकर आणि येसूताई। वसती बाबांगृहीं सानपणीं॥२८३॥
बाबांचा सहवास लाभला तयांस। कृपापात्र खास झाली तीं कीं ॥२८४॥
येसूताई येती कधीं कधीं पुण्यास। समाधिमंदिरास दर्शनार्थ ॥२८५॥
गजानन भाटवडेकर असती मुंबापुरीं। कृपा त्यांचेवरी बाबांची ती ॥२८६॥
बळवंतराव कुळकर्णी बाबांघरीं होते। वांद्र्यासी जैं होते
सद्गुरु बाबा ॥२८७॥
करोनी नोकरीचा तो व्यवसाय। राहण्याची सोय गृहीं बाबांचे ॥२८८॥
यांचे पाशीं असती आठवणी बाबांच्या। सांगती त्या साच्या
प्रेमभावें ॥२८९॥
रामचंद्र भागवत अहमदाबाद नगरीं। राहती सेवाधारी बीडकरांचे ॥२९०॥
तेही स्वरूपध्याना नित्य अभ्यासिती। होतसे प्रगती थोडी थोडी ॥२९१॥
सद्गुरु बाबांनीं अंतकाळीं त्यांस। स्वप्न-दर्शनास दिधलें जाणा ॥२९२॥
यांचा असे भाव बाबांच्या चरणीं। मंदिरीं येवोनी दर्शन घेती ॥२९३॥
मंगळवेढेकर महाराजांचे शिष्य। भिडे होते खास पुण्यामाजी ॥२९४॥
शिवमंदिरीं नातूंचे नित्य हे राहात। खोली घेऊनि तेथ जवळीच ॥२९५॥
उदरनिर्वाहास करिती शिवणकाम। वाचनाचा नेम गुरुचरित्राचा ॥२९६॥
सात दिनीं करिती गुरुचरित्र सप्ताह। क्रम त्यांचा कीं हो बहुकाळींचा ॥२९७॥
एक हजार आठ केलीं पारायणें। सप्ताह-वाचनें करुनी यांनीं ॥२९८॥
प्रतिदिन मागती मधुकरी पुण्यांत। आणि चालवीत योगक्षेम ॥२९९॥

बाबा रोज रात्रीं दूध पावशेर । भिड्यांसी निर्धार करुनी देती ॥३००॥
फार वर्षें ऐसा नेम हा चालला । गुरूंनीं तोषविला ब्राह्मण हा ॥३०१॥
दोन वर्षांपूर्वी गेले हे मरोन । देहातें त्यजोनी पुण्यामाजी ॥३०२॥
एकूणपन्नास पन्नास सालीं नाना फडके। आले ते कीं निके बाबांपाशीं ॥३०३॥
नारायण रघुनाथ असे त्यांचें नांव । त्यांचा थोर भाव बाबांवरी ॥३०४॥
शोधित शोधित आले धुमाळ बिल्डिंगांत । दर्शनानें तृप्त जाहले ते ॥३०५॥
दर्शन घेवोन गेले स्वगृहास । परी चैन त्यांस न पडे गृहीं ॥३०६॥
पुनरपि परतोन लागोलाग आले । पायांशीं बैसले सद्गुरूंच्या ॥३०७॥
गुरुचरित्राचें करिती हे वाचन । माता-वडील पूर्ण सुसंस्कृत ॥३०८॥
सप्तशती-पाठ करिती प्रतिदिन । वडील यांचे जाण बहुकाळ ॥३०९॥
गुरुचरित्राचे तेही सप्ते करिती । धर्मशास्त्रीं प्रीती त्यांची भारी ॥३१०॥
नाना फडक्यांचें बहुतचि वाचन । करिती बहुतचि प्रश्न बाबांसी ते ॥३११॥
दर्शन होतां झाला क्रम तो नानांचा । स्थानीं बैसण्याचा सद्गुरूंचे ॥३१२॥
एकदिन झालें तेजोदर्शन यांसी । सद्गुरुकृपा त्यांसी झाली जाणा॥३१३॥
चौवीस कलाक दिठीपुढें तेज । न सुचे काम-काज त्यांसी कांहीं ॥३१४॥
बाबांसी पुसती काय ऐसें झाले । मन माझें गेलें भांबावोन ॥३१५॥
मग आपेंआप गेलें मावळोन । ठायींच झालें लीन आपेंआप ॥३१६॥
तैंपासोनियां प्रतिदिनीं अभ्यास । करिती हे खास स्वरूपाचा ॥३१७॥
यांसी क्षणोक्षणीं अनंत अनुभव येती । लिहावयाप्रती स्थळ ना येथ ॥३१८॥
गोकर्ण यात्रेसी बाबासंगें गेले । तेथें अनुभव आले त्यांसी फार॥३१९॥
एस्. डी. ओ. हे झाले बाबांचे कृपेनें । एक्झीक्यूटिव्ह इंजिनीअर
होणें घडलें पुढती ॥३२०॥
आज यां नोकरी स्टेट बँकेमाजी । एक्झीक्यूटिव्ह इंजिनिअरची
असे जाण ॥३२१॥

लोणी आणि ताक दररोज बाबांना। पोंचविती जाणा गोखले हातीं ॥३२२॥
सेवा वर्षे तीन चालविली यांनीं । पुढें तो बाबांनीं त्यजिला देह॥३२३॥
यांचे अनुभव असती थोर थोर । येतील समग्र चरित्रांत ॥३२४॥
बाबांचे कृपेनें संसारीं राहोन । करिती हे साधन परमार्थाचें ॥३२५॥
क्षयरोगांतोनि ह्यांच्या बंधूलागीं । बरा केला चांगी करुनी कृपा ॥३२६॥
शस्त्रक्रिया त्याची यशस्वी जाहली । नाना साह्यकारी असती बाबा ॥३२७॥
गोविंदराव जोगळेकर शिष्य हे बाबांचे । मूळ हे पेणेचे
असती जाणा ॥३२८॥
असतां हे पुण्यांत येती दर्शनास । मागती परमार्थास बाबांपाशीं ॥३२९॥
मिलिटरीमाजी यांची ती नोकरी । चालतसे बरी देहूरोडीं ॥३३०॥
तेथोनियां येती दर्शन करायास । साधोनी संधीस गोविंदराव ॥३३१॥
एकदां युरोपिअन साहेब वरिष्ठ । असे जो कीं खाष्ट बहुतची ॥३३२॥
तपासणीसाठीं येवोनी पातला । चमत्कार केला बाबांनीं तो ॥३३३॥
इतर गोष्टीमाजीं गुंतला साहेब । दाखवीत आब इतरांसी ॥३३४॥
यांच्या तुकडीची न करी तपासणी । गेला परतोनी साहेब तो ॥३३५॥
ड्रेस उतरोन गोविंदराव आले । दर्शना पातले सद्गुरूंच्या ॥३३६॥
बाबा पुसताती साहेबा काय झालें । गोविंदराव बोले परतुनी गेला ॥३३७॥
बाबांनीं एकदां गोविंदरावास । चहा करायास आज्ञापिलें ॥३३८॥
खिडक्या दरवाजे असती बंद सारे । गोविंदराव त्वरें विस्तव करीत ॥३३९॥
फुं फुं करुनी शेगडी पेटवीत तेव्हां । परी न विस्तवा मर्जी लागे॥३४०॥
धूर झाला भारी सर्वही खोलींत । नाकीं तोंडीं जात गोविंदरावांचे ॥३४१॥
बाबा न दिसती कोठें ते बैसले । परी तये वेळे घडलें भव्य ॥३४२॥
अत्यंत तेजस्वी हिरे चमकती । दिसे नयनाप्रती गोविंदराबा ॥३४३॥
तेज न देखवे नयनीं तें थोर । संपोनियां धूर गेला मग ॥३४४॥

गोविंदरावें केला चहा मग तेथ । बाबा म्हणतात पी रे बाळा ॥३४५॥
गोविंदराव जातां कसबा गणपतीस । तेजस्वी मूर्तीस देखे नयनीं॥३४६॥
तेथें ही तेजाची आली कीं प्रचीती । प्रेमें दर्शन देती गणपती त्यांस ॥३४७॥
पेणचे घरांत गोविंदराज मूर्ती । दिसे नयनांप्रती हास्यमुख ॥३४८॥
मोठी झाली ऐसें गोविंदरावांस । दिसलें स्वगृहास पेणेमाजीं ॥३४९॥
बाबांनीं टाळिला अपमृत्यू त्यांचा । विवाह तो त्यांचा पुढें झाला ॥३५०॥
पत्नी आणि मुलींसह मुंबईत । आज हे राहात विक्रोळीस ॥३५१॥
मिलिटरींतोन घेवोनि पेन्शन । सिक्युरीटी ऑफिसर म्हणोन
करिती सेवा ॥३५२॥
टाटा मेमोरिअल हॉस्पिटलांत नोकरी । गोविंदराव करिती सांप्रत ते ॥३५३॥
गुरुकृपें असे त्यासी समाधान । अभ्यास प्रतिदिन करिती ते ॥३५४॥
के. डी. गद्रेभाऊ शिष्य हे बाबांचे । रत्नागिरीस साचे राहताती ॥३५५॥
मिलिटरी अकौंट्स् माजी होती नोकरी यांना । रिटायर होती जाणा
कराचीहूनी ॥३५६॥
पुण्यास असतां बाबा यांचे घरीं । भोजन केव्हांतरी असती जात ॥३५७॥
हेही बहुतेक जाती दर्शनास । मुलगू म्हणती यांस सद्गुरु बाबा ॥३५८॥
अनुग्रह यांसी करुनी रावसाहेबांनीं । परमार्थसाधनीं लावियेलें ॥३५९॥
यांचे मंडळीस म्हणती सद्गुरुबाबा । आईसाहेब ते गा कांहीं वेळां ॥३६०॥
यांसी अनुभव येती पदोपदीं । असे यांची बुद्धी चमकदार ॥३६१॥
विनोदी बोलणें लक्षोनियां मर्म । न कळे धर्माधर्म यांसी कांहीं ॥३६२॥
गुरुचरित्राची यांसी प्रीती फार । सप्ते वारंवार करिताती हे ॥३६३॥
जपाचें लेखन आणिक तें ध्यान । राहिले करोन रत्नागिरींत ॥३६४॥
जमीन विकोन रुपये लक्षावधी । मिळती थोड्या अवधीमाजीं यांसी ॥३६५॥
दत्तमूर्ती आणि बाबांसी सेविती । अंबाबाई प्रती भजते पत्नी ॥३६६॥

विष्णुपंत नामें जे कीं चिपळूणकर । त्यांसी सद्गुरुवर कृपा करिती ॥३६७॥
मंत्र-जप आणि ध्यान-मार्ग देती । बाबा तयांप्रती कृपा करुनी ॥३६८॥
बर्मा शेलमाजी असे यां नोकरी । रिफायनरीमाझारी करिती काम ॥३६९॥
बाबांचे कृपेनें धन सुत दार । मिळोनि संसारा करिती हे ॥३७०॥
यांसी अनुभव येतात बाबांचे । नित्य ते कृपेचे बहुतची ॥३७१॥
अर्वाच्य हा विष्णु बनोनी सज्जन । सद्गुरु कृपाधनयुक्त झाला ॥३७२॥
अनेक इतर भक्त सहस्रावधी । बाबांसी भजती सर्वां ठायीं ॥३७३॥
न कळे कैसे कोठें असती ते कोण । बाबाच जाणोन असती त्यांसी ॥३७४॥
खरे खोटे आम्ही कासया म्हणावें । ज्यांचें त्यांस ठावें अंतरंगीं ॥३७५॥
ऐसे सद्गुरु बाबा यात्रा संपवोन । आले परतोन पुण्यामाजी ॥३७६॥
प्रवासाचा शीण होवोनियां फार । तापानें जर्जर शरीर झालें ॥३७७॥
नित्याचा बाबांचा आहार अगदीं थोडा । तोही त्यांनीं पुढां सांडियेला ॥३७८॥
पडती न बाहेरी गृहींच राहात । दर्शनासि येत भक्त बहु ॥३७९॥
दिसेंदीस प्रकृती चालली खंगत । परी दर्शनार्थ भक्त येती ॥३८०॥
कोणीतरी द्वारीं लाविलें पाटीस । न या दर्शनास म्हणुनी तेव्हां ॥३८१॥
परी दर्शनार्थ येती जे जे कोणी । त्यां त्यां सद्गुरूंनीं दर्शन दिधलें ॥३८२॥
निळकंठराव खरे आणि निर्मलाबाई । येवोनियां तेही भेटुनि गेले ॥३८३॥
"**शंकर नाम सुधा**" ऐसें लिहोनियां । ग्वाही भक्तांसी या
देती बाबा ॥३८४॥
"**धाता यथापूर्वमकल्पयत्**" ऐसें लिहवोन । ठेविती लावोन
सद्गुरु बाबा ॥३८५॥
बाबांच्या अंगांत भडकली उष्णता । बिछान्याभोंवता ठेविती बर्फ ॥३८६॥
वस्त्रें ओलीं करून घेती अंगावरी । परी शेवटवेरी सावध होते ॥३८७॥
शेवटवेरी चाले स्वरूप-अनुसंधान । विदेही ते पूर्ण सद्गुरु बाबा ॥३८८॥

देवोनियां पैसे नरहरि काळ्यांस । बाबा वदले त्यांस अभिषेकू करा ॥३८९॥
मोदी गणपतीवरी सहस्रावर्तनें करिती । सद्गुरु सांगती म्हणोनियां ॥३९०॥
काळ्यांनीं आणिलें तीर्थप्रसादास । प्राशिती तीर्थास सद्गुरु बाबा ॥३९१॥
किंचित् प्रसाद मुखांत घालोन । दिधलें पाठवोन सर्वांसीही ॥३९२॥
म्हणती भोजनें सारोनियां येणें । आतां घरीं जाणें सर्वत्रांनीं ॥३९३॥
डॉ. खेर, दातार, नरहरी काळे । स्वगृहीं सगळे परतले ॥३९४॥
स्वगृहीं उपवास सोडोनियां आले । पुनरपि पातले सद्गुरुस्थानीं ॥३९५॥
ते काळीं सद्गुरु स्वस्थ ते बैसले । दृष्टीतें लाविलें भ्रूमध्यासी ॥३९६॥
बारा अठ्ठावीस वाजतां बाबांनीं । देह तो त्यजोनी गेले बाबा ॥३९७॥
प्राणज्योत त्यांची ब्रह्मस्वरूपांत । झाली लीन तेथ मध्यरात्रीं ॥३९८॥
श्रावण वद्य चतुर्थी होता मंगळवार । सद्गुरूंनीं अवतार संपवीला ॥३९९॥
शके अठराशें शहात्तरामाजीं । बाबांनीं सहजीं त्यजिला देह ॥४००॥
दिनांक तो होता अठरा ऑगस्ट । एकोणीसशें चौपन्न असत
सन तेव्हां ॥४०१॥
पुढील सकल यात्रेची ती कथा । जाहलों लिहिता पूर्वाध्यायीं ॥४०२॥
अनाथांचा नाथ दीनांचा कैवारी । सान्तातोंनीं स्वीकारी अनन्तत्व ॥४०३॥
वासुदेवानंतसरस्वती नाहीं ते कीं गेले । भरोनि राहिले विश्वीं साऱ्या ॥४०४॥
असती सकलांचे अंतरांत तेची । जैसा भाव ज्यांसी तैसे दिसती ॥४०५॥
समाधिस्थानांत राहीन मी नित्य । ऐसा वर सत्य दिधला त्यांनीं ॥४०६॥
एक सहस्र वर्षे राहीन मी येथ । कल्याण करीत मद्भक्तांचें ॥४०७॥
ऐसें आश्वासन सद्गुरु बाबांचें । सकळिकां साचें असे जाणा ॥४०८॥
देह गेला तरी बाबा वसती तेथ । दिनरात येत प्रचीती ही ॥४०९॥
समाधि-मंदिरीं राहोनी तारीन । आणि उद्धरीन सकळिकां ॥४१०॥

ऐसी भाक त्यांची धरावी सकलांनीं । उपासना करुनी भजणें नित्य ॥४११॥
सांडोनी अहंता लागावें चरणीं । तन मन धनानीं सर्वस्वेंसी ॥४१२॥
ऐसी करितां भक्ती सद्गुरु प्रसन्न होती । बरवें ज्ञान देती सद्भक्तांसी ॥४१३॥
समाधिमंदिरांत विश्वनाथ वझे । सेवेलागीं असे आज तो कीं ॥४१४॥
धरुनी श्रद्धा थोर करितो सेवा फार । सद्गुरु उद्धार करितिल त्याचा ॥४१५॥
दत्ता आंबेटकर तोही सेवा करित । होईल पुनीत सेवेनें तो ॥४१६॥
जे जे भक्तजन येती सेवेसाठीं । तयांसी रक्षिती सत्यचि बाबा ॥४१७॥
परी छलक बुद्धी नसावी ती आंत । नास्तिका न होत प्राप्त कांहीं ॥४१८॥
निष्ठा श्रद्धा भक्ती असतां भक्तापाशीं । सद्गुरु तयासी इष्ट देती ॥४१९॥
शिष्य सद्गुरूंचा जोशी या कुळींचा । पुत्र गणेशाचा विठ्ठलशर्मा ॥४२०॥
सद्गुरु बाबांचे आज्ञें तेथें राही । कार्य करवुनि घेई सद्गुरुराज ॥४२१॥
सद्गुरु बाबांचें चरित्रलेखन । करावया कोण समर्थ असे ॥४२२॥
त्यांचें त्यांनीं चरित्र घेतलें लिहवोन । तत्पदीं समर्पण करीत असें ॥४२३॥
बाळ पानवळकर लेखक जाहला । याच चरित्राला सार्वभावें ॥४२४॥
आतां सद्गुरुपायीं करितों विनवणी । कृपा पूर्णपणीं असों द्यावी ॥४२५॥
विश्वीं जीवमात्र सुखी होवो सारा । वांछी जो जें खरा तें तो लाभो ॥४२६॥
दुर्वासना दुष्टांची जावी निरसोन । तयां द्यावी पूर्ण सद्वासना ॥४२७॥
खळांची दुर्बुद्धी नाशावी सकळ । जावे मनोमळ धुवोनीयां ॥४२८॥
चालते बोलते संत जे सज्जन । ईश्वरमूर्ती पूर्ण जगीं जे कीं ॥४२९॥
सकळांसी तयांची संगती कीं व्हावी । आवडी उपजावी परमार्थाची ॥४३०॥
आत्मस्वरूपाचें लागो सकळां ध्यान । सकल विश्व भजन
करो त्यांचें ॥४३१॥
इह-पर सुखी होवोनी सकळ । भक्ती ती केवळ करोत कीं ॥४३२॥
सनातन वैदिक धर्म हा वाढावा । उत्कर्षु तो व्हावा भारताचा ॥४३३॥

सकळ मंगळ द्यावें सकळांसी । इच्छितों वरासी ह्याची एका ॥४३४॥
तुमचे चरित्राचें करिती जे पठण । तयां संरक्षण द्यावें तुम्हीं ॥४३५॥
परमार्थांत गती होवो वाचकांची । आणि श्रद्धा त्यांची वाढी लागो ॥४३६॥
सद्गुरु वदती वर हा दिधला । तुझे प्रार्थनेला परिसोनी ॥४३७॥
वासुदेवानंतसरस्वती सद्गुरुबाबा । रावसाहेब तेचि बा असती जाणा ॥४३८॥
अनंत कोटी प्रणाम करोनियां चरणीं । लोळतसें धरणीं भक्तिभावें ॥४३९॥
समाप्तीचा दिन असे रविवार । षष्ठी तिथी थोर असे ती कीं ॥४४०॥
परिधावी नाम असे संवत्सर । आषाढ मासीं चरित्र संपविलें ॥४४१॥
शुक्लपक्षीं दिन सोळा जुलई तो । एकोणीसशें बहात्तर येतो
सन ऐसा ॥४४२॥
शके अठराशें चौऱ्याण्णवामाजी । मुंबापुरीमाजी लेखन झालें ॥४४३॥
दास म्हणे संक्षिप्त सद्गुरुचरित्रीं । द्वादशाध्याया झाली समाप्ती ही ॥४४४॥

॥ द्वादशाध्याय समाप्त ॥

॥ श्रीसद्गुरुचरणारविन्दार्पणमस्तु ॥